ग्रं. सं. ठाणें
निबंध
१५०३

नवनिबंध




REFBK-0013774

નિબંધ-
૩૬૬૪૩
૨૫।૮।૬૪
સ.૨।૮
૧૫૦૩.

⊙ कथनपर, वर्णनपर, विवेचनपर व कथारूप निबंधांचा संग्रह ⊙

नवे निबंध

: लेखक
गो. रा. दोडके



: मुखपृष्ठ
वसंत चव्हाण



REFBK-0013774

नवे लेखन प्रकाशन, नागपूर.

मूल्य ३ रुपये.

: प्रकाशक
राम कोलारकर
'नवे लेखन प्रकाशन'करिता
नवे लेखन प्रकाशन,
गोकुळपेठ, नागपूर.

सर्व हक्क सुरक्षित
प्रथमावृत्ती
दि. २२–४–६४



: मुद्रक
अं. पु. तापस
श्याम ब्रदर्स,
सुभाष रोड, नागपूर.

अनुक्रम

१. लाज
२. गोष्ट जुनीच अर्थ वेगळा
३. हनुमंताची कथा
४. आपण सगळे सारखेच
५. माणुसकी
६. छत्री, मेणबत्ती व माणूस
७. बळी
८. दिव्यं देहि मे चक्षुः
९. आईची जात
१०. हानी
११. महावृक्ष
१२. कोलंबस
१३. महात्मा म्हणा
१४. ताऱ्यांची व ग्रहांची वाटणी
१५. लॉफिंग गॅलरी
१६. शब्दसृष्टीच्या परमेश्वरा
१७. स्फूर्तीचे परब्रम्ह
१८. कोणे एके काळी
१९. केवळ गुणगुणायला
२०. ओळख
२१. अकोला आणि नागपूर
२२. एकाच औषधाचा डॉक्टर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...३६५५३... वि: ...नि.पं.५...
क्रमांक .....१५०३..... नो: दि: ४५।८।६८



बाजार केला आणि घराकडे मी यायला निघालो. बोजेवाला माझ्यापुढे चालत होता. मी बाजार करायला घरून निघालो, तेव्हाच आकाश काळंकुट्ट झालं होतं. आणि अधून मधून पावसाचे टप्पोरे थेंब पडू लागले होते. बरोबर छत्री घेतली होती. बाजार करून बाहेर पडलो, तो पावसाची सर कोसळायला सुरुवात झाली. छत्री उघडून डोक्यावर धरली. पण वारा पिसाटाप्रमाणे, दिशाधुंद होऊन धावत असल्यामुळे धोतराचा पोटऱ्याजवळचा भाग ओला झाला होता. बोजेवाल्या पोराकडे पाहिलं. त्याचे कपडे ओलेचिंब झाले होते. भाजीच्या टोपलीतून त्याच्या चुंबळीवर पाणी ओघळत होतं. वाऱ्याचा झोत त्याच्या अंगावरून जाऊ

लागला, की त्याचं अंग शहारून येई. कपाळावरून वाहणारा पाण्याचा ओघळ तो तळहाताने पुसून काढी, पण तो सारखा वाहत होता. ओलांचिंब करणारा पाऊस, अंगाला झोंबणारा वारा, पाय सुखानं न उचलू देणारा चिखल, आणि पाऊल उचलताना व टाकताना भीती दाखवणारी निसरडी झालेली जमीन या सगळ्यांच्या योगाने पोरगा दीनवाणा झाला होता. मला त्याची कीव आली. त्याच्या न्यूनाची लाज वाटली. डोक्यावर छत्री नाही, वाऱ्यापावसातून न जायची इच्छा असली, तरी मनाप्रमाणे वागायला वाव नाही. बोजा नेला नाही तर पोटाचं काय ! मी घरी असतो आणि अशी सर जर कोसळू लागली असती, तर मी खात्रीनं बाजार करायचा आपला बेत रद्द केला असता. पाऊस थांबल्यावर जाऊ असं म्हटलं असतं. आरामात, मजेत घराच्या आसऱ्याला राह्यलो असतो. पण ह्या पोराला म्हणता आलं असतं का, "पाऊस धो धो पडतो आहे, मग निघू." मजजवळ छत्री आहे, मग मला त्याच्या त्रासाविषयी विचार करायचं काय कारण ! मी म्हटलं असतं, "चलायला लाग, फार नखरेल अहात तुम्ही लोक,"—आमच्या दोघांच्या स्थितीमधला हा भेद ध्यानात येऊन त्याच्याविषयीच्या अनुकंपेनं आणि स्वतः विषयीच्या घृणेनं मी छत्री बंद केली. भिजतभिजत घरी आलो.

असंच एकदा उन्हाळचातही झालं होतं. त्याहीवेळी मनात घृणा उसळून आली होती. पोराच्या पायात वाहणा नव्हत्या म्हणून मी आपल्या वाहणा थैलीत टाकल्या होत्या व छत्री बंद करून त्याच्या मागोमाग चालत होतो. पायाला ज्यावेळी चांगले चटके बसले तेव्हा बरं वाटलं. घामाचे ओघळ जेव्हा रुमालाने पुसून काढायचा तेव्हा जिवाला समाधान वाटायचं.

अर्थात, मी हे आपलं तुम्हाला सांगितलं. पावसातून चालताना छत्री बंद करावी, उन्हातून चालताना वाहणा पिशवीत टाकाव्या, जणू काय कुणी शिक्षा केली आहे अशा रीतीनं ओलं

व्हावं अथवा पाय पोळून घ्यावे असं नाही म्हणत मी. पण जी भावना या वागण्यामागं आहे ती अंतःकरणात असली म्हणजे झालं. ज्या व्यक्तीच्या अंतःकरणात ही भावना असेल ती असा विचार करील. "–जी व्यक्ती आपल्या स्वतःच्या दुःखाला कारणीभूत झाली नाही, दुःखं निर्माण झाली तो भोवतालच्या परिस्थितीमुळे; या दुःखाबाबत दोष आपल्याकडे येतो, आपण कारणीभूत असतो. जी व्यक्ती दुःखव्याप्त आहे, तिला याची जाणीवही नसेल." परंतु ही जाणीव अंतःकरणात असल्यामुळे या जीवांविषयी करुणा वाटून, त्यांच्या दुःखात सहभागी होऊन, दुःखभार कमी करण्याचा प्रयत्न समाज घटक करील. आणि यामुळे जे दुःखी आहेत त्यांना जीवन सहज होईल. त्याच बरोबर समाजाचंही जीवन सुखाचं होईल. 'नरेच केला हीन किती नर' या प्रकारची अगतिकतेची भाषा उच्चारण्याचा समाजपुरुषावर प्रसंग येणार नाही.

पण एखादा म्हणेल, सारीच का दुःखं अशी असतात की माणसाला त्यांच्याविषयी सहानुभूती वाटावी ? आणि त्यांचा दोष त्यानं आपल्या माथी घ्यावा ? अर्थात नाही. पुष्कळशी दुःखं तर मुद्दामच निर्माण केली जातात. पुष्कळदा आपण बघतो–श्रीमंतांची घरं असतात, डॉक्टरांची सारखी ये जा चाललेली असते. कुणी ना कुणी तरी अंथरुणावर लोळलेला असतो. अर्थात हा तर श्रीमंतीचा ढंग झाला. पडसं झालं कुणाला, 'डॉक्टर' कुणाला 'कणकण' वाटतंय 'डॉक्टर' खूब खाल्लं, 'डॉक्टर', सुस्ती, 'डॉक्टर, '–अर्थात हे सगळे रोग पैशाचे असतात. हे सगळे रोग पैशाची कृपा म्हणून. कित्येकांना सहानुभूती हवी असते. म्हणूनही दुःख निर्माण केलेलं असतं. उतरलेला चेहरा पाहिला की कुणीही विचारतं, "आज बरं वाटत नाही आपल्याला ?" की मग पाचसात दिवसांचा प्रकृतीचा इतिहास सांगता येतो, "काल सकाळी बेटं असं, परवा सकाळी बेटं तसं,' ऐकणारा सहानुभूती दाखवतो, बोलणाऱ्याला समाधान मिळतं. कित्येकांची मती लहान मुलांप्रमाणे असते. इतरांनी आपल्याकडे

लक्ष द्यावं म्हणूनच आकांडतांडव चाललेलं असतं. कित्येकांना दुःखी असण्यातच मौज वाटते. दुःख जर त्यांच्या जीवनात नसेल, तर त्यांना "—जीवनावेगळचा मासोळीप्रमाणे" वाटेल. कित्येकांची प्रवृत्तीच सुखात माती कालवण्याची असते. कित्येकांचं अंतःकरणच कुब्जेसारखं अष्टवक्र असतं आणि ते आपल्या वागणुकीनं दुःख आपल्यावर ओढवून घेतात. अर्थात या लोकांच्या दुःखाविषयी आत्मीयता वाटण्याचं कारण नाही. सुखाची सगळी साधनं हाताशी असताना ज्यानं दुःखी राह्यचं ठरवलं, दुःखाला मुद्दाम आमंत्रण देऊन आपल्यावर ओढवून घेतलं, अशा व्यक्तीविषयी मला केव्हाही तिरस्कारच वाटेल. आणि वरीलपैकी एखादी व्यक्ती आपल्या दुःखाविषयी बोलू लागली, तर मला संतापच येईल. ही दुःखं अशी नव्हत की ज्यांच्याबाबत मी आपल्याला दोषी समजेन. ही दुःखं चोचले या सदरातली.

तेच दारिद्र्यानं पीडलेलं, रोगानं जर्जर झालेलं, वार्धक्यानं गांजलेलं खालच्या थरातील जीवन बघा. मरण येईपावेतो नुसती धुगधुगी असल्यागत जगायचं अशी त्यांची स्थिती असायला कोण कारण ? सगळा सुबुद्ध मानलेला समाज. या समाजाचं सुख, स्वास्थ्य, ऐषआराम या खालच्या थरातील लोकांच्या दुःखी, हीन, जाणीव नसलेल्या जीवनावर विसंबून आहे. मी त्यांना दारिद्र्यात ठेवलं, तर ते एकमेकांचे आपापसात गळे कापून माझ्या डामडौलाचा डोलारा उभा राहचला कारण होतात. ही जाणीव घ्यायला मी तयार नाही. कां ? कारण, कंसाला ज्याप्रमाणे कृष्णदर्शन अणूरेणूत व्हायला लागलं त्याप्रमाणे माझं पाप मला प्रत्येक ठिकाणी दिसायला लागेल. आणि मी तर कमकुवत मनाचा आहे, मग मी आपल्याच जीवनाचं निसंतान करीन. नको बाबा, नको हे. त्यापेक्षा घाण्याच्या बैलाप्रमाणे डोळ्यावर पट्टी बांधून सगळ्यासारखं फिरलेलं बरं. या परिस्थितीत, खालच्या थराला जोवर परिस्थितीची जाणीव होत नाही आणि मनुष्य या नात्यानं तो

अधिकाराची भाषा बोलत नाही, तोवर मला माझ्या पापाची जाणीव हवी. आणि सहानुभूतीचा, माणुसकीचा ओलावा माझ्या वागण्यात हवा.

तुमच्या इथं एखादा पोऱ्या असतो नोकरीला. त्याला तुम्ही पगार देता. महिन्याचा पगार दिला की, तीस दिवसपर्यंत राबवून घ्यायला एक जनावर आपल्याला मिळालं. मग त्याचं त्या पगारात भागतं की नाही ? खायला त्याला पुरेसं मिळू शकतं कीं नाही ? कपडालत्ता त्याचा होऊ शकतो का ? काही बघण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत जर पाप करण्याकडे त्याची प्रवृत्ती झाली तर "हे असेच" ही आमची भाषा. साधी गोष्ट आम्ही विसरतो, की सामाजिक पाप हे न्यूनातून, अभावातून निर्माण होतं. बाजारात मी पुष्कळदा पाहिलं आहे. बोजेवाल्या पोराशी पै पैशाकरिता, पैसेवाले हुज्जत घालत बसतात. पण सरकार ज्यावेळी प्राप्तीवरील कर घेतं, किंवा इतर नवीन कर बसवतं तेव्हा मात्र तो निमूटपणे देतात. हुज्जत घालण्याची या लोकांची प्रवृत्ती यावेळेला कुठं जाते, कुणाला ठाऊक ! अकिंचनाला नागवण्याची, त्याच्याशी हुज्जत घालण्याची आणि अधिकारासमोर मान तुकवण्याची प्रवृत्ती तर हृदयशून्यतेचं लक्षण आहे ! माणुसकीचा अपमान आहे. या प्रवृत्तीतून जगातले कितीतरी दुःख निर्माण झाले आहे ! या प्रकरणात आपण प्रत्यक्षपणे कारणीभूत असतो. पण रस्त्यावर संसार मांडून बसलेले अंध, अपंग, रोगी, भिकारी यांच्या जीवनाचा विचका व्हायला, जीवन निरर्थक व्हायला, मरणाची वाट बघत जगायला, अंगी असलेले गुण वाया जायला समाजातील प्रत्येक घटक स्वतःला कारणीभूत मानून त्यांच्याबाबत कळवळेल, आपल्याशी लाजेल आणि प्रत्यक्ष कार्य करील त्याच दिवशी हे सामाजिक दैन्य नाहीसं होऊ लागेल. लेनिनने कुणाचंही जीवन वाया जाऊ नये, कुणीही दीनवाणा राहू नये, प्रत्येकानं आपल्या कुवतीप्रमाणे समाजाची सेवा करून हक्कानं जीवनाची साधनं मिळवावी, लाचारी आणि

दीनवाणेपणा समाजात राहणार नाही, असं सरकार आणि असा समाज निर्माण केला. टॉलस्टॉयच्या उत्तर आयुष्यातील परिवर्तनाला कारण अंतःकरणात असलेली समाजातील विपन्नतेची लाज ! महात्माजींच्या दरिद्रीनारायणाच्या सेवेमागं समाजाच्या युगायुगांच्या पापांची लाजच होती.

जगात आशीर्वाद तर अनेकांनी अनेक दिले असतील. एकानं म्हटलं असेल, "तुझं कल्याण होवो," दुसरा म्हणाला असेल "विजयी व्हा बरं बाळ " तिसरा, "चांगली नोकरी मिळो" यातच "आयुष्मान भव," "वज्रचुडे मंडित रहा" हे भरीला घातले म्हणजे झालं. पण अन्नदाजिजीनं श्रीकांताला दिलेला आशीर्वाद क्वचितच कुणाच्या मनीमुखी आला असेल. श्रीकांत इंद्रनाथला अन्नदाजिजीचं शेवटचं दर्शन घडलं तो प्रसंग. श्रीकांतला तिनं आशीर्वाद दिला, "ईश्वर असाच तुझ्या हृदयात उभा राहो. दुसऱ्याचं दुःख पाहून आसवं गाळायची बुद्धी तुला देवो." हा आशीर्वाद तर खराच. शुभकामनाही प्रगट झाली होती. पण एवढंच नव्हे, ही तर अमृतवाणी होती. मृत्यूचा बडिवार अमृत नाहीसा करतं. आणि अमंगलाला पळवतं. हा आशीर्वाद आपल्यालाही मिळावा असं पुष्कळदा वाटतं. अन्नदाजिजीजवळ मी तसा हट्ट धरतोही. तुम्ही म्हणाल अन्नदा तर पुस्तकातली आहे, पण मला तर ती रक्तमांसाच्या माणसांपेक्षाही जास्त सजीव वाटते. मनात एखादेवेळी विचार येतो, ज्याप्रमाणे श्रीकांताला अन्नदाजिजीनं आशीर्वाद दिला त्याप्रमाणे ह्या मानवजातीला कुणी आशीर्वाद दिला, तर कितीतरी जीवनदुःखाचा निरास होईल ! माणुसकीच्या अभावामुळे समाजात वावरणाऱ्या अनेक दुःखांना जगातून नाहीसं व्हावं लागेल !

***

०२०

माझ्याशी तो अशा रीतीने बोलत होता की जणू काय त्याला एखाद्या अभिनव, अज्ञात गोष्टीचा शोध लागला होता. रामायणाचा एक भाग त्याच्या हातात होता. आणि तो मला सांगत होता, "राज्यात घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीची जबाबदारी राजावर म्हणजे राज्यातील सरकारवर आहे. राम एकदा आपल्या राजसभेत बसला असताना एक ब्राम्हण आपल्या मुलाचं प्रेत हातावर घेऊन तिथं आला. प्रेत त्यानं खाली ठेवलं, आणि रामाला उद्देशून म्हणाला, "राजा, तुझ्या राज्यात अधर्माचरण घडत असलं पाहिजे, पाप घडत असलं पाहिजे. माझ्या मुलाला अकाली मृत्यू कां यावा ?" ब्राम्हणाचं हे वचन ऐकून रामाला दुःख झालं.

ब्राम्हणाच्या मुलाला अकाली मृत्यू कां यावा, याचा अचंबा वाटला. त्यानं ब्राम्हणाला अभिवचन दिलं, "राज्यात कुठे अधर्माचरण घडत असेल, तर त्याचा छडा लावला जाईल. आणि अपराध्याला शिक्षा होईल." नंतर रामाने आपले दूत पापाचा शोध घ्यायला दिशादिशांना पाठवले.—

याला म्हणतात राजा, याला म्हणतात सरकार. नाहीतर आमचं ! एक क्षण असा जात नसेल की ज्या क्षणाला आमच्या राज्यात पाप घडत नाही, भूमीचा एक तसूभर भाग नसेल की जेथे अधर्म आचरला जात नाही. पण ह्या पापाला, अधर्माला दंड नाही. सरकारचं त्याकडे लक्षच नाही."

मी म्हणालो, "कां कुणी ब्राम्हण नाही का ओरडायला ? त्याला जाऊन सरकारच्या कानी ओरड म्हणा."

तो म्हणाला, "पण हा राज्यातील प्रत्येक व्यक्तीचा अधिकार असला पाहिजे. त्याचे अहित होत असेल तर सरकारच्या कानावर घालून त्याचं कारण नाहीसं करून घेतलं पाहिजे."

बरोबर आहे त्याचे म्हणणे. हा तर प्रत्येक व्यक्तीचा अधिकार आहे. आपली गाऱ्हाणी सरकारच्या कानावर घालण आणि त्यांचे निवारण करून घेणे. नाहीतर सरकार असते कशाला ! जनतेची सेवा करणारं सरकार नसेल तर त्याला फुकटचा अधिकार, मानसन्मान, प्रतिष्ठा भोगू द्यायची कशाला ! नसती शोभा म्हणून सरकार नको. कार्यरत, आणि जनकल्याणाची चिंता अहर्निश वाहणारं जर सरकार नसेल तर त्याच्या हातात एक क्षणही अधिकार असू नये. तो अधिकार हिरावून घेण्याचा जनतेला अधिकार आहे.

मला हे पटतं. पण सरकारला "माझ्या दुःखाचं निराकरण करणं हे तुमचं कर्तव्य आहे" हे काय कुणीही म्हणू शकतं ? रामाला ज्या ब्राह्मणानं ठपका दिला तो ब्राम्हण निग्रही

लावण्याचा अधिकार होता. आता आपण थोडंसं आपलं स्वतःचंच निरीक्षण केलं, आपलं स्वतःचं रूप आरशात न्याहाळलं तर ते कसं दिसेल ? स्वार्थानं अंध झालेलं, पदोपदी असत्याचरण करणारं, नागरिक या नात्याने स्वतःकडे आलेल्या सामाजिक कर्तव्यांची ओळख नसलेलं, राष्ट्रकल्याण साधण्याकरिता सेवा आणि त्यागाची अपेक्षा असल्यास नुसत्या गप्पा मारणारं आणि उणीवा दाखवणारं, दुसऱ्यानं केलेल्या पापाकडे बोट दाखवून, त्याच्या तुलनेने आपलं पाप काहीच नव्हे असं प्रामाणिकपणे समजणारं, या प्रकारचं आमचं रूप. आम्हाला आहे का अधिकार म्हणायला, "राजा, तुझ्या राज्यात अधर्माचरण घडत आहे." ही देखील वाणी आम्ही न अडखळता उच्चारू शकत नाही. कारण पापाच्या मुळाचा शोध घेत गेल्यास तो आपल्यापर्यंत येणार नाही कशावरून !

धनवंताच्या घरी नोकरचाकर असतात. एवढी एवढीशी कामं, नुसते हातपाय हलवण्यासारखी, पण त्यालाही नोकर हवा असतो. दोन हातावर असलेली पेन्सिल उचलायला नोकर हवा, बदललेलं नेसणं उचलून नीट ठेवायला नोकर हवा. विडा करायला नोकर हवा. प्रत्येक ठिकाणी नोकर हवा. या प्रकारची श्रीमंती आमच्या अंगात इतकी मुरलेली की क्षयाच्या जंतूप्रमाणे. हिंदी नागरिकांची स्थिती अशीच आहे. हिंदी नागरिकात श्रीमंती, मिजाशी वृत्ती अगदी रक्तात भिनून गेली आहे. आपण कोणतंही काम करणं, कर्तव्य पार पाडणं, हे त्याला भिकेचे डोहाळे वाटतात. साहजिकच तो सगळचा कामाची जबाबदारी लोटतो सरकारवर. पण एक गोष्ट त्याच्या ध्यानात कधीच येत नाही, जसजसं त्याला आपण जास्त जास्त राबवू तसतसं ते शक्तीहीन होत जाणार आहे. सरकारला आपली स्वतःची कर्तव्यं आहेतच. त्यात आणखी जनतेने पार पाडायच्या कर्तव्यांचा भार शिरावर घेण्याचा प्रसंग आला तर ते सरकार कितपत कार्यक्षम राहील ! काय, आम्ही म्हणू शकू कुणाला? "राजा, तुझ्या राज्यात अधर्माचरण—"

हे सगळं दृश्य पाहिल्यावर एक देखावा माझ्या डोळ्यासमोर उभा राहतो. एखाद्या प्रचंड वाडयाला आग लागली आहे, वारा सोसाटयाचा वाहतो आहे. खिडक्या खिडक्यांमधून, दारादारा-मधून अग्नीनारायणाच्या अक्राळविक्राळ जिव्हा बाहेर लवलवताहेत. वाडयाचे छप्पर, खांब, भिंती कोसळायला येताहेत.

आणि वाडयाच्या बाहेर आग विझवायची कुणी, कर्तव्य कुणाचं, ह्या प्रश्नावर वादविवाद चालला आहे. प्रत्येकजण म्हणतो, "माझं नव्हे, त्याचं."

तोवर वाडा जळून खाक झाला आहे. रीठ मात्र अजून धगधगत उरलं आहे. भोवताली असलेल्या माणसातून एकजण राख हातात घेऊन राजसभेत गेला आहे. आणि तिथं ओरडतो आहे, "राजा, तुझ्या राज्यात अधर्माचरण. . . पाप. . माझं घर जळालं––"

हीही गोष्ट रामायणातील कथेत वाचता येते हे माझ्या मित्राला समजतं की नाही, हरी जाणे.

* * *

०३०

हनुमंतावर प्रसन्न होऊन सीतामाईनं त्याला एक मोत्यांचा कंठा दिला. त्यानं तो हातात घेतला, चाळवला, इकडून पहा, तिकडून पहा असं केलं. सीतामाईनं दिलेला विश्वमोलाचा कंठा तो. मोती टप्पोरे, पाणीदार, तेजस्वी इतके की रवीप्रभा त्यातून ओघळून बाहेर पडते आहे असं वाटायचं. पण मारोतीबुवांना या गोष्टीचं कौतुक वाटलं, असं सीतामाईला काही वाटेना. ती त्याच्या माकड-चेष्टा बघत उभी राहिली. बघता बघता ती माळ मारुतीबुवांनी आपल्या ओठाजवळ नेली आणि एक मोती त्यांनी कचकन् दाताखाली फोडला.

सीतामाई म्हणाली, "हनुमंता, हे काय करता ? त्या माळेत काय बदरिका फळं आहेत ?"

दातांनी फोडलेले मोती हनुमंताने हातावर घेतले, आणि डोळे फाडफाडून, सर्वांगांनी ते त्याने पाहिले. सीतामाईच्या मनात विचार आला, हनुमंत माकडचेष्टा करतोय वाटतं! त्या मुग्धच राहिल्या. हनुमंतानं दुसरे मोती दाताखाली भरडले. तेही त्याने निरखून पाहिले. एकामागून एक सगळे मोती त्याने दाताखाली भरडून काढले. शितावरून भाताची परीक्षा ही व्यावहारिक म्हण त्यांना माहीत नव्हती. सगळे मोती फोडून झाल्यावर उरलेले मौल्यवान सूत्र त्याने वाकुल्या दाखवत जमिनीवर फेकून दिले. सीतामाई आता म्हणाली. "हनुमंता, हे काय केलंस? एवढी मोलाची माळ तुला दिली. वाटलं होतं, गळ्यात घालशील, मिरवशील, त्या माळेचं कौतुक करशील. पण तू तर मोत्यान् मोत्याचा चुरा केलास. कां रे बाबा?"

"काय मोल तुमच्या त्या माळेचं? सगळे मोती फोडून पाहिले, त्यांच्यामध्ये राम आहे का पाह्यला. त्यात बाहेर राम नाही, आत राम नाही आणि तुम्ही म्हणता त्यांना मोल आहे! ज्या वस्तूत राम शोधूनही सापडायचा नाही, ती असली काय न् नसली काय!"

सीतामाईला हसू आलं, हनुमंताचं कौतुक वाटलं.

या कथेचं आमच्याकडच्या कथाकऱ्यांना, कीर्तनकारांना मोठं कौतुक वाटतं. या प्रसंगाचं ते रसभरित वर्णन करतात. वर्णनाच्या ओघात ते स्वतः वाहून जातात. त्यांचे डोळे पाणावतात, कंठ दाटून येतो, ते म्हणतात, "काय तो हनुमंत! काय ते मारुतीराय! त्यांनीच भक्ती करावी त्यांची नुसती कथा ऐकून आपण पुण्य पदरी पाडून घ्यावं. अहो सत्ययुगातला तो महिमा! कलियुगात कुठं बघायला मिळायचा! नाहीतर इथं पुष्कळ मायमाउल्या कथा ऐकायला येतात आणि डुलक्या घेत बसतात. पुष्कळसे येतात, आणि दाराजवळच्या कुणाच्यातरी खेटरात त्यांचा जीव अडकून पडलेला असतो. धन्य धन्य तो हनुमंत, की ज्यानं जगन्माता

जानकीनं दिलेल्या विश्वमोलाच्या माळेतील मोती कचाकचा फोडले ! आणि हे कशाला ? त्यात राम बघायला. अहो ! नाही तर, कवडी कवडी माया जोडणारे आपण . . . जाऊ द्या."

या कथेत एका प्रवृत्तीचं कौतुक आहे, एका प्रवृत्तीचा बडिवार आहे, एका निष्ठेची नावाजणी आहे. सीतेला किंवा इतर कुणालाही मोलाचे वाटणारे मोती हनुमंताला मोलाचे वाटत नाहीत. तो रामाचा निस्सीम भक्त. जिथं राम नाही, ज्यात राम नाही ते सगळं शून्यवत्, निरर्थक. मोत्याचे मोल, त्याचा आकार, त्याचं तेज, त्याचा पाणीदारपणा, टप्पोरेपणा यांच्यावर अवलंबून. पण हनुमंतानं मोत्याचं मोल ठरवायला एक वेगळीच कसोटी घेतली, 'त्यात राम आहे का ?'

पुराणातील सप्त चिरंजीवांमध्ये हनुमान आहे. पण त्याचं दर्शन क्वचितच व्हायचं, व्हायचा योगच नाही. महाभारतकाली एकदा कुठंतरी हनुमान उपस्थित झाला होता. भीमाला झाला होता गर्व, आपल्यासारखा बलवान कोणीच नाही. भीम रस्त्याने येत होता. हनुमान रस्त्याच्या कडेला जाऊन बसला. आणि त्यानं आपली शेपटी रस्त्यावर आरपार पसरून ठेवली. भीम जवळ आला. शेपटी पाहून हनुमंताला तो म्हणाला, "शेपूट ओढून घ्या ना." हनुमंत म्हणाला, "तूच जरा बाजूला करून घे ना." भीमानं शेपटीला हात घातला, पण ते तसूभरही हललं नाही. महाप्रतापी शेपूट ते ! रामलक्ष्मणाभोवती ज्याचा परकोट झाला होता, ज्यानं लंका जाळली होती, जिच्या भरवशावर मारुतीबुवा 'कोटीच्या कोटी उड्डाणे' करीत, अशी ती शेपटी उचलता उचलता भीम घामाघूम झाला, शेपटीनं त्याला दाद दिली नाही. हेच मारुतीरायांचं शेवटचं दर्शन. आणखी कधी भूतलावर मारुतीबुवा कुणाला दिसले असतील, मला माहीत नाही. पुराणांचं माझं ज्ञान तोकडं आहे, प्रमाद घडणं शक्य आहे.

वरील प्रसंगीचं हनुमंताचं दर्शन जरी शेवटीचं ठरलं तरी त्याची वैचारिक प्रजा आज भूतलावर खूप आहे. घराघरात, गावागावात, देशादेशात, खंडाखंडात आहे. हनुमंताचं वस्तूचं मूल्य मापण्याचं साधन रामतत्त्व होतं. वस्तूत ते असेल तर तिला अर्थ, नसेल तर ती हीन मोलाची, तिला मोलच नाही. आज आमचीही रीत अशीच आहे. आमचंही 'रामतत्त्व' आहे. हे तत्त्व जर माणसाच्या ठिकाणी आढळून आलं तर आम्ही म्हणतो, माणूस लाख मोलाचा. नसेल तर माणूस कवडी मोलाचा. माझी जी मतप्रणाली आहे, ती स्वीकारणारा जो कुणी असेल तो माझा. नसेल तर तो माझा कुणी नव्हे, तो मला परका. तो जगला काय, न जगला काय, मला त्याचं सुखदुःख काहीच नाही. माणसाचं मोजमाप करताना मी बघतो ते एवढंच. माणसानं कोणती मतप्रणाली स्वीकारली आहे, तो कोणत्या पक्षाचा आहे? महत्त्व माणसाला नाही, त्याला लागलेल्या पक्षाच्या लेबलाला आहे. एखादं औषध असतं. औषधाचा गुणकारीपणा ठरवला जातो तो कंपनीच्या लेबलावरून. औषध आत असेल नसेल, ते गुणकारी असेल नसेल. पण लेबल मात्र सगळ्या गुणांची हमी देतं. माझ्या पक्षाचा सभासद असेल तर तो मी सर्वगुणसंपन्न समजतो. इतरांशी तर माणुसकीनं, माणसाप्रमाणे वागण्याचीही माझ्या मनाची तयारी नसते. त्यांच्याविषयी माझ्या अंतःकरणात नुसती तुच्छता, नुसता द्वेष भरलेला असतो.

या प्रवृत्तीमुळे जगात केवढं असहानुभूतीचं, असहिष्णुतेचं वातावरण निर्माण होतं! जगात आज असहिष्णुतेचं पाशवी थैमान माजलं आहे. आणि ही असहिष्णुता पक्ष आणि वाद यांच्या पोटी आहे. जर्मनीतील नाझीवादाचा इतिहास तुमच्या आमच्या डोळ्यासमोर घडला आहे. रक्तामांसाचे, नात्यागोत्याचे, सहवासानं निर्माण होणाऱ्या जिव्हाळ्याचे, गुरूशिष्यांचे, सामान्य भलेपणाचे– सगळे संबंध नाहीसे झाले आणि केवळ पक्ष आणि वाद यांच्यावर उभारलेले संबंधच काय ते उरले. बापाला नाझी तत्वज्ञान मान्य

नसेल, तो नाझी तत्वज्ञानावर खाजगी बोलण्यात टीका करत असेल, तर मुलगा याबाबत आपल्या अधिकाऱ्यांकडे चुगली खाई. बापावर कोणती संकटपरंपरा कोसळेल याची त्याला पूर्ण जाणीव असे. पण पक्षनिष्ठा इतर निष्ठांचा नाश करून टाकी. फॅसिस्टांच्या इटालीतही हाच प्रकार. आमच्या देशातील पक्षोपपक्षांच्या वागणुकीचा तोच प्रकार. आज जगात अमेरिका हाच एक पक्ष झाला आहे. आणि अमेरिकन राष्ट्र त्या पक्षाच्या पलीकडे काहीही पाह्यला तयार नाही. या पक्षाला तर सर्वसामान्य मानवजीवनच तुच्छ वाटू लागले आहे. नाहीतर जीवनाची माती करून टाकणारा, अन्नात मृत्यू कालवणारा हायड्रोजन बाँबचा स्फोट तिने जपान भोवतालच्या पॅसिफिकमध्ये कशाला केला असता ! न्यूयॉर्कजवळ काय समुद्र नाही ? पहिले अणुबाँब हिरोशिमा आणि नागासाकीवर कोसळले, सगळा मध्ययुरोप त्यांना मोकळा होता. बर्लिन, पॅरिसचा परिसर तर अणुबाँब वर्षावाला अत्यंत अनुकूल होता. पण बाँब गेले हिरोशिमा आणि नागासाकीवर. जंतूयुद्धाचा प्रयोग झाला तो आफ्रिकेतील अप्रगत टोळचांवर एखादे नवीन रसायन तयार झाले, नवीन वैद्यकीय शोध लागला तर या रसायनाचा. शोधाचा प्रयोग उंदीर वगैरे प्राण्यांवर केला जातो. अमेरिकन आणि युरोपिअन लोकांच्या दृष्टीने आफ्रिका आणि आशियातील जनता या उंदीर वगैरेंच्याच जातीची. कम्युनिस्टही यांच्यातलेच. त्यांचा देश रशिया, पक्ष कम्युनिस्ट, त्यांचा वाद लेनिनिझम, स्टॅलिनिझम--

या सगळ्या हैदोसात मरण आहे माणसांचं आजच्या जगाची माणसावरची निष्ठा पार उडालेली आहे गेल्या महायुद्धाच्या काळी, आणि आपल्या देशातील 'चालते व्हा' चळवळ ऐन भरात असताना एक प्रश्न विनोदानं विचारला जाई, 'तुझी किंमत काय ?' उत्तर असे 'दीड आणा.' बंदुकीच्या एका गोळीची ती किंमत होती. ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी पक्षाने हे हिंदी माणसाचं मोल ठरवलं होतं. " दीड आणा."

हा एकनिष्ठतेचा परिणाम. पण मानवी संबंधांचा आणि मानवाच्या जीवनाचा प्रश्न येतो त्या ठिकाणी तिचे परिणाम पाशवी, राक्षसी आहेत. १९२० ते १९५४ या काळात घडलेला इतिहास याला साक्ष आहे.

मध्ययुगीन काळात तुर्कांनी अलेक्झांड्रियावर स्वारी केली होती. अलेक्झांड्रिया त्या काळचं विद्यापीठ होतं. तत्कालीन ज्ञान या नगरीत सग्रहित झालं होतं. मोठ्ठं ग्रंथसंग्रहालय त्या वेळी या नगरात होतं. अलेक्झांड्रिया तुर्कांनी जिंकलं. जाळपोळीला आरंभ झाला. ग्रंथसंग्रहालयाचा नाश करू नये म्हणून विद्वान ग्रीकांनी प्रार्थना केली, करुणा भाकली, संपत्तीच्या योगानेही त्यांच्या अंतःकरणाला पाझर फोडण्याचा प्रयत्न झाला. मूर्तीविक्रयापेक्षा मूर्तीभंजन प्रिय असलेल्या गझनीच्या महंमदाची जी निष्ठा तीच त्यांचीही. महंमदीयांची निष्ठा कुराणावर. सगळं कुराणात हा विश्वास तुर्क सरदार म्हणाला, "हे ग्रंथ हवेतच कशाला! जे आहे ते सगळं कुराणात आहे आणि कुराणात नसलेलं जर काही या ग्रंथांमध्ये असेल, तर ते पाखंड आहे." परिणाम हा झाला की एक प्राचीन, प्रचंड ग्रंथसंग्रहालय अग्नीच्या मुखात पडलं. हाही एकच निष्ठा अंतःकरणात बाळगण्याचा परिणाम. हनुमंत काय आणि हा तुर्क सरदार काय, दोघेही आपली जी निष्ठा असेल ती न बाळगणारांविषयी असहिष्णू वृत्ती धारण करणारांचे पूर्वज. आपली तत्वप्रणाली न मानणारे जे असतील ते जगायला देखील योग्य नव्हत असं मानणारांचे देव.

जीवन विविध आहे, संबंध अनंत आहेत, जीवनाच्या समस्या असंख्य आहेत. सगळचांचं रूप परिवर्तनशील आहे. यामुळे एकाच निष्ठेची उपासना आरंभाला कल्याणकारी होत असली तरी तीत कडवेपणा लौकरच येतो. आणि मग ती विनाशाला कारण होते. आज सर्वत्र सहिष्णुतेची आवश्यकता आहे. जगतातील भीषण आणि भीतीप्रद वातावरणात सहिष्णुता हाच काय तो एकमेव आधार आहे.

* * *

०४०

"दूध" म्हणून दूधवाल्याची हाक कानावर आली आणि सौभाग्यवती दुधाचा गंज घेऊन बाहेर गेल्या. आत चुलीजवळ बसून मी चहा घेत होतो. चहाचा पहिला घोट घेतल्याबरोबरच मी चहावर टीका केली होती, त्याच्या वेचवपणावर. आमचा चहा फार चांगला असे, पण दूध मात्र त्यावर पाणी फिरवी. आम्ही दोघेही चहाचे शौकिन होतो. आणि कसाही चहा पिणं मनाला काही मानवेना. साहजिकच मनातील क्षोभ चहा पितापिता बाहेर पडला होता. प्रकार ताजा असल्यामुळे सौभाग्यवती दूधवाल्याला बोलायला लागल्या, "हे काय दूध आहे ? नुसतं पाणी ! पाण्याचे पैसे घेता नुसते. बंदच करायला हवं दूध. इतके पैसे द्यायचे आणि नुसतं

पाणी घ्यायचं!" दूधवाला म्हणाला "चाऱ्याचे भाव वाढले, परवडत नाही." दूधवाला निघून गेला. गंज घेऊन सौभाग्यवती घरात आली. मला तिचं नवल वाटलं, आपलं स्वतःचंही नवल वाटलं. रोजच्यारोज दूध म्हणून नुसतं पाणी घेत असू. पाण्याचेच पैसे देत असू. पाणी तर आमच्या इथल्या नळाला खूप होतं. हे सगळं असूनही आमचं दूध घेणं बंद होईना. हंसक्षीर न्यायात गाजलेला हंस जर आमच्याकडलं दूध प्याला असता तर कलियुगात दुधाला हे असं रूप कसं प्राप्त झालं असावं या विषयावर त्यानं एखादा प्रबंध लिहिला असता. आणि पुढे आजच्या दुधाचं काय होणार या मुद्यावर त्यानं आपले विचार मांडले असते.

महाभारतात एक कथा आहे. द्रोण या नावाचा एक दरिद्री ब्राम्हण होता. त्याला अश्वत्थामा या नावाचा एक मुलगा होता. अश्वत्थाम्यानं एकदा घरी दूध मागितलं. पण द्रोण पडला दरिद्री. त्यानं पाण्यात पीठ घातलं, मुलाला प्यायला दिलं. मुलाला दूध प्याल्याचं समाधान वाटलं. बापाचंही समाधान झालं. पण कर्मधर्मसंयोगानं एक दिवस अश्वत्थामा खरोखरचं दूध प्याला. घरी पुन्हा त्यानं दूध मागितलं. बापानं पाण्यात पीठ कालवून दिलं. दुधासारखी चव लागेना. अश्वत्थाम्यानं तोंड वाकडं केलं. तो दूध घेईना, रडू लागला. द्रोणाला दुःख झालं. विषाद वाटला. आम्ही आमच्या मुलाबाळांना रोज पाणी कालवलेलं दूध देतो. पण आम्हाला काहीच वाटत नाही. दूध म्हणून आम्ही ते पितो. दूध म्हणूनच पोराबाळांना देतो. देत असताना आमच्या मनात ना खंत, ना विषाद, ना दुःख. द्रोण झाला तरी माणूसच होता. मग आमच्यापेक्षा तो इतका वेगळा कसा! द्रोण नुसता विषाद करूनच थांबला नाही. तो आपल्या बाळपणीच्या मित्राकडे, द्रुपद राजाकडे गाई मागायला गेला. पण राजानं त्याची मागणी ऐकून त्याची निर्भर्त्सना केली. द्रोणाला संताप आला. मग तो कौरवांकडे गेला. द्रोण दरिद्री असला तरी अस्त्रविद्यापारंगत, व्युत्पन्न होता. कौरव-

पांडवकुमारांना अस्त्रविद्येचं शिक्षण देण्याकरिता त्याला कौरवांनी ठेवून घेतलं. राजकुमारांचं शिक्षण पूर्ण झाल्यावर द्रुपदाला शिक्षा देण्याकरिता म्हणून राजकुमारांकडून त्याच्या राज्यावर स्वारी करवून त्याचा पराभव करवला. एवढा सगळा खटाटोप दुधावरून महाभारतकाली द्रोणानं केला. आणि महाभारतकालीन संस्कृतीचा वारसा सांगणारे आम्ही ! किती वेगळे आहोत ! एकतर महाभारताची संस्कृती आमची नाही. नाहीतर महाभारतातील ही कथा कपोलकल्पित असली पाहिजे, खोटी असली पाहिजे.

नुसत्या दुधाचंच का हे ! तुपाची गोष्ट तीच. दुधाला जसं पाणी तसं तुपाला डालडा, तेलाला व्हाइट ऑईल, गव्हाला माती, तांदुळाला गार, भाजीपाल्याला गवत. आज विकत मिळणाऱ्या प्रत्येक वस्तूला कुणी ना कुणीतरी सोबतीला असावंच लागतं. तुम्ही म्हणाल की आम्ही गहूच घेऊ; माती घेणार नाही तर गव्हानं बाजारातून पळ काढलाच. वस्तू हवी असेल तर तिच्या सोबतीला असलेल्या वस्तूलाही घेतलंच पाहिजे. नाहीतर व्यवहारच व्हायचा नाही. एखादा मनुष्य यावर टीका करू म्हणेल तर व्यवहारशून्यातच तो गणला जाईल.

बरं हे व्यापारी, व्यवहारी जीव, तुम्हाआम्हालाच का फसवतात ! नाही बरं. तेवढा प्रामाणिकपणा, सच्चेपणा त्यांच्याजवळ आहे. आपलेच म्हणून आपल्याला फसवायचं, आणि परकीयांना फसवायचं नाही अशी त्यांची रीत नाही. आपल्या राष्ट्राच्या इभ्रतीचा जरी प्रश्न असला तरी ते स्वकीय आणि परकीय असा भेदभाव करायचे नाहीत. अमेरिकेला मँगनीज पाठवायचं झालं तर उच्च प्रतीच्या मँगनीजचे पैसे घेऊन मँगनीजमध्ये हलकं मँगनीज मिसळून पाठवतील. इंग्लंडला गहू पाठवायचे ते माती मिसळवून. व्हाईट ऑईलच्या बिया नसतात म्हणून ! नाहीतर फ्रान्समध्ये जाणाऱ्या तिळात त्यांचा उपयोग नसता का करता आला ?

इथं एक गोष्ट सांगण्यासारखी आहे.

माझ्या एका परिचितानं एक इंग्लिश बिस्किटांचा डबा घेतला. डबा घरी आणून फोडून पाहिल्यावर त्याला आढळून आलं, त्यातली बिस्किटं वाईट झाली आहेत, खाण्यासारखी राहिली नाहीत. डब्यामध्ये एक बोटभर कागदाचा तुकडा होता. त्यावर छापलं होतं, जर आमच्या बिस्किटांविषयी तक्रार असली तर आम्हाला कळवा. त्यानं ती चिठ्ठी आणि तक्रारीचं पत्र इंग्लिश कंपनीला पाठवलं. योग्यवेळी तिचं उत्तर आलं. "ज्या दुकानदाराकडून आपण डबा घेतला त्याच्याकडे तो पोहोचता करा. तो आमच्याकडे पाठवील." त्याने दुकानात डबा नेऊन दिला.

त्यानंतर बरेच दिवस गेले. तो डब्याची आठवणही विसरत चालला होता. अचानक एक पत्र त्याच्या हाती पडलं, त्यात लिहिलं होतं, "आपण केलेली तक्रार अगदी रास्त होती. झाल्या प्रकाराबाबत आम्ही दिलगीर आहोत. आपण तसदी घेऊन आमची चूक आमच्या निदर्शनाला आणली याबद्दल आम्ही आपले आभारी आहोत. आपल्या नावानं आम्ही एक बिस्किटांचं पार्सल रवाना करतो आहोत. आपण ते आमची भेट म्हणून स्वीकारून आम्हाला उपकृत करावं." त्यांच्या नावानं काही दिवसांनी एक भलंमोठं पार्सल आलं, त्यात त्या कंपनीची सगळ्या प्रकारची बिस्किटं होती.

इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये सत्तारूढ पक्षाच्या विरोधी पक्षप्रमुखाला पार्लमेंटमध्ये विशेष सन्मानाचं स्थान असतं, ते काही उगाच नाही.

आता कल्पना करा, हाच प्रकार एखाद्या हिंदी कंपनीच्या बाबतीत झाला आहे.

कल्पना करा कशाला? तुम्ही दिवसा दोन दिवसाआड आगपेटचा विकत घेत असाल. आगपेटचांवर लिहिलं असतं, आत साठ काडचा आहेत म्हणून. ती उघडून पाहिली असता दिसतं, ती

उधारीच्या पोत्याप्रमाणे सव्वा हात रिती आहे. दुकानदाराला दाखवली तर तो म्हणतो, "आम्ही काय आमच्या घरी केली ?" "परत घे" म्हणावं तर म्हणतो "फोडली कशाला ?" पोर्शियानं शायलॉकला उद्देशून, "केवळ एक पौंड मांस काढून घे, रक्ताचा एक थेंब जर निघाला, तर तुला आपल्या प्राणाला मुकावं लागेल." हे वाक्य न्यायालयात म्हटलं असताना त्याची बिचाऱ्याची जशी केविलवाणी स्थिती झाली तशीच आपली होते. साठ काड्यांचे पैसे देऊन तीस-चाळीस काड्यांची आगपेटी घेऊन आम्ही चालू लागतो, काही करीत नाही.

ही माझी वागण्याची रीत, माझ्या सौभाग्यवतीचीही हीच रीत, तुमचीही पण हीच रीत.

आम्ही सगळेच देशाचे कल्याण करायला, भूतलावर त्याला सन्मानाचं स्थान प्राप्त करून द्यायला, त्याला उन्नतीच्या शिखरावर न्यायला उद्युक्त झालो आहोत.

***

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 36654.3 ... वि: ...नि.सं.ल.—
क्रमांक ...1503..... बो. वि: 25/1/60

०५०

मी वाचण्यात अगदी रमून गेलो होतो.

"बाहेर बघ बरं कोण आलंय ते" म्हणून आई जेव्हा दुसऱ्यांदा म्हणाली तेव्हा कुठे मी भानावर आलो. पुस्तकात खूण ठेवली. ते खाली ठेवलं. आणि नाखुषीनेच बाहेर गेलो. दाराजवळ जाऊन बघतो तो मोटारीतून सुमाताई उतरत असलेली दिसली. मी जवळ गेलो आणि तिला नमस्कार केला. पण तिने हस्तांदोलना-करिता हात पुढे केला. अर्थात मला ते करणे भाग पडले. माझ्या मनाला संकोच वाटत होता. पण न करणे योग्य दिसले नसते म्हणून मी धीर केला.

" वा, आमच्याकडे यायला तुला लवकरच अवसर मिळाला ? "

"येईन, येईन, म्हणून मी आपल्या मनाशी केव्हाची घोकत होते, पण योगच जुळून येईना."

"भाग्य आमचं, तो आज तरी जुळून आला. नाहीतर तशाच आपण लाहोरकडे निघून गेला असता. आणि भेट काही झाली नसती आपली. "

इतक्यात आईने आतून आवाज दिला, "कोण आहे रे विनू ? " त्याबरोबर मी सुमाताईला म्हटलं, "चला आत, आई विचारते आहे "

" मग मी खोळंबा करते आहे वाटतं ? घरी कुणी बसायला आलं की त्याच्याशी भांडायचं ? काही चालरीत ? एटिकेट्स ? "

"आणि गावात येऊन पाचपाच दिवस मैत्रिणींकडे रहायचं, मोटारीतून भटकायचं आणि आपल्या काकांच्या घरी मात्र यायचं नाही ! एटिकेट्सच हे ! "

राग आला नाही हे दाखविण्याकरिता तिने हसण्याचा अभिनय केला.

आम्ही दोघेही आईच्या बसण्याच्या ठिकाणी गेलो. आई देवापुढे बसली होती व ताज्या फुलांच्या साजाने देवराया सजला होता. उदबत्त्यांचा मंद सुवास खोलीत दरवळला होता. मी आईच्या शब्दात नास्तिक असलो तरी मला वाटायचं, आपण अशा ठिकाणी बसावं. आणि प्रसन्न गंधयुक्त वातावरणात डुलत रहावं. पण सुमाताईने खोलीत येताच नाकाला रुमाल लाविला. आईने पाट मांडला, त्यावर ती बसली. आणि माझ्याशी कॉलेजसंबंधी बोलायला आरंभ केला. मी उत्तरे दिली. पण ती आईकडे दुर्लक्ष करते हे पाहून मी अस्वस्थ झालो व आईनेच

तिच्याशी बोलायला सुरुवात करावी म्हणून मी म्हटलं, "आई, आज ही कुणाच्या मोटारीतून आली, आहे का माहित ? राव-बहादुर चुरमुऱ्यांच्या."

"खरं का ग ? " म्हणून आईने विचारले आणि तिच्या संसाराविषयी बोलण्यास आरंभ केला.

सुमाताईच्या प्रत्येक हालचालीत, वागण्यात, बोलण्यात, हाव-भावात फरक घडून आला होता. कपड्यावरील सेंट्सचा घमघमाट इतका सुटला होता की गंध्याच्या दुकानाचीच आठवण व्हावी. तिने आपल्या भुवया कोरल्या होत्या व त्यात काळा रंग भरला होता. गालांवर कृत्रिम व भावशून्य गुलाब फुलवले होते. ओठांनाही लाली फासण्यात आली होती. हातांच्या नखांची कापणी चंद्रकोरीची होती व त्यांच्यात क्युटेक्स भरण्यात आली होती. पातळ पळसाच्या फुलाचे होते, नी ब्लाऊज मोरकंठाच्या निळचा रंगाचे. पायात नाजूक कुसरीच्या उत्तर हिंदुस्थानी सपाता होत्या. तिच्या अंगावरील आणि वेषभूषेमधील रंगावरून मोझेक कलेचा नमुना म्हणून कुणालाही कल्पना यावी. ती एका हिंदी सनदी अधिकाऱ्याची बायको होती, सुधारलेली, प्रागतिक होती, हे वेषभूषेवरून कुणालाही कळणे शक्य आहे. व्यक्तिस्वातंत्र्यावर महिलापरिषदेत ठराव मांडणारी होती. आईचे व तिचे बोलणे चालू असताना सुमाताईची राहणी व विचार ह्यांच्यावर माझ्या मनात विचार चालले होते. इतक्यात सुमाताईने आईला एक प्रश्न विचारला. देवाकडे तिने बोट दाखविले व ती म्हणाली, "काकू हे हो काय ? ही फुलं टाकून ठेवली अशी ? " आईने तिच्याकडे पाहिले व ती काहीतरी बोलणार होती. पण मी मध्येच म्हणालो, "सुमाताई, ते की नाही आमच्या इथलं एक नव्या तऱ्हेचं 'पुष्पपात्र' आहे. तुमच्या लाहोर-कडे नाही मिळत का ग असं ? "

हा टोला हाणल्यावर मला समाधान वाटले. आईला तो प्रश्न विचारण्यात तिला सूचित करावयाचं होतं, "काकू तुम्ही किती हो

रानवट ! देवाची पूजा काय करता ? दगडाला फुलं काय वाहता ! " आणि आपण किती सुधारलेल्या आहोत हे तिला दाखवायचं होतं. आईची अशी थट्टा मला मानवली नाही. कारण अशा वागणुकीने तिच्या अंतःकरणावर किती निर्घृण आघात होतो हे मला माहित होते. लहानपणी मला एक गुलाबाचे रोपटे लावायचे होते. तुळस ज्या जागेवर होती तीच चांगली अशी माझी कल्पना होती. म्हणून मी तुळशीचे रोपटे तोडून फेकून दिले. झाला प्रकार प्रत्यक्ष पाहताच आईच्या डोळ्यातून आसवे झरली. आईच्या देवदेवकाची थट्टा मीही करायचा. तिला बोलायला काही नसले म्हणजे एखाद्या लहानशा मुलीप्रमाणे ती म्हणायची, " बरं असू दे आमचं. " आणि हसत आम्ही दोघेही वादविवाद टाकून देत असू. पण सुमाताईच्या मनात भलेपणा नव्हता. आईने तिच्या मनातील खोच ओळखली, आणि एवढ्याचकरिता माझे बोलणे ऐकून ती म्हणाली, " थट्टा करतोस होय पोरीची ? " नंतर बोचकपणा नाहीसा व्हावा म्हणून तिने विचारले, " सुमा, चहा घेशील का ग ? "

" नाही, काकू चहा घेत नसते मी. "

" बरं कॉफी ? "

" अं हं, मी ओव्हलटिन घेत असते. "

" चहाकॉफी अगदीच नाही का चालायची ? "

" छेः बाई ! मला आवडतच नाही. "

सुमाताईची वागणूक मी बघत होतो. त्यात हृदयशून्यता होती. ज्ञानाचे प्रदर्शन होते. आत्मगौरवाच्या अवाढव्य कल्पना होत्या. आधुनिकतेचे स्वरूप दिसून येत होते. केवळ एकच गोष्ट नव्हती.

आणि ती म्हणजे माणुसकी.

जगात सगळीच माणसे आहेत पण त्यांच्यावरून नाव मिळालेला हा सद्गुण माणसांच्या अंगी क्वचितच आढळून येतो.

फारच थोडचांना माणुसकी म्हणून काहीतरी आहे याची जाणीव असते. वागताना आपण आपल्या मनाप्रमाणे वागत असतो. दुसऱ्याच्या मनाची मुळीच पर्वा करीत नाही. आपल्या बोलण्यावागण्यामुळे कुणाला काय वाटेल ! मन दुखेल का ? विनाकारण इतरांच्या मनाला बोचकारे घेतले जातील का ? हे विचार कधी तरी आपल्या मनात येतात का ? माणुसकी तरी काय आहे ? आपल्या प्रत्येक कृतीचा इतरांवर परिणाम काय होईल हे जाणून वागणं म्हणजेच माणुसकी. कुणाची कल्पना असण्याचा संभव आहे, ही गोष्ट अगदी क्षुल्लक आहे. पण माणसांचे प्रत्यक्ष व्यवहार बघावे म्हणजे मात्र अनुभव येतो तो अगदी वेगळाच. अकारण आपण इतरांना विषारी चावे घेत असतो. चारपाच माणसे एखादेवेळी गप्पा झोडायला बसू द्या. त्यांच्यापैकीच एखाद्याकडे गप्पांचा ओघ वळू द्या. शब्दांनी अंतःकरण शतशः विदीर्ण करून टाकतील. सुमाताईने आईच्या देवविषयक भावनांचा उपमर्द केला नसता तर त्यावाचून काही अडून का बसले असते ! ओव्हलटीन घेणाऱ्या सुमाताईने एक दिवस चहा कॉफी घेतली असती तर काय तोटा झाला असता ! आवडी नावडीचा प्रश्न ! पण ज्यांना इतरांची मने कळू शकतात ते कसे वागतात हे पाहण्यासारखे आहे. मला एक म्हातारा माहित आहे. तो एके ठिकाणी जेवायला गेला असता जेवताना भाजीत त्याला झुरळ लागलं. घास त्याने घेतला होता. घास थुंकणे, कुणी विचारणे, आपण सांगणे आणि त्यानंतर यजमानाच्या मनाची स्थिती काय होईल हा विचार येताच त्याने ते घशाखाली उतरविले. माझ्या आजीचीही असलीच एक आठवण मी जपून ठेवली आहे. माझ्या मामाच्या लग्नातील प्रसंग होता. विहिणींचे जेवण चालले होते. माझ्या आजीच्या ध्यानात एक गोष्ट आली, वाढणाऱ्या मुलींच्या हातातील घडचाळांना चामडचाचे पट्टे आहेत. तिने हूं का चूं केले नाही. अगदी निमूटपणे आपले जेवण संपविले. यात मोठेंसे ते काय असे कुणी म्हणेल. माझी आजी जुन्या

विचारात वाढली होती. व पन्नासपंचावन वर्षांचे संस्कार तिच्या मनावर झाले होते. असे असताना ती तणतणली नाही की फणफणली नाही. सगळा प्रसंग सुखाने पार पडू दिला. घरी आली आणि देवाची करुणा भाकली. माणुसकी असली तर अंतःकरण देवाचे होते आणि नसली तर–

सर्वसाधारण दया देखील मनुष्य दाखवीत नाही. एका उन्हाळचात मी पाहिलेला प्रसंग. वेळ दुपारची होती. सूर्य मध्यावरून थोडासा कलला होता. जमीनीवर उघडा पाय ठेवणे अशक्य होते. एक भिकारीण भीक मागत फिरत होती. ती एका दारासमोर येण्याची आणि आतून एका बाईने गाईचा नैवेद्य बाहेर आणण्याची एकच गाठ पडली. नैवेद्य बघताक्षणीच त्या भिकारणीने गयावया केली. पण "तुझ्याकरिता नाही तो नैवेद्य, गाईचा आहे तो" म्हणून तो बाईने दारासमोर ठेवला. आणि ती भिकारीण तो उचलू लागली तो एक धोंडा उचलून तिला मारला.

माणसाच्या जीवनातील लहान सहान असो अथवा राष्ट्रजीवनातील अवाढव्य आणि महत्वाचे प्रसंग असो, माणुसकीच्या अस्तित्वाचा अथवा अभावाचा परिणाम होतोच.

जगातील कोणताही युद्धप्रसंग घ्या. आणि त्या युद्धाची कारणपरम्परा प्रामाणिकपणे बघा. आढळून येईल की, त्यामागे कोणती ना कोणती तरी अमानुष व्यक्ती आहे. तिच्या अंतःकरणातील सात्विक, नाजुक आणि साधारण भावनांचा पार चुराडा झाला आहे, सहानुभूती मरून गेली आहे. रुधिरपिपासा लागली आहे. रक्ताच्या चिळकांड्या दृष्टीला रिझवितात. अंधअपंगांचे विव्हळणे मनाला सुखवीत आहे. या व्यक्तीच्या प्रेरणेने देशादेशाचे सैनिक एकमेकांचा गळा कापायला, जीव घ्यायला चटकन तयार होतात. इतरांनी आपला अपराध केला की नाही ? अपराधाकरिता जीवच घ्यायला हवा का? इतर सौम्य उपाय योजता येतील की नाही याविषयी

विचारच केला जात नाही. रणांगणावर दोन सैन्यांची गाठ पडताच अमानुषतेची पराकाष्ठा होते. जोंधळा कापावा तशी मुंडकी छाटली जातात. सैन्याच्या तुकडयांवर बाँबगोळे टाकले की, मानवी देहाची दीनवाणी वाताहात होते, गावे उजाड पडतात, घरे ओस पडतात, भीषण देखावा निर्माण होतो व मृत्यूचा महोत्सव चालू राहतो. हजारो वाटा त्याला मोकळया होतात. आणि ह्या सगळया विप्लवाला कारण एक माणुसकीविरहित हृदय असते. त्याला इतरांचीही हृदये आपल्यासारखीच करण्यात यश आलेले असते. कोणत्याही युद्धाचा उगम केवळ माणुसकीच्या अभावात आहे.

उलट गढवालच्या शिपायांची वागणूक बघा. शिपाई, सैनिक म्हटला की, त्याच्या अंतःकरणात नाजुक भावना असतील असे वाटतच नाही आपल्याला. परंतु गढवालच्या शिपायांच्या अंतःकरणात माणुसकी होती. जिभल्या चाटीत आलेल्या मृत्यूच्या तोंडाला त्यांनी पाने पुसली, आणि निःशस्त्र जीवांवरचा अत्याचार टाळला. स्वतः अधिकाऱ्यांचा रोष पत्करला. "या निःशस्त्र बांधवांवर आमच्या बंदुकातून गोळचांचा वर्षाव होणार नाही" हे उत्तर अधिकाऱ्यांना ऐकविले. गढवालच्या सैनिकांची धन्य वाटते. त्यांची आठवण सदैव राहते. त्यांनी स्वसुखाचा त्याग केला व अधिकाऱ्यांच्या आज्ञेचा अवमान केला. फाशी अथवा काळे पाणी ह्या दोहोंशिवाय तिसरा परिणामच नाही हे माहित असून ओठांनी निश्चित नकार दिला. ते काळाकडे पाहून तुच्छतेने हसले. कारण माणुसकीच्या वेदीवर आत्मसमर्पण करणारे ते महान त्यागी वीर होते.

* * *

०६०

म्हाताऱ्याला नाना प्रकारच्या वस्तू जमविण्याचा भारी शौक. त्याच्या खोलीत जर तुम्हाला कधी जायला मिळालं तर आपण आहो कुठं याचा खरोखर तुम्हाला काही क्षण तरी संदेहच वाटेल. एखाद्या बोहऱ्याच्या दुकानातील जास्त वस्तूंच्या संग्रहालयात तर आपण प्रवेश केला नाही ना, हाच विचार तुमच्या मनात येईल. म्हाताऱ्याच्या खोलीत तुम्हाला काय आढळणार नाही ! एकावर एक अंथरलेले दहाबारा गालिचे, दहाबारा सतरंज्या, भितीवर खिळचांना अडकवलेल्या पाच सात सतरंज्या, भितीवर खिळे मारून लावलेली हंस दमयंती, श्रीरामपंचायतन, दत्तात्रेय, पिंपळाच्या पानावर पायाचा अंगठा चोखत पडलेला गोपाळकृष्ण ही

व यांच्याच सारखी अनेक चित्रे, एका कोपऱ्यात करवत, वासला, रंधा, पटाशी, कवचा व लाकडाचे तुकडे, एका आलमारीत ठेवलेल्या पोथ्या, दोन तीन झिलई न दिलेल्या लोखंडी पेटचा, एका आलमारीत काजू, किसमीस, बदाम वगैरेंच्या बरण्या, खिळे, बिरंज्या, कबजे वगैरे नी भरून ठेवलेले सिगारेटचे डबे, कोपऱ्यात उभे करून ठेवलेले बासाचे तुकडे, लोखंडाच्या सळाका, एका स्टूलखाली ठेवलेले कोरे करकरीत पुणेरी जोडचांचे जोड, नारळाची दोरी, सुतळी, ट्वाईन, सुया, टाचण्या, साबण, तेले, सुगंधी उटणी,—खरोखर तुम्हाला या खोलीचं संशोधन करायला मिळालं, तर तुम्ही आपल्याशी म्हणाल, "यात आहे सगळं, पण नाही काय ! "

पण एखादेवेळी या खोलीतल्या एखाद्या वस्तूची तुम्हाला गरज लागली आणि म्हाताऱ्याला तुम्ही विचारलं "आहे का आपल्याजवळ ? " तुम्ही आपल्या डोळचानं ती वस्तू बघत असताना देखील म्हातारा म्हणेल "अं हं. "

पण मला एक दिवस "अं हं" हे उत्तर नाही ऐकायला मिळालं. दुसरंच मिळालं.

बाराच्या सुमाराला बघता बघता आकाश भरून आलं. सायंकाळच्या सातचा काळोख पडला. आणि पावसाच्या सरीवर सरी कोसळू लागल्या. बऱ्याच वेळापासून आम्ही बोलत बसलो होतो. माझी जेवायची वेळ झाली होती. त्यालाही मी जेवणाविषयी म्हटलं, पण तो म्हणाला, "नको बाबा, ती रागावते मग. " मग मी त्याला आपली छत्री दिली. व तो निघून गेला. तो गेला व मग मला आठवलं की मला मॅटिनीला जायचं होतं. घरून निघायची वेळ जसजशी येऊ लागली तसतसा माझा जीव वरखाली होऊ लागला. पाऊस थांबण्याचा रंग दिसत नव्हता. उलट तो आवेशाने कोसळतच होता. आता काय करावं याचा विचार करीत असता मला म्हाताऱ्याची आठवण झाली. मी त्याच्याकडे गेलो.

छत्रीची मागणी केली. ते म्हणाले "देतो". त्यांचं हे अनपेक्षित उत्तर ऐकून मला आनंद झाला. ते छत्र्यांसमोर जाऊन उभे राहिले. छत्र्यांवरून त्यांनी नजर फिरविली व मग माझ्या जवळ येऊन म्हणाले, "आता राहू दे ना छत्री. पावसात ओली होईल. कशाला नेतोस ? "

मी आपल्याशीच हसत हसत परत फिरलो. आधीच काढून ठेवलेल्या तिकिटाचे पैसे वाया गेले. पण त्याचं मला काही विशेष वाटलं नाही. कारण "छत्री भिजेल" या म्हाताऱ्याच्या शब्दांनी मला कितीतरी वेळ हसत ठेवलं.

छत्री असते कशाला ? उन्हापावसापासून माणसाचं निवारण करायला आणि हे जर छत्रीला काम नसेल, तर ती केवळ धूळ गोळा करीत कोपऱ्यात उभी राहील. किंवा खिळ्याला टांगली राहील. झुरळं, कोळी, कोल्हे आणि उंदीर यांचं ती निवासस्थानही होईल. आणि अशी छत्री मला तर एकवारही हाती धरावीशी वाटणार नाही. मोल्सवर्थ आणि कँडीच्या मराठी इंग्रजी शब्दकोशात फेरणे या शब्दाचा अर्थ सांगून त्याचा वाक्यात उपयोगही करून दाखविला आहे. घोड्याला फिरवले नाही, आणि विड्याच्या पानांना फेरले नाही तर दोन्ही वाया जातात. आणि हीच गोष्ट छत्रीला नाही का लागू ? इसापानं नांगराच्या फाळावर आणि घोड्यावर तात्पर्यात्मक गोष्टी लिहिल्या आहेत. आणि सार जर आपण काढण्याचा प्रयत्न केला तर म्हाताऱ्यानं "छत्री ओली होईल, कशाला नेतोस" हे म्हणायला नको असेच कुणालाही वाटेल. पण म्हाताऱ्याप्रमाणेच एकदा माझीही स्थिती झाली होती. एकदा मी एक मेणबत्ती विकत घेतली होती. मेणाचा रंग मंद आकाशी निळा होता. मला त्या मेणबत्तीवरून आकाशच आपल्या खोलीत आहे असं पाहताच वाटायचं. जणू काय गगननीलिमाचा एक स्तंभच आपल्या खोलीत उभा आहे. ती उजळली, व तिची ज्योत तेजानं तळपू लागली की अती गोड कल्पना मनात

यायची. एखादी जलदेवताच नुकती समुद्राच्या लाटांमधून वर आली आहे. किंवा एखादी लाट उभी होऊन वडवानलाची चिमुकली ज्योत तिच्या शिरावर तळपते आहे. अशा प्रकारच्या कल्पना रोज मनात येत असल्यामुळे, ती उजळताच आकाश, सागर, जलवीची वडवानल, जलदेवता यांची विशाल व सौंदर्यात्मक दृश्ये डोळ्यांपुढे उभी करीत असल्यामुळे मला ती हवीहवीशी वाटे. पण ती रोज जळत होती, झिजत होती. दिवसादिवसांनी तिचा अंतसमय समीप येत होता. मला वाटे ती जाळू नये, पण ती जळत मात्र रोज होती. मला वाटे ती उजळू नये. पण जर मी ती उजळली नसती तर मी तिच्याकडे ढुंकूनही पाहिलं नसत. ती झिजेल म्हणून न जाळणं, हे म्हाताऱ्याच्या "छत्री ओली होईल, कशाला नेतोस" यातलंच. जळण्यातच ज्या वस्तूच्या जीवनाचं सार्थक आहे तिला न जाळण्यात, न झिजवण्यात अर्थ कोणता ?

मनुष्याचं जीवन ही देखील एक क्षय होत जाणारी व अंती विनाश पावणारी गोष्ट आहे. त्या जीवनाला देखील विशिष्ट कार्य आहे. कुणी जाणीव घेवो अथवा न घेवो. इतर वस्तू आपलं जीवनकार्य करता करता झिजत जातात. प्रकाश देता देता सूर्य मंद मंद होत जातो. धनधान्य देता देता भूमी क्षीण होत जाते. फळ देत देत वृक्ष जीवनाचा त्याग करतो. जगाला जीवन देत देत मेघ नाहीसा होतो. उन्हापावसातून मनुष्याला आसरा देऊन छत्री झिजते आणि मला कल्पनांचं भांडार व प्रकाश देऊन मेणबत्ती विनाश पावते. या प्रत्येकाच्या बाबतीत जीवन सार्थक्याची आणि जीवन विनाशाची सांगड आहे. पण जाणतेपणान विचार करणाऱ्या मनुष्याच्या बाबतीत या दोन गोष्टींची सांगड तुटलेली आहे. आणि त्यामुळे कोणत्याही प्रकारचं जीवनकार्य पार न पाडता, नुसतं झिजतच जाऊन शेवटी निसर्गाकडून घेतलेली माती मरताना निसर्गाला प्रामाणिकपणे परत करायची, एवढंच भाग्य सर्वसामान्य माणसाच्या वाट्याला आलं आहे.

* * *

७

"साहेब थट्टा सोडा आपली, थट्टा आपल्याच अंगावर उलटेल. उंदिरांच्या त्रासातून आपल्या नगराची मुक्तता करण्याकरिता आपण हजार मोहरा कबूल केल्या. त्या मुकाट्यानं द्या. पाच-दहाची गोष्ट बोलू नका. मला माझ्या एक हजार मोहरा हव्या, आणि त्याही ताबडतोब. कंदाहारला मला एका आचाऱ्याकडे जेवायला जायचं आहे. त्याच्या पाकशाळेत विंचवांचा अतिशय त्रास होता. त्यापासून मी त्याला मुक्त केलं. त्यानं मला नम्रपणानं, अगत्यानं आमंत्रण दिलं आहे. मला देवघेवींची भाषा बोलायची नाही. एक पैसाही तुम्हाला सोडणार नाही. माझ्याशी, एका गारुड्याशी गाठ आहे हे ध्यानात ठेवा. माझ्याशी कुणाची

मिजास चालणार नाही. जोवर पुंगी वाजत नाही तोवर पैसे देऊन टाका.––नाहीतर––"

कोतवाल संतापाने लालीलाल झाला. "नाहीतर––काय रे ! भीती दाखवतोस ? आम्हाला त्या कंदाहारच्या आचाऱ्याहून नीच लेखतोस ? भिकार डगला घातला, हातात पुंगी घेतली म्हणजे झालं ! तुझ्यासारख्या भामटचाचे शब्द आम्ही ऐकून घेऊ ? भीक मागून पोट भरणारा तू, तुला एवढी गुर्मी ? धमक्या देतोस ? तू गरीब आहेस, तेव्हा आतावर तुला काहीतरी द्यावंसं वाटत होतं. पण आता ? जा जा फुऽकचि फुऽक ! फुऽकचि फुटे जो ते तुझे रे उर."

संतापाने पुंगीवाला नगरभवनातून बाहेर आला. त्याने आपली पुऽगी वाजवायला सुरुवात केली. नगरातील घराघरामधून सगळं शिशुवैभव बाहेर पडलं आणि त्या पुंगीवाल्यामागून नाचत उडत बागडत, आनंदात हसत गात जाऊ लागलं, नदीपार झालं. पुढे टेकडचा होत्या. एकीचं दार उघडलं, सगळी मुलं आत गेली. दार बंद झालं. एकटंच बिचारं एक पंगू पोर होतं, तेवढं काय ते मागं राहिलं, नगरातून मुलं नाहीशी झाली. सारं हास्य, खेळकरपणा, आनंद, वैभव त्या नगरातून लोपलं.

Pied piper of hamelin या कथाकाव्यातून ब्राउनिंगनं बोधात्मक निष्कर्ष काढला तो असा––

राहू चोख 'मथे' म्हणूनि जगती तू मीहि साऱ्यासह,
मुख्यत्वे परि गारुडचासह मुली, ह्या पुंगिवाल्यासह.
पुंगी वाजवुनी हिरोत मग ते उंदीर की मांजर,
पाळू आपण आपले वचन गे आधी दिले त्या जर.

पण आज या कवितेकडे माझं मन फार वेगळचा दृष्टीनं बघत आहे. ब्राउनिंगनं वरील प्रकारचा निष्कर्ष काढायला एक

विशेष कारण होतं. मॅक्रेडीकडून त्याला पैसे घ्यायचे होते. त्यांच्यामध्ये घासाघीस चालली होती. मॅक्रेडी करारापमाणे वागत नव्हता. तेव्हा ब्राउनिंगला त्याला चमकवायचं होतं, सूचित करायचं होतं, की तुझं नाव लोकांमध्ये मी तिरस्कृत करू शकतो. अप्रतीम काव्य निर्माण करण्याची शक्ती माझ्या लेखणीत आहे. त्याचप्रमाणे वेळप्रसंगी ती विखारही ओतू शकते, दुसऱ्याचा सूडही घेऊ शकते. तेव्हा कुणाचंही देणं ठेवणं योग्य नाही. परिणामी ते घातकच ठरतं.

हा ब्रौनिंगचा निष्कर्ष, हा त्याचा बोध.

पण आज माझी मनःस्थिती फार भिन्न आहे. सामान्य माणसाचं व्यक्तिगत जीवन आजवर मी बघत आलो. रोज बघतो. काळ गतिमान आहे. त्याचं रूप सारखं पालटतं आहे. पण व्यक्तिगत जीवनाचं स्वरूप मात्र होतं तसंच आजही आहे. त्यातील दैन्य, अगतिकता होती ती आजही कायम आहे. ही गोष्ट ध्यानात येताच या कवितेकडे मी फार निराळ्या दृष्टीनें पाहू लागलो. निराळाच अर्थ मला प्रतीत होऊ लागला.

भांडण पुंगीवाला आणि गावकोतवालाचं. एकाला अभिमान आपल्या पुंगीचा, आपल्या शक्तीची त्याला पुरेपूर जाणीव. तर दुसऱ्याला आपल्या अधिकाराचा अभिमान. वचन न पाळण्याचा अपराध केलेला कोतवालानं. त्याचा सूड म्हणून पुंगीवाल्यानं पुंगी वाजवून मुलांना मोहवून आपल्या मागनं नेली. ज्या ठिकाणी मुलं नेण्यात आली ते ठिकाण अत्यंत सुंदर, मुलांना आवडेल असं आहे असं वर्णन मागं राहिलेल्या पंगू मुलानं केलं. अर्थात हे मुलांवर उपकार झाले. पण पुंगीवाल्याची प्रकृती जर क्रूर असती तर त्यानं मुलं उंदिरांप्रमाणेच नदीच्या पात्रातही बुडवली असती. मुलांच्या अन्वयानं कोतवालाचा, नगराचा त्या पुंगीवाल्यानं सूड घेतला. पण ज्या मुलांच्या अन्वयानं, त्यांचं काय ? ती निष्पाप आहेत. कोतवालाच्या किंवा नगराच्या पापात त्यांचा कोणत्याही प्रकारे

हात नाही. एक अद्‌भुतरम्य कथा असं म्हणून भाग सोडला आणि मुलांना आईबापांची, घराची ओढ असेल असं आपण मानलं तर त्यांना होणाऱ्या दुःखाचं काय ? त्यांनी दुःख भोगावं, असं त्यांच्याकडून काय घडलं आहे ? पण या ठिकाणी मुलांच्या मनाचा प्रश्न, त्यांची स्थिती कवीने अप्रस्तुत मानून दृष्टीआड केली आहे. पण सामान्य व्यवहाराच्या दृष्टीने जर आपण या कवितेतील मुलांबाबत झालेल्या वागणुकीकडे बघू लागलो, तर आपल्याला वाटतं, वागणूक अत्यंत गर्ह्य आहे.

हाच क्रम जगातील सामान्य माणसाच्या बाबतीत आढळून येतो, याच प्रकारची वागणूक त्याच्या बाबतीत घडत असते. कुणाच्या ना अध्यात ना मध्यात परंतु इतरांच्या भांडणांचे परिणाम त्याला भोगावे लागतात, मरावं लागतं. डोळ्यांसमोर होत असलेली बायकामुलांची विटंबना उघड्या डोळ्यांनी बघावी लागते. हालअपेष्टा सोसून स्वतःचं भाग्य काढायचा प्रयत्न केला. तो यशस्वी होतो आहे अशा स्थितीत पायाखालचा आसरा फर्रकन ओढला गेलेला पहावा लागतो. वीसपंचवीस जिवांचा आधार म्हणून उभं असलेलं दुकान कुणीतरी जाळताना, आणि ते जळताना बघण्याचा प्रसंग माणसावर येतो. दुकानातील नग न् नग बाहेर काढून जाळला जातो किंवा चोरण्यात येतो. घरातील भांडीकुंडी, गहू, तांदूळ, दागदागिने पळवले जातात. पोटाला चिमटा घेऊन जमवलेला ग्रंथसंग्रह, " बडे पढनेवाले आये " म्हणून " अग्नये स्वाहा" झालेला पहावा लागतो, अंगावरच्या वस्त्रानिशी माणसावर जीव घेऊन पळण्याचा प्रसंग येतो.

बरं, हे सर्व भोगावं लागतं याला कारण भोगणाराचे हात पापाने बरबटलेले असतात, अशातला भाग नाही. कारणं वेगळीच असतात. कुणाचे संबंध असतात, कुणाचं तरी पाप, कुणाचा तरी सूड, कुणाचा हेवादावा, लोकाग्रणी व्हायची संधी. कुणाची निवडणूक, स्वार्थ, या आणि अशाच प्रकारच्या गोष्टी या भोगांच्या, दैन्याच्या

मुळाशी असतात. देशीदेशीचा हा प्रकार आहे. इटाली घ्या, जर्मनी घ्या, फ्रान्स, इंग्लंड, रशिया घ्या, कुणीही घ्या. भांडणं असतात, सूडाची भावना असते, युद्धं होतात. या सगळ्यांमध्ये मरण असतं ते सामान्य माणसाचं. त्याला रणांगणावर ओढून नेतील. त्याची संपत्ती हिरावून घेतील. त्याला देशोधडीला लावतील. देशात चाललेल्या या घडामोडींशी त्याचा काडीइतकाही संबंध नसेल पण बळी जर जात असेल तर तोच. हिरोशिमा आणि नागासाकी या शहरांवर अणुबाँब पडले, असंख्य लोक प्राणाला मुकले, असंख्य जीवनाच्या दृष्टीने नाकाम झाले. राष्ट्राराष्ट्रामध्ये चाललेल्या झगडचांशी, त्यांचा प्रत्यक्ष संबंध काय ?

आता अणुबाँबची पैदास वाढली आहे.

अणुबाँबहून रौद्रतर हायड्रोजन बाँबच्या निर्मितीत शास्त्रीय जग गुंतलं आहे.

इथर बाँबच्याही गोष्टी जगानं ऐकल्या आहेत.

या सगळ्या परिस्थितीविरुद्ध सामान्य मनुष्य काय करू शकतो ? मोठमोठाले शब्द त्याच्या तोंडावर फेकले, त्याला भित्रा म्हटलं, माथेफिरूंच्या समुदायात त्याला उभं केलं की संपलं. सामान्य माणसाचंही डोकं फिरवता येतं. त्याला मारता येतं.

* * *

८८०

बराच काळपावेतो माझ्या संग्रहात एक पुस्तक होतं. ते हिंदुस्थानच्या इतिहासाचं होतं. इंग्रजी, इंग्रज लेखकानं लिहिलेलं, मागल्या शतकात प्रसिद्ध झालेलं. त्या पुस्तकात वैदिक जीवनापासून तर लॉर्ड हार्डिजच्या कारकीर्दीपर्यंतचा इतिहास होता. त्यात पहिल्या शीख युद्धाचं वर्णन होतं. पण पाचसात वर्षांच्या आत घडून आलेल्या डलहौसीच्या कारकीर्दीतील दुसऱ्या शीख युद्धाचं वर्णन नव्हतं. डलहौसीची कारकीर्दच नव्हती. या पुस्तकात काही चित्रंही होती, महत्त्वाच्या स्थळांची. ताजमहालचं होतं. त्या चित्राखाली लिहिलं होतं, 'नूरजहाँ हिच्या स्मरणार्थ शहाजहानने बांधला.' माझ्याजवळ निरनिराळ्या लेखकांनी लिहिलेली हिंदुस्थानच्या इतिहासाची कितीतरी पुस्तकं आहेत, अगदी आजतागायतच्या इतिहासाची आहेत, सरस लिहिली आहेत. तसा मला या पुस्तकाचा काहीच उपयोग नव्हता. आणि तरीही ते पुस्तक मी जपून ठेवलं होतं.

ताजमहालच्या चित्राखाली चुकीचा मजकूर लिहून लेखकानं जे अज्ञान प्रकट केलं होतं, ते मला मोठं मोलाचं वाटायचं. काही वर्षांपूर्वीचा काळ असा होता की एखाद्याचा तेजोभंग करावयाचा असला की इंग्रजांचं उदाहरण देऊन तो केला जाई. आमच्यातला आळस, कर्तृत्वहीनता, मागासलेपणा, स्वत्वाचा अभाव, राष्ट्राचं नाव कलंकित होत असताना देखील थोड्याशा फायद्याकरिता मँगनिजमध्ये माती कालवायची, चहामध्ये पालापाचोळा मिसळायची वृत्ती यापैकी कोणत्याही बाबतीत पाणउतारा करायचा झाला तर, "ते इंग्रज बघा, नाहीतर तुम्ही" या ध्रुपदाने केला जाई. प्रकार अशातलाच होता. काही आईबापांना घाणेरडी सवय असते. दुसऱ्यांची मुलं घरी आली की स्वतःच्या मुलाला सारखे टोमणे दिले जातात. "तो बघ कसा खेळतो, नाहीतर तू!" "तो बघ कसा निमूट बसला आहे, नाहीतर तू!" "ती बघ कशी रडत नाही, नाहीतर तू!" "तो बघ कसा आपल्या आईला काम करू देतो, नाहीतर तू!" या आईबापांसारखीच आमच्यातल्या वडीलधाऱ्यांची बोलणूक होती. या लोकांच्या तोंडावर इंग्रजांमधली वैगुण्यं फेकता यावी म्हणून मी एक कोशच तयार केला होता. मी म्हणायचा, "इंग्रजही एखाद्या गोष्टीविषयी पुरेशी, सत्य माहिती मिळविण्याचा प्रयत्न करीत नाहीत. 'दडपून देतो ऐसाजे' हा प्रकार करतात. आमच्यासमोर तरी इंग्रजांना वानू नका. ते काय आहेत, चांगलं कळतं आम्हाला. हा बघा इंग्रज इतिहासकारानं लिहिलेला इतिहास आणि ज्यांचे तुम्ही स्तुतिपाठक, त्यांचा हा गाढवपणा." अशा प्रकारे वरील प्रवृत्ती असणारांना तोंड देण्याकरिता, खोडून काढण्याकरिता, त्यांचा पाणउतारा करण्याकरिता एक महत्वाचा पुरावा म्हणून मला या पुस्तकाचं महत्व वाटत होतं. पण हे माझं अमोघ अस्त्र कोणत्या इंद्रानं, कोणत्या मिषानं, केव्हा पळवून नेलं, मला आठवत नाही. आज ते पुस्तक माझ्याजवळ नाही. आज पूर्वीसारखा मला त्याचा उपयोग नाही. कारण आपल्या

लोकांची, राष्ट्राला खाली पहावं लागेल, त्याचं अनहित होईल अशा प्रकारची वृत्ती, वागणूक पाहिली की केवळ इंग्रजच काय, पण दुनियेतील अगदी लहानलहानशा राष्ट्रातील लोकांकडे बोट दाखवून " बघा ते राष्ट्राकरिता काय करताहेत, आणि तुम्ही काय करताहात ?" असं पदोपदी म्हणावंसं वाटतं.

या पुस्तकाचं महत्व मला आणखी एका कारणानं वाटायचं. हिंदुस्थानचा त्यात आलेला इतिहास १८४९ पावेतोचा असावा. इतिहासकाराचं नाव मला आठवत नाही. कुणीतरी लहानसाच बिचारा. त्याच्या जीवनाविषयी मला काहीच माहिती नाही. मनात विचार येतो, कदाचित यानं डलहौसीची कारकीर्द पाहिली असेल. यदाकदाचित १८५७ चं स्वातंत्र्ययुद्धही पाहिलं असेल. पण आज जो भारताचा इतिहास आपल्याला अवगत आहे, ज्याचा काही भाग प्रत्यक्ष आपल्या डोळ्यासमोर घडला आहे तो काही या इतिहासकाराला बघायला मिळाला नाही. १८४९ आणि १९५२ ! भारताच्या जीवनातील केवढं मोठं एक पर्वच्यापर्व उलटून गेलं ! डलहौसीची कारकीर्द ! भारतभूमीच्या पटावरील सगळ्या नरदा मारल्या गेल्या आणि इंग्रज सार्वभौम झाला ! १८५७ चं बंड. नागवले गेले, त्यांनी झुंज घेण्याचा यत्न केला. पण अनेक कारणांनी तडफड अयशस्वी झाली. हिंदुस्थानच्या चतुःसीमेत शस्त्रास्त्रांचा खणखणाट थांबला. यापुढचा काही काळ, म्हणजे एखादं गणित चुकल्यावर, वेगळ्या रीतीनं, नीटपणानं सोडवायला घ्यावं अशातला. नवीन, अहेतुक संस्कारांनी नवीन मन निर्माण झालं, त्या मनात नवीन आशा आकांक्षा जीव धरू लागल्या. एका निश्चित दिशेनं, निश्चित रोखानं हिंदुस्थान पावलं टाकू लागला. काँग्रेस अस्तित्वात येऊन तिचं रोपटं जोम धरू लागलं. लवकरच ते रोपटं फोफावलं, त्याचा वृक्ष झाला, अक्षयवटाप्रमाणे त्यानं भारत व्यापलं. अत्याचारांना तोंड देतादेता प्रतिकाराची शक्ती वाढत गेली. राष्ट्र बलशाली

झालं. लोकमान्यांनी स्वराज्याचा मंत्र दिला. महात्माजींनी नवीन ध्येयं, नवीन कार्यक्रम, नवीन मार्ग राष्ट्राला दिले आणि अनेक पुण्यात्म्यांच्या पुण्याईचा परिणाम म्हणून भारत स्वतंत्र झाला.

हा सगळा इतिहास १८४८ ते १९५२ पावेतोच्या काळातला. ज्या इतिहासाच्या पुस्तकाविषयी मी लिहितो आहे, त्याच्या लेखकानं यातलं काही एक पाहिलेलं नसेल. कारण आपल्या दृष्टीनं हा सगळा इति + ह + आस असला तरी त्या लेखकाच्या दृष्टीनं ह्या सगळचा भविष्यकालीन घटना होत, आणि भविष्यकालीन घटना प्रत्यक्षपणे बघता येतील, किंवा शरीराचा विनाश झाल्यावर देखील बघू शकतील, सुखदुःख भोगू शकतील अशा प्रकारचे डोळे आजवर माणसाला लाभले नाहीत. त्यामुळे प्रस्तुत इतिहासकाराला भारताच्या बाबतीत काय बघता आलं नाही हे आपण पाहिलं, पण याच काळात जगताच्या रंगभूमीवर केवढाल्या घडामोडी होऊन राहिल्या होत्या, त्याही त्यानं पाहिल्या नाहीत. क्रिमियाच्या लढाईची वार्ता कदाचित त्यानं ऐकली असेल, आगगाडीतून लहानसा प्रवासही केला असेल, परंतु बिस्मार्कनं जर्मनीचं एकीकरण करण्याकरिता, जर्मन राष्ट्र निर्माण करण्याकरिता खोटी तार स्वतःच पाठवून, जर्मनीमध्ये फ्रान्सविरोधी वातावरण उत्पन्न करून फ्रँको-जर्मन युद्धाला आवश्यक असलेली भूमिका निर्माण करण्याचं जे कार्य केलं, त्याची त्याला गंधवार्ताही नसेल. पोर्ट आर्थरचा वेढा आणि हिरोशिमावरील अणुबाँब हा त्यानं पाहिला नाही. कायसरचा उद्दामपणा आणि जर्मनीतून पलायन हेही त्याला अदृश्यच. हिटलरच्या वाढत्या यशाचा काळ आणि शेवटी अज्ञात अंत हाही त्याला अविदितच. इंग्लंडच्या साम्राज्याचा विकास आणि नंतर संकोच हाही इतिहास त्याला अपरिचित. लेनिन आणि त्याचं विश्वव्यापी कार्य त्याला माहित नाही आणि म्हणूनच वाटतं, शरीर नाहीसं झाल्यावरही बघू शकतील अशा प्रकारचे डोळे आपल्याला मिळावे. आकाशाकडे पाहून पुष्कळदा

माझ्या मुखातून, विश्वनियंत्याला उद्देशून प्रार्थना निघून जाते.

' दिव्यं देहि मे चक्षुः '

भविष्यकाळातील जीवनाविषयी मनुष्याला नेहमीच कुतूहल वाटत आलं आहे. ज्या काळात मनुष्य जीवन जगतो तो त्याला समाधानकारक वाटत नाही. आज भूतलावरील जीवनाचं स्वरूप हेच आहे. त्यात उणीव आहे. आजच्या काळात होत असलेल्या घडामोडी एवढ्या प्रचंड आहेत की त्यांचा जीवनावर परिणाम कसा होणार याविषयीही तो विचार करतो आहे. आल्डस हक्सले, जॉर्ज ऑरवेल, यांनी उद्याचे जीवन पाहण्याचा आणि दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. हिरोशिमावर पडलेल्या अणुबाँबनं विचारवंत कलावंताच्या मनामध्ये जी आंदोलनं निर्माण झाली, त्याचंच दृश्य-स्वरूप म्हणजे Apes and Essence आणि Nineteen eighty-four. अणुशक्तीच्या प्रयोगाबरोबरच हायड्रोजन, इथर वगैरेवर प्रयोग चालले आहेत. नापाम बाँब तयार झाला आहे. प्रचंड शक्ती आज माणसाच्या हातात आहे. पण या शक्तीचा उपयोग कल्याणमय स्वरूपाचा होईल हा मनुष्याचा विश्वास मात्र मरून पडला आहे. अणुशक्ती मानवी जीवनाला पोषक होऊ शकते. पण जगात ती अवतरली संहारक स्वरूपात. लाखो लोकांचा जीव घेऊन अवतरली, अपरिमित संपत्तीचा व्यय करून अवतरली. नगरचं नगर बेचिराख करून तिनं आपल्या शक्तीची जगाला जाणीव करून दिली. देशोदेशीच्या सरकारांचं स्वरूपही माणसाला कळून आलं. युद्धकाली जीवनविध्वंसक साधनं निर्माण करण्याकरिता, युद्ध चालू ठेवण्याकरिता जी सरकारं कोट्यावधी पौंडांचा, डॉलरांचा, रुपयांचा चुराडा करतात, तीच शांततेच्या काळात सर्वसामान्य मनुष्यांच्या गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने काहीच करत नाहीत. उपासमार होईल, वाढेल याच प्रकारचे प्रयत्न चाललेले असतात, सरकारची वागणूक लोकांच्या डोळ्यावर येऊ नये म्हणून वैमनस्याचं बीज पेरून त्याची पद्धतशीरपणे

वाढ केली जाते. हिटलरनं निर्माण केलेला ज्यूद्वेष आणि दुसरं महायुद्ध यांच्यामागे हीच भूमिका आहे. ही परिस्थिती असल्यामुळे मानवाच्या हस्तगत होणाऱ्या शक्तीच्या कल्याणकारकतेवर आज जगाचा विश्वास उरला नाही. हिरोशिमावर बाँब पडला असता तेथील सजीव प्राण्यांवर, निर्जीव वस्तूंवर झालेला परिणाम ध्यानात घेऊन हक्सलेची सृष्टी सिद्ध झाली.

आजच्या जीवनात मनुष्याला मनुष्य या नात्यानं स्वतंत्र अस्तित्व नाही. तो एका मोठ्या यंत्रातलं, एक लहानसं अवजार आहे. त्याला स्वतंत्र मन नाही, सुखदुःख नाही, जीवन नाही, विशिष्ट रीतीनंच त्यानं वागलं पाहिजे, विशिष्ट प्रकारचेच विचार त्याच्या मनात आले पाहिजेत, अपेक्षिलं जाईल ते काम त्यानं बिनबोभाट केलं पाहिजे. यंत्राला तेलपाणी लागतं, पण ही यंत्राची गरज नव्हे. मालकाची गरज म्हणून तेलपाणी दिलं जाईल, माणसाला पोटाला मिळेल, गरजा भागवल्या जातील, काही ठिकाणी या व्यवस्थेमागं मालक नसेल, सरकार असेल, पण परिस्थिती मात्र तीच. मनुष्य आपल्या मनात विचार करू म्हणेल, चाकोरीबाहेर राहू म्हणेल, तर त्याला समाजात जगण्याचा अधिकार नाही, मृत्यूचंच द्वार त्याला मोकळं. या प्रवृत्तीवर उभारलं गेलेलं जीवन ऑरवेलच्या कादंबरीत.

ही तर या दोघा कादंबरीकारांची सृष्टी झाली. मला या प्रवृत्तींवर उभारलं गेलेलं जीवन प्रत्यक्ष बघावंसं वाटतं, म्हणूनच सृष्टिनियंत्याला प्रार्थना 'दिव्यं देहि मे चक्षुः' अजर, अमर असे जर चक्षू मिळाले तर कल्पांतापावेतोचा, नव्हे त्यानंतरच्याही मानवी जीवनाचा, सृष्टिविलयाचा, नवसृष्टीच्या जन्माचा सगळा देखावा मला पाहता येईल.

कुणाची कल्पना असेल, या प्रकारचे डोळे कधी कुणाला मिळाले नाहीत. मिळायचे नाहीत. पण पुराण आणि इतिहासाचा

दाखला वेगळा आहे. स्थलांतरावर मात करणारे डोळे संजयाला लाभले होते. आणि काळावर मात करणारे डोळे महमद गझनवीला मिळाले होते. बसल्या ठिकाणाहून संजयाला विश्वदर्शन घडत होतं, तर शरीराचा मृत्यू झाल्यानंतरही महंमदाचे डोळे गझनवीमधून फेरफटका करीत होते, आपणच निर्माण केलेल्या गझनवीच्या वैभवाचं, सौंदर्याचं दर्शन घेत होते. स्थलांतरावर मात करणाऱ्या संजयाचे डोळे शरीराश्रयी होते. पण महंमदाचे काळावर मात करणारे डोळे अशरीरी होते. या प्रकारचे डोळे मला लाभले तर ॲटम बाँबचा स्फोट होत असताना त्याच्या लोळात उभे राहून कौतुकानं मी त्याची करणी बघू शकेन, गौरीशंकराचं अजिक्यपत्र मी हिरावून घेऊ शकेन, जागतिक महायुद्धाच्या घुमश्चक्रीत शिरून मी ती बघू शकेन, किंवा व्हाईट हॉल, क्रेमलिन, डॉनिंग स्ट्रीट, दिल्ली येथे जगाच्या भवितव्यासंबंधी चाललेली खलबतं मी ऐकू शकेन, अमेरिकेने कोरियातील युद्धात जंतुबाँबचा उपयोग केला की नाही या प्रश्नासारख्या प्रश्नांची उत्तरं मजजवळ तर अगदी तयार असतील.

पण याही डोळ्यांचं दुःख मला माहीत आहे. भवभूतीनं मला या दुःखाची जाणीव करून दिली आहे.

लक्ष्मणानं सीतेला अरण्यात नेऊन सोडल्याला बारा वर्षांवर काळ लोटला होता. शंबुकाचा वध करण्याकरिता राम जनस्थानात आला होता. कैकेयी मातेचा प्रसाद म्हणून लाभलेल्या अरण्यवासाचा काही काळ राम, लक्ष्मण आणि सीतेनं या जनस्थानात पूर्वी काढला होता. राम आल्यावर पूर्वीच्या सहजीवनातील प्रसंगांची आठवण देणारी दृश्यं, स्थळं पाहील आणि आजच्या वियोगावस्थेत अत्यंत दुःखी होईल. म्हणून त्याच्या दुःखाचं हरण करण्याकरिता सीताही जनस्थानात, भागीरथीच्या सांगण्यावरून आली होती. भवभूतीला छायाअंकाच्या योगानं रामसीतेचं मनो-

मीलन घडवून आणायचं होतं, मनामध्ये असलेले किंतू नाहीसे करायचे होते.

भगवती भागीरथीनं "पतीसभोवती अदृश्य रूपानं तुला राहता येईल" असा वर तिला दिला होता. पूर्वजीवनातील सुखदुःखांची स्मृती रामाला व्हायची, हृदयात दुःखाचा कल्लोळ व्हायचा, त्याला मूर्च्छा यायची, मग सीता त्याला हस्तस्पर्श करून चेतना द्यायची. 'तू जीव, तू हृदय, तू मजला विसावा, तू चंद्रिकाच नयना शरिरा सुधा वा'--अशा सीतेचा हा स्पर्श ही जाणीव रामाला व्हायची, जवळपास ती असेल म्हणून तो बघायचा, तो दिसायची नाही. मग सगळा भास मानून तो अधिकच दुःखी व्हायचा, त्याच्या दुःखानं सीता दुःखी व्हायची. सीतेला राम दिसायचा, त्याचं दुःख दिसायचं, वासंती मधून मधून रामाला टोचून बोलायची, सीतेला तिला प्रतिकार करावासा वाटायचा, परंतु राम आणि वासंती यांच्या दृष्टीनं ती आसमंतात, अगदी समीप, नव्हतीच. सीता अशरीरी झाल्यामुळे तिला काहीच करता येईना. वासंतीला सांगता येईना "असं काही बोलू नकोस, बाई," रामाला सांगता येईना, "बघरे, मी तुझ्या सन्निध आहे," नुसते डोळे असलेल्या सीतेची, व्यक्तीची ही तगमग आहे. भवभूतीनं रसराज करुणाचा प्रकर्ष दाखवण्याकरिता नुसते डोळे असलेली सीता निर्माण केली आहे. बघाना, दीर्घ वियोगानंतर पतिदर्शन झालेलं. पण बोलायला मिळालं नाही. रघुकुलाची कीर्ती उज्ज्वल करतील असे पुत्र तिला झालेले, पण रामाला हे तिला कळवता आलं नाही. रामाच्या दुःखाला आपणच कारणीभूत होऊन, त्याच्या दुःखाचं निराकरण करता आलं नाही, ते दुःख नुसतं बघावं लागलं, आणि आपल्या आपल्याशीच व्यथित व्हावं लागलं. शरीराश्रित नसलेल्या डोळ्यांचं हे भाग्य आणि हेच डोळे मला लाभावे ही मला आशा आणि कशाला म्हणाल, तर पंचमहाभूतांनी शरीराचा आपआपला अंश काढून घेतल्यावरही माझे डोळे रहावे म्हणून, कल्पांतावर जगात काय काय घडलं जातं हे पाहत राहण्याकरिता.

संपूर्ण विश्व कधी काळी सुखी होईल असा विश्वास माणसानं धरणं हा एक वंचनेचा प्रकार आहे. माणसाचं मन आणि माणसा-माणसाचे संबंध असे नव्हत की जगात समृद्धीचं, शांततेचं, सुखाचं साम्राज्य नांदावं. वासना आणि भावना यांच्यामधून निर्माण होणारी अहमहमिका, अत्याचार, अहंकार, अमानुषता, अनृत यांचा एवढा प्रचंड थयथयाट सदाचा राह्यचा आहे की, आपण सुखी व्हावं असं वाटणारालाही सुखी होता यायचं नाही. प्रत्येक युगाचं एक मनोराज्य असतं. त्याच्या साफल्याची आशा मनाशी बाळगून मानवसमाज जीवनपथ आक्रमीत असतो. हे मनोराज्य प्रत्यक्ष नावारूपाला आणण्याकरिता तो आटोकाट प्रयत्न करतो. त्यातील विफलता कळून आल्यावर नवीन मनोराज्य निर्माण होतं. ही सगळी क्रिया व्यक्तिगत जीवनाला तुच्छ मानणारी आहे. मग ही व्यक्ती बुद्ध, नेपोलियन, लेनिन, हिटलर, गांधी, आइनस्टाईन—कुणीही का असेना ! हा सगळा खेळ चाललेला असताना, तो बघत असताना, नुसते डोळेच ज्या व्यक्तीला आहेत, ती पदोपदी दुःखी होईल. डोळे जेव्हा शरीराश्रित असतात तेव्हा ते स्वतःच्याच सुखदुःखात रमलेले असतात. शरीराचा आश्रय नसलेले डोळे दुसऱ्याचंच दुःख बघायला असतात. प्रॉमिथिअसचं दुःख कधीही न संपणारं, त्याचप्रमाणे या डोळ्यांचं देखील. या डोळ्यांना जगाच्या विध्वंसाची खलबतं चाललेली दिसतील, लक्षावधी लोकांच्या मुखातील भाकरी ओढली जात असताना दिसेल, सगळ्या जगाचा एका क्षणात लोळागोळा करता येईल या प्रकारच्या साधनांच्या शोधाचे प्रयत्न चाललेले दिसतील, पण जगाला या गोष्टींची जाणीव देता यायची नाही. ज्या गतत मनुष्य पडणार त्या गतच्या दिशेनं पडणारी त्याची पावलं वळवता यायची नाहीत. हे दुःख नाहीसं करणारं एकच साधन आहे, मृत्यू. पण हे डोळे मरायचेही नाहीत. वाहत्या व्रणांचं दुःख शरीरावर घेऊन युगायुगातून अश्व-त्थामा जगतो आहे ना ! चिरंजीव आहे तो. चिरंजीव डोळे !

म्हणूनच वाटतं.

जे काय आयुष्य जीवंतिकेनं ललाटलिखित केलं असेल, आणि पाचवी पूजली जात असताना सटवीनं जे काही सुखदुःख भाग्यात गुंफून ठेवलं असेल, तेवढं भोगून, तेवढं पाहूनच जीवननिवृत्त होण्यात शोभा आहे. त्याहून अधिक आशा करणं अतर्क्य अशा अनंत यातनांना आवाहन करणं आहे. अशरीरी होऊन सुखदुःख भोगण्यापेक्षा शरीरी राहून सुखदुःख भोगणं हे केव्हाही सुखाचं. इंद्रियगम्य सुखदुःख परिमित काळाचं असतं. इंद्रियविहीन दुःख ! त्याचं स्वरूप कोण जाणतं ! मग उगाच अशरीरी दृष्टीची आशा धराच कशाला ! इच्छा करा कशाला !

***

०१०

मी फिएस्टा हा चित्रपट पाहिला. मला तो आवडला. मेक्सिकोमधील सुंदर नृत्य, त्यातील देखावे, अकिम टॅमिरॉफची भूमिका, माणसाचे हृदय खालीवर करणारे वृषभयुद्ध, संगीत, आणि चित्रपटातली साधी कथा--

पिता एक प्रसिद्ध 'मॅटॅडॉर्' (बैलांशी झुंज खेळणारा) असतो. त्याला दोन जुळी मुले, एक मुलगा व एक मुलगी. मुलाने आपला पेशा स्वीकारावा, त्यातच त्याने लौकिकवान व्हावे, मेक्सिको, स्पेन या देशांमध्ये तो सगळ्यात मोठा मॅटॅडॉर् व्हावा, ही त्याची आशा असते. तिला अनुसरून बालपणापासून त्याला तालिम दिली जाते. जसजसा मुलगा वाढत जातो तसतसा बापाचा

त्याच्या कर्तृत्वाविषयीचा विश्वासही वाढत जातो. हे चालले असताना त्याच्या अंतःकरणात संगीताविषयी प्रेम निर्माण होऊन त्याच्याविषयी त्याला आसक्ती वाटत असते. तो संगीताची रचनाही करतो, व एक थोर संगीतकार त्याच्या कार्याची मातब्बरी ओळखून त्याची भेट घ्यायलाही येतो. पण बापाला त्याच्या संगीतातील प्रगतीविषयी ना आस्था, ना सहानुभूती. या परिस्थितीतून कथेतील संघर्ष निर्माण होतो. नंतर, मुलगा तयार झाला असे वाटताच एक दिवस मुक्रर होतो. त्या दिवशी मुलगा रिंगणात उतरतो. हजारो प्रेक्षक त्याचे कौशल्य बघायला आलेले असतात. आरडाओरड, हशा, उत्तेजनाच्या आरोळया यांचा कोलाहल चाललेला असतो. मुलगा रिंगणात येतो व प्रेक्षकांना अभिवादन करतो.

आणि याच वेळी त्याची आई--

आपल्या खोलीतून दुसऱ्या दालनात जाते. यात एका भितीला लागून मरिआची मूर्ती असते. समोर अर्धवट जळलेली मेणबत्ती जळत असते. ती मरिआपुढे येऊन गुडघे टेकते, छातीवर क्रॉस करते, व मनातल्या मनात मुलाकरिता मरिआजवळ प्रार्थना करते.

या प्रार्थना करणाऱ्या आईकडे बघता-बघता एका दुसऱ्या आईची मूर्ती माझ्या डोळ्यांपुढे उभी राहिली. तिचाही मुलगा मॅटॅडॉर् आहे. बैलाशी झुंज खेळायला, रिंगणाकडे जायला तो निघाला आहे. तो आईजवळ येतो. आई गुडघ्यावर बसून फडक्याने फरशी स्वच्छ करून राहिली आहे. ती आपल्या मुलाकडे बघते; तिचा कंठ दाटून येतो. ती मुलाला म्हणते, "तुझे वडील जेव्हा त्या रिंगणाकडे जायला निघत, तेव्हा माझं हृदय--सांगू काय तुला ? प्रत्येक वेळेला मरणाहून भयंकर यातना मी सोसत असे. तूही त्यांच्याच पावलावर पाऊल टाकलंस. जेव्हा-जेव्हा तू रिंगणात प्रवेश करशील, लोक तुझं कौतुक करतील. पण तमासगीर लोकांना तुझ्या जिवाचं काय ? आज तू आहेस, उद्या आणखी कुणी दुसरा.

करमणुकीला त्यांना काही तोटा नाही. पण मी !—मला !—तू आता जाशील. मी मेल्यासारखी पडून राहीन, मरणाच्या यातना सोसत राहीन, तुझ्या पावलांचा आवाज ऐकू येईपावेतो— "

फि ए स्टा मधील आईदेखील या ब्लड् अँड् सँड् मधील आईचेच उद्‌गार आपल्या मनाशी उच्चारीत असेल.

—आणि या दोन आयांमधेच सगळी आईची जात समावली आहे.

मुले रिंगणात जाताहेत. रिंगणात एकदा उतरल्यावर सहजपणे, आपल्या मर्जीने, आपल्याला हवे म्हणून, मनाला रिंगणात राहावेसे वाटत नाही म्हणून, मन कच खाते म्हणून, बाहेर येता येणार नाही. हजारो लोकांचे डोळे त्याच्यावर खिळले आहेत. त्याने बैलाला मारले पाहिजे. अथवा बैलाच्या शिंगांनी मरण तरी ओढवून घेतले पाहिजे. म्हणजे मानहानी व्हायचा प्रसंग तरी येत नाही; कारण प्रेतेही वाजतगाजत मिरवतात, त्यांचाही सन्मान होतो.— रिंगणाचे दार उघडते. एक मस्त, माजलेला, गलेलठ्ठ बैल हुंदडत रिंगणात येतो. मृत्यूचीच साकार मूर्ती! ज्याला खेळ खेळता येत नसेल त्याचे मरण. गाफिलपणा, मनाचा कमकुवतपणा, मनगटातील अपुरे सामर्थ्य यापैकी काहीही आढळले तर मृत्यू तडाखा हाणून त्याला जमिनीवर लोळवतो.

आणि गरीबापडी त्याची आई ! त्याची जन्मदात्री ! तो सुरक्षित, सुखरूप राहावा म्हणून देवाजवळ प्रार्थना करीत असते, आतल्याआत रडत असते. डोळ्यातून करुण, मूक आसवे झरत असतात. मरणाचे थैमान हृदयात चाललेले असते. विद्ध प्राण्याप्रमाणे अंग जमिनीवर पडलेले असते.

हेच आईचे नेहमीचे चित्र.

युद्धे निर्माण होतात. पुष्कळ मुलांच्या अंगात वीरश्रीचे वारे शिरते. कित्येक भीरुपणाची भीती, लाज वाटत असल्यामुळे सैनिक

होऊन रणांगणावर जातात, कित्येकांना ध्येयवाद, मानवतेचे कल्याण, विश्वबंधुत्व, राष्ट्र, वगैरे शब्दांनी गुंगी आणून रणांगणावर ओढून नेले जाते.

आणि अशा वेळेला सगळी आईची जात–
भितीवर उभी असलेली मरिआची मूर्ती !
अर्धी जळून गेलेली व जळत असलेली तिच्यासमोरची मेणवत्ती.

समोर गुडघे टेकून
प्रार्थना करणारी,
आतल्या आत रडणारी
फिएस्टा मधील 'आई'.

***

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ..... दि: .....
क्रमांक ..... दो: दि: .....

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. .....

०१००

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात नामवंतांची नामावली खूब मोठी आहे. अनेक थोर पुरुष होऊन गेले. समाजसुधारक, राजकारणी, लेखक, इतिहासकार, संशोधक, कवी—नाना परीचे थोर लोक होऊन गेले. यांच्यापैकी काहींचं दर्शन मला घडलं. पण किती तरी महाभागांच्या दर्शनाचा लाभ मला झाला नाही. कित्येकांचा अवतार मी जगात अवतीर्ण होण्याच्या अगोदरच संपला होता. पण किती तरी असे होते, आणि आहेत की ज्यांचं दर्शन होणं शक्य होतं, आणि आहे. पण त्यांना मी डोळ्यांनी बघू शकलो नाही. या व्यक्तीमध्ये दोन अशा आहेत की ज्यांचं प्रत्यक्ष दर्शन न घडल्यामुळे आजही मनाला हळहळ वाटते, जीवनात काही

तरी उणं राहिल्याची जाणीव, आकस्मिकपणेच, एखादे वेळी होते. ह्या दोन व्यक्तींपैकी एक म्हणजे लोकमान्य टिळक, आणि दुसरी व्यक्ती म्हणजे राम गणेश गडकरी.

टिळकांचं नाव मी पहिल्यांदा ऐकलं तेच मुळी त्यांच्या देहांताच्या दिवशी. मी असाच घरात कठडचाशी उभा होतो. नाते-वाईकांपैकी एकानं मला खोल गेलेल्या आवाजात सांगितलं, "आज एक दुःखाची गोष्ट घडली. टिळकमहाराज गेले--" वाक्यातला अर्थ कळला. पण त्याहून जास्त असा कोणताही संस्कार मनावर झाला नाही. थोडचा वेळाने मी घराबाहेर पडलो. रस्त्यावरील टेलिफोनच्या खांबावर लहान लहान कागद लावण्यात आले होते. कुतूहलाने खांबाजवळ जाऊन पाहिलं. एका कागदावर छापलं होतं--

"आकाशाची कुऱ्हाड कोसळली !
लोकमान्य टिळक इहलोक सोडून गेले."

काही तरी विशेष प्रकार आहे असं वाटलं. पण याशिवाय कोणताही आघात मनावर झाला नाही. जसजसा काळ जाऊ लागला तसतसा लोकमान्यांच्या आणि लोकमान्यांविषयीच्या साहित्याचा परिचय वाढत गेला. जसजसा परिचय वाढत गेला तसतसे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे पैलू दिसून त्यांना पाह्यला हवं होतं, हा विचार मनात सारखा उसळू लागला. पण त्यांचं देहावसान झालेलं असल्यामुळे या विचाराबरोबर अंतःकरणात नुसती हुरहूर मात्र भरून राहिली.

असंच गडकऱ्यांचं देखील.

गडकऱ्यांच्या साहित्याशी, काव्याशी माझा परिचय झाला. त्यानं मनाला भुरळ घातली. आज त्यांचं स्वतःचं साहित्य तर मी संपूर्ण वाचून काढलंच आहे; पण इतरांनी, त्यांची स्मृती जागवण्याकरिता, त्यांचं गुणगान करण्याकरितां, त्यांच्या साहित्यातील

केवळ दोषदिग्दर्शन करण्याकरिता, गडकऱ्यांच्या साहित्याला कुणी चांगलं म्हटलं म्हणून आलेला संताप व्यक्त करण्याकरिता, उपलब्ध झालेली नवीन माहिती वाचकांसमोर ठेवण्याकरिता, म्हणूनही जे जे लेखन केलं तेही मी वाचलं. या सगळ्याच्या योगाने त्यांचा स्वभाव, त्यांची संभाषणचातुरी, त्यांची तल्लख बुद्धी, त्यांचं काव्यात्म भावविवश अंतःकरण यांचं ज्ञान झालं. गडकऱ्यांना आपण एकदाही जरी प्रत्यक्ष पाहिलं असतं तरी ती केवढी भाग्याची बाब आपल्या जीवनात झाली असती, हा विचार मनात येतो. गडकऱ्यांच्या साहित्याची थोरवी मी अंधभावानं मानत नाही. त्यात दोष आहेत. ते ठळकपणे उठूनही दिसतात. पण नुसत्या दोषांवरूनच साहित्याची पारख होत नाही. गडकऱ्यांच्या साहित्यातील गुण इतके प्रभावी, आकर्षक आहेत, की त्यांनी मन मोहून जावं आणि त्यातील प्रमादाबाबत उपेक्षेची भावना अंतःकरणात निर्माण व्हावी. त्यांच्या साहित्याबाबत माझ्या अंतःकरणात श्रद्धा आहे, निष्ठा आहे. यामुळे महाराष्ट्रभाषामाउलीचं सौंदर्य वृद्धिगत करणाऱ्या राम गणेशांना आपण पाहिलेलं नाही, या गोष्टीची मनाला खंत वाटते, हळहळ वाटते आपल्या आयुष्यात काही उणेपणा राहून गेला या गोष्टीचा मनाला विषाद वाटतो.

थोरांचं दर्शन ही एक मोठी पर्वणी असते. जीवनात अलौकिकाच्या साक्षात्काराचा क्षण क्वचितच येतो. थोरांच्या दर्शनाने तो साक्षात्कार होतो. सायंकाळच्या धूसर वातावरणात सृष्टीला रविकरस्पर्शाने सुवर्णद्वारकेचं रूप प्राप्त होतं, त्याचप्रमाणे आपल्या जीवनातील थोरांच्या दर्शनाच्या क्षणांना विलक्षण झळाळी प्राप्त होते. तलम रेशमी असा एखादा शुभ्र विरल मेघ चंद्रकिरणांनी दैदीप्यमान व्हावा, तसाच थोरांच्या दर्शनाचा क्षण आपल्या जीवनात कांतिमान, प्रकाशमय होतो. त्याला अक्षयता प्राप्त होते. तांब्यांच्या कवितेतील भावना आपल्या ओठातून शब्दरूपाने प्रकट होते. "क्षण सुवर्णकण झाले रमणा..." हे क्षण म्हणजे जीवनाचा,

जिवाभावाचा एक अमूल्य ठेवा होतो;—ठेवा असा की ज्यामधलं सुख कधीच संपत नाही.

टिळक आणि गडकरी यांना पाहण्याचा क्षणच माझ्या जीवनात आला नाही. त्यामुळे हळहळ वाटत असूनही मी स्वतःला दोष देत नाही. दर्शन झालं असतं तर बरं झालं असतं असं वाटतं. पण दर्शन होण्याची शक्यता नव्हती, याचीही जाणीव असते. त्यामुळे खेद होतो, पण दुःख होत नाही. पण पाहण्याचा क्षण आपल्या आयुष्यात आला होता, तो आपल्या आटोक्यात होता, आणि तरीही कोणत्याही कारणानं का होईना, आपण तो हातचा गमावला याचा मात्र आपल्याला मनस्वी संताप येतो. आज काही गोष्टींचं माझ्या मनाला खरोखरच समाधान आहे. अठरा वर्षापूर्वीची गोष्ट. अब्दुल करीम खाँसाहेब नागपूरला येणार आहेत, आणि व्यंकटेश नाटकगृहात त्यांचे दोन जलसे व्हायचे आहेत, हे मला कळलं. पैसे हाताशी नव्हते. कुठून पैसे मिळू शकतील याविषयी मी पुष्कळ विचार केला. पण एकही स्थळ गवसेना. एखाद्या मित्राकडे मागायचे म्हणजे 'भाईके भरोसे दो दो लुगाई' अशातली गत. मग एक युक्ती सुचली. राजाराम ग्रंथसंग्रहालयाचा मी सदस्य होतो. त्यात तारणाचे तीन रुपये ठेवले होते. त्याची आठवण झाली. ठरवलं की सदस्यत्व त्यागायचं, तीन रुपये काढून घ्यायचे, हाती आलेल्या पैशानं जलसा ऐकायचा. तसंच केलं. पण एक जलसा ऐकून मन हपापलं, दुसराही जलसा ऐकला. आगखी एकदोन झाले असते तर तेही सोडले नसते. पण या वेळेला जलसा ऐकायचं टळलं असतं, तर मात्र जन्माची रुखरुख पदरी आली असती. स्वतःला जन्मभर शिव्याशाप देत राहिलो असतो. यानंतर खांसाहेब पुन्हा आमच्या गावी आले नाहीत. वर्षा दोन वर्षातच त्यांचा इहलोकवास संपला.

असंच नारायणराव राजहंस—बालगंधर्व—यांच्या बाबतीत. १९२८ मध्ये गंधर्व मंडळी उमरावतीला होती. मला उमरावतीला

जाण्याचा प्रसंग आला. याच वेळी मी त्यांची 'एकच प्याला' आणि 'स्वयंवर' ही नाटकं पाहिली. तेव्हा ती पाह्यला मिळाली हे मी भाग्यच समजतो. कारण तेव्हाचे ते क्षण आजही माझ्या जिव्हाळचाचे आहेत. आज नारायणरावांना रंगभूमीवर पहिल्यांदाच पाहणारा प्रेक्षक उद्‌गारतो, "हेच का बालगंधर्व ?" पण आमचे बालगंधर्व मात्र 'हेच' नसतात. ते असतात पंचवीस वर्षांपूर्वी मी पहिल्यांदा पाहिलेले. तेव्हा त्यांना पाहण्याची आलेली संधी जर मी गमावून बसलो असतो, तर माझं एक निष्ठेचं, अभिमानाचं स्थान मी गमावलं असतं.

आज एका गोष्टीची स्मृती मात्र माझ्या मनाला छेडत राहते. एका प्रसंगाची स्मृती होताच जीवनसमृद्धीचा केवढा मोठा क्षण आपण, अजाणतेपणानं का होईना, पण गमावला या गोष्टीचं दुःख वाटू लागतं.

मी मराठी पहिली-दुसरीत असेन त्या वेळी. गावात एक नाटक कंपनी आली होती. विद्यार्थ्यांना सवलतीचे दर होते. आणा दोन आण्याहून जास्त खर्च नव्हता. नाटकाचं स्थळ घरापासून लांब नव्हतं. या कारणांनी घरून नाटकाला जायला परवानगी मिळाली. आज प्रयत्न करूनही, त्या दिवशी नाटक कोणतं होतं हे आठवत नाही. रात्री नवाला नाटक होतं. जेवण उरकलं आणि घराबाहेर पडलो. जिकडे तिकडे अंधार होता. गावात रस्त्यावर दिवे लागत की नाही हे आज आठवत नाही. अंधाऱ्या गल्लीतून नाटक ज्या वाड्यात होतं त्याच्या एका दाराजवळ जवळ जाऊन मी उभा राहिलो. वाडा अजस्र, एखाद्या किल्ल्यासारखा होता. वाड्याभोवती उंच भिंत होती. मला माणसं दिसत ना. कुठं दिवाबत्तीचा उजेड दिसेना. थोडा वेळ थांबलो. मग घराच्या दिशेची वाट धरली. परत जाताना मनात एक समाधानाचा विचार होता. नाटक संपल्यावर घरी परतायच्या वेळेला खूप रात्र झाली असती, जाताना भीती वाटली असती. पण आज--तो आलेला

सुवर्णक्षण आपण घालवून बसलो याची मनाला खंत वाटत राहते. कारण नाटक मंडळी होती शाहूनगरवासी,—गणपतराव जोशांची.

एकदा बालगंधर्वांचा सहवास मला लाभला होता. बोलण्याच्या ओघात ते म्हणाले होते—कोणत्या संदर्भानं, कोणत्या प्रश्नाचं उत्तर म्हणून, कुणी प्रश्न विचारला होता की काय हे काहीच ध्यानात येत नाही, त्यांचे उद्‌गार मात्र आठवतात, "आम्ही कसचे नटसम्राट ! नटसम्राट तर एकच झाले,— गणपतराव जोशी." गणपतराव जोशांना बघायचं भाग्य ज्यांना लाभलं, ते जेव्हा त्या थोर नटाच्या स्मृती सांगू लागतात तेव्हा त्यांच्या वाग्गंगेला पूर येतो. कुणी त्यांच्या हॅम्लेटची, झुंझाररावाची तारीफ करतो. कुणी त्यांच्या आवाजाची झार वाखाणतो, कुणी रंगभूमीवर आले असता भलत्याच नाटकातली वाक्यं ते बोलू लागले, पण त्यांना त्या दिवशीच्या नाटकाची आठवण करून देताच गाडी रुळावर आली, ही आख्यायिका सांगतो. नुकतीच माझ्या एका मित्रानं त्यांच्याविषयीची आख्यायिका सांगितली. गणपतराव 'माझी बहीण' या नाटकात भावाची भूमिका करीत. आधी गणपतराव अगदी शांत असत. नंतर ते दाराच्या दिशेनं, विंगच्या रोखानं पावलं टाकीत. दारात क्षण दोन क्षण उभे राहात. नंतर "ताईऽऽ" म्हणून आर्त किंकाळी फोडीत. त्यांच्या त्या किंकाळीमध्ये सगळचा विश्वातलं कारुण्य प्रतीत होई. जो जो त्यांच्याविषयी बोलतो तो तो आदरानं, कौतुकानं, अभिमानानं बोलतो. ज्यांना ज्यांना गणपतराव बघायला मिळाले नाहीत त्यांना त्यांना तो अभागी समजतो. माझ्या आयुष्यात गणपतरावांना बघायची संधी आली होती, पण त्यांचं नाटक पाह्यचं मात्र माझ्या भाग्यात नव्हतं. मी जर त्यांना पाहिलं असतं, तर इतर भाग्यवंतांप्रमाणे इतरांना त्यांच्या कथा मी सांगितल्या असत्या.

परंतु आलेला प्रसंग गेला. तेव्हा काही वाटलं नाही, पण आज आपली केवढी हानी झाली याची जाणीव होते. मग मन आपल्याशी खेद करू लागतं, ते स्वतःशी दुःख करू लागतं.

***

०११०

रा. रा. श्रीमानजी यांच्याकडे पडवीत ठेवलेल्या बाकावर मी बसलो होतो. बरोबर बोलायला कुणी नव्हतं, म्हणून घरून निघताना बरोबर घेतलेलं गुण्यांच्या युरोपच्या प्रवासाचं पुस्तक वाचीत होतो व त्यातच मन रमवीत होतो.

वाचीत असता मी सहज दृष्टी वर केली.

सामानाने भरलेली अेक गाडी बंगलीच्या आवारात प्रवेश करीत होती. पाहिली ती, आणि पुन्हा पुस्तक वाचू लागलो.

चाकाची घरघर आणि कुअीकुअी असा आवाज कानावर आला, म्हणून पुन्हा त्या गाडीकडे माझी नजर गेली. गाडीवानानं

जू खाली ठेवलं. आणि सामान अुतरण्यापूर्वी विसावा घ्यायला म्हणून तो थांबला. मग मी विशेष नजरेने त्याच्याकडे बघू लागलो.

गाडीवान म्हातारा होता. सरकारी नोकरी केली असती तर पंचवीस तीस वर्षे त्याने सरकारकडून पेन्शन घेतली असती. गाव-कुचाळक्या व कधी मधी "हरी हरी" करीत राहिला असता. त्याचं अुतारवय त्याच्या अंगावर स्पष्ट दिसत होतं. खचलेली कंबर, मांसहीन क्षीण बाहू, डुलणारी मान, प्रखर अुन्हानं तापून निघालेल्या, भेगा पडलेल्या धरित्रीप्रमाणे दिसणारा भालप्रदेश, यावरून त्याने झुंजत आक्रमिलेला कालप्रवाह कुणालाही आकळता येता. थकून गेल्यामुळे म्हणा, अथवा अन्य कारणाने म्हणा, त्याने गाडी पडवीच्या पायऱ्यांपासून काही अंतरावर अुभी केली होती. थोडा वेळ विसावा घेतल्यावर त्याने सामानाला हात घातला; पण मी पुढे झालो व म्हणालो, 'थांबा थोडे, आपण गाडी लोटून पायऱ्यांजवळ नेअू. सामान अुतरवायला सोपं पडेल.' दोघांनीही चाकाला हात घातला. गाडी मागे ढकलली. म्हातारा सामान काढू लागला व मी जाअून बाकावर बसलो; आणि आपलं पुस्तक वाचू लागलो.

सगळं सामान काढून झाल्यावर म्हातारा माझ्याजवळ आला व अुभ्यानंच गोष्टी करू लागला. 'बसाना' मी म्हणालो. तो संकोचानेच बाकावर बसला. त्याला अजून पैसे मिळायचे होते. अेवढ्या वेळात आम्हाला बोलायला थोडंसंच मिळालं. पण त्या लहानशा अवसरात मला अेका महावृक्षाचा परिचय झाला.

म्हातारा अैंशी वर्षांचा होता. सगळी अुमर त्याने गाडी ओढण्यात घालविली होती. गाडीला बैल त्याने कधीच जुंपला नव्हता. स्टेशनाच्या दाराजवळ सकाळी गाडी घेअून उभं राह्यचं. सामान मिळालं की गाडीत भरायचं. गाडी ओढीत ओढीत ज्याचं त्याला पोहोचतं करायचं. कुणी दोन आणे देत, कुणी चार देत.कुणी पोटावरही मारी; पण म्हातारा नुसतं 'नारायणाची अिच्छा' अेवढंच म्हणे,

हुज्जत घालीत नसे. दिवसापुरतं मिळालं की गाडी वळवी. अुद्याची काळजी नाही. "आज रामप्रभूनं दिलं, अुद्या रामप्रभू देअील, पैसा गाठी कशाला बांधायचा अुगीच ? दुसरा कुणी घेअील खाअील." हा त्याचा विश्वास नी भावना. म्हाताऱ्याला दोन मुले आहेत. दोघेही नागपूरला राहतात. आपला संसार करतात.

"तुम्हाला काही नाही पाठवीत ? अुतार वय तुमचं !" मी सहज म्हणालो. म्हाताऱ्यानं अुत्तर दिलं, "मला काय कमी आहे म्हणून मी त्यांच्याकडून घेअू ? ते सुखात आहेत ह्यातच मला सुख आहे." म्हाताऱ्याच्या घरी त्याच्या दोन नाती आहेत. पाच सहा महिने झाले, त्याची अेक मुलगी वारली. "कशी शाहण्यासारखी गेली माझी बया ! स्वतःला त्रास नाही. दुसऱ्याला त्रास नाही. तिची दोन पाखरं आहेत आता माझ्याजवळ. त्यांची कधी कधी काळजी वाटते; पण मग माझ्या वेडेपणाचं मलाच हसू येतं. राम माझी काळजी वाहतो, जगाची वाहतो, चंद्रसूर्याची वाहतो. आणि आअीविना पोरकी पोरं ही, यांचीच त्याला काळजी नसेल !" म्हाताऱ्याचा कंठ सद्गदित झाला होता. दाटून आला होता. त्याने आपली शांत गंभीर दृष्टी आकाशाकडे वळविली व म्हणाला, "दीन दयाघन !" आणि त्याने भक्तिभावाने नमस्कार केला.

आम्ही दोघं बोलत असताना अेक युवती तिथं अुपस्थित झाली. तिने म्हाताऱ्याला विचारलं, "किती पैसे द्यायचे ?"

"हवं ते दे तू."

"नाही; पण तुझं ठराविक काय ते सांग."

"ठराविक नाहीच माझं. तुझ्यासारखे जे काही देतात ते मी घेतो." तिने पिशवीतून पैसे काढले, मोजले व म्हाताऱ्याच्या हातावर टाकले. म्हाताऱ्याने ते मोजले व आपल्या अंगरख्याच्या खिशात ठेवले. ती मुलगी निघून गेली.

"पाह्यलं ?" अेवढाच शब्द त्याने अुच्चारला. त्याच्या म्हणण्याचा आशय होता, "आलं माझ्या बोलण्याचं प्रत्यंतर ?" पुन्हा म्हातारा बोलू लागला, "काम करावं, तोंडाने मागू नये. सगळं मिळतं. यांच्या रूपानं मी देवाची सेवा करतो आणि यांच्याकडून देव माझा योगक्षेम चालवितो, कुशल करतो."

आतावर म्हाताऱ्यानं आपले कितीतरी जीवनसिद्धांत मला अैकविले होते. सर्वसाधारण माणसाला ते पटायचे नाहीत. विवेचक बुद्धीला ते मान्य व्हायचे नाहीत. ते कोणत्याही ग्रंथावरून घेतलेले नव्हते, ते जीवनअनुभवावरून सिद्ध झाले होते–आत्मप्रभव, आत्मस्फूर्त होते, अेका व्यक्तीच्या संपूर्ण आयुष्याने त्यांमधील सत्य सिद्ध केले होते ! सगळ्या जगाला ते मिथ्या, आभासात्मक, अविचारी वाटतील कदाचित; पण अेका महावृक्षाचं जीवन, विकास, त्याच सिद्धान्तांवर अुभारला होता. त्यांच्या आधारानेच आपला जीवनपथ त्याने आक्रमिला होता; तो आक्रमीत होता, आक्रमीत राहणार होता.

त्याला काही कनवाळू माणसं भेटली होती, कुणी काही सोय करून लावून देतो म्हणून म्हटले होते. अेकजण म्हणाला होता, "माझ्या मुलाबाळांबरोबर खेळत राहा." अेकजण म्हणाला, "माझं बालाजीचं मंदिर आहे. त्यात तू राहा, खा, काही करू नको. कुठवर ओढणार गाडी ?" म्हाताऱ्यानं अुत्तर दिलं होतं, "मी सगळ्यांचा कृतज्ञ आहे. अेवढी तरी सहानुभूती कोण दाखवितो !" पण त्याने कुणाचंच मानलं नाही. "दुसऱ्याच्या दयेवर जगलं तर मान वर करून पाहता येत नाही. देवळात देवाच्या सेवेला रहावंसं वाटलं; पण मग मन पालटलं. कुठं चोरी झाली, काही झालं, अुगीच संशयानं म्हाताऱ्याकडे पाहायचे आणि आजवरचं आयुष्य सगळं फोल व्हायचं. शरीराला कष्ट झाले तरी हरकत नाही. जळायलाच असतं ते. पण विटंबना नको बाबा--"

महावृक्ष असतो. असतो अचल, प्रशांत, नीरव, स्तब्ध आणि संयत. भोवताली प्रलय जरी माजला तरी तो जोवर कोलमडून पडत नाही तोवर त्याची धारणा गंभीर असते. झंझावात वाहो, आकाश मेघाच्छन्न होवो, भोवताली क्षणाक्षणाला विद्युल्लता कोसळून पडो, जलधारांचा अविरत वर्षाव होवो, महावृक्ष गांभीर्यानं अुभा तो अुभा. जीवनसत्त्व जोवर त्याच्या गाभ्यात आहे तोवर बाह्य अुपाधींचा परिणाम त्याच्या मनावर होत नाही. हर्ष-खेदानं पानं नुसती फडफडायची; पण अंतःकरण मात्र हलून निघायचं नाही. हा महावृक्षाचा अितिहास. हे त्याचं जीवन.

म्हाताऱ्याचं जीवनही महावृक्षाचच.

अेक महावृक्षच तो.

* * *

०१२०

अेक रस्ता आहे. माझ्या परिचितांनी त्याला माझं नाव दिलं आहे.

अेक दिवस मी शाळेत जायला निघालो. घरून निघायला रोजच्यापेक्षा थोडा जास्त वेळ झाला होता. थोडंसं अंतर गेलो असेन तो वारा सोसाट्याचा सुटला. आता वर क्षितिजाजवळ दबा धरून बसलेले मेघ अेकाअेकी वरवर आले. वाऱ्यानं आणखी काही मेघ कुठून तरी त्यांच्या भरीला घातले. आकाशाचं स्वरूप भीतिप्रद दिसू लागलं. पावसाची सर येणार की काय या विचारानं अंतःकरण भीतिसंकुल झालं. सायकलच्या पायट्या मी वेगानं फिरवू लागलो. शाळेपावेतो पाअूस सुखरूप जाअू देतो की नाही या अेका विचारानं मनाची चलबिचल झाली. पावसाचे काही

थेंब हातावर पडलेदेखील. मग जितक्या लवकर शाळेत जाता येऔल तितक्या लवकर जाण्याचा विचार मन करू लागलं.

हंपयार्ड रस्त्यावरून खाली अुतरलो, टिकेकर घाटाच्या रस्त्याला लागलो. अिमामवाडयाच्या पुलावरून, बर्डीपूल आणि टिळक पुतळा यांना जोडणाऱ्या सुभाषरोडकडे येअू लागलो. अर्धा रस्ता आलो तो पावणेअकराचा पोंगा कानावर पडला. पाअूस येतो की काय, ही भीती मनात होतीच. तीत वेळेवर पोचतो की नाही या भीतीची आणखी भर पडली. अितक्यात अुजव्या हाताला अेक वळण दिसलं.

पृथ्वी गोल असल्यामुळे, आपण जर सरळ गेलो तर निश्चित 'अिंडीज' ला पोचणार ह्या विश्वासानं कोलंबसानं जसा युरोपचा किनारा सोडला, त्याचप्रमाणे आपण या वळणाच्या रस्त्यानं शहरात लवकर पोचणार या कल्पनेनं मी आपली सायकल वळवली. थोडंसं अंतर जाअून समोर पाहिलं तो मॉडेल मिलच्या चिमण्या आणि भिती नजरेला आल्या. रस्ताही पुढे गेलेला दिसला; पण मन निश्चित नव्हतं. मधेच कुणी कुठं तार घालून ठेवलेली असली, अेखाद्या शेताच्या शिवेवर वाट जाअून अडकून बसलेली असली, तर सगळा रस्ता परत यावं लागेल, शाळेत आपण अुशिरा पोचू. शिक्षकांच्या हजेरीपटात लाल शाअीने सही करून वेळ लिहावी लागेल, हे विचार मनात येत होतेच.

या विचारांबरोबर सायकल पुढे-पुढे चालली होतीच. रस्त्याच्या अुजव्या कडेला अेक लहानशी पाच-दहा घरांची वस्ती होती. डाव्या कडेला अेकच झोपडी होती. रस्त्यावर चिटपाखरूही नव्हतं. मन साशंकच होतं. अेकदा तर ते कोलंबसाच्या जहाजावरील खलाशांप्रमाणे बंड करून परतायच्यादेखील विचारात होतं. पण मी त्याला पुढे पुढे दामटीतच होतो. अितक्यात काही अंतरावर दोनचार माणसं येताना दिसली. ती कशी आली असतील

या विचारानं मी दूरवर नजर टाकली तो रस्ता दिसला. मॉडेल मिलकडून शुक्रवार तलावाकडे जाणाराच हा रस्ता, ही मनोमन खात्री पटली. माझा आनंद गगनात मावेना. ती दोनचार माणसं म्हणजे कोलंबसाला भूमी जवळ आहे अशी ग्वाही देणाऱ्या पाखरांसारखीच मला वाटली. कोलंबसाचा आनंद माझ्या आनंदाहून अुणाच होता. कोलंबसाला भूमीचं दर्शन झालं ते पाखरं पाहिल्यानंतर दोन दिवसांनी. मला तर पाखरं आणि 'भूमी' यांचं दर्शन अेकाच दृष्टिक्षेपात घडलं होतं. थोड्याच वेळात मी मॉडेल मिलच्या रस्त्यावर आलो. पलीकडचा मार्ग माझ्या परिचयाचा होता.

ज्या मार्गानं मी आलो होतो तो मार्ग सतराव्या शतकाच्या अगोदरच्या अमेरिका आणि युरोपमधल्या अॅटलांटिक महासागरातील जलमार्गासारखा होता. त्यावर वर्दळ नव्हती. क्वचित कुठं जॉन आणि सेबास्टियन कॅबट, वॉल्टर रॅले, फ्रॅन्सिस ड्रेक, अेखादा पिलग्रिम फादर्सचा जथा मार्गात भेटला तर भेटला. नाहीतर सगळा शुकशुकाट. ह्या शुकशुकाटामुळेच या रस्त्यानं मी रोजच्यारोज जाअू-येअू लागलो

मला हा रस्ता सापडेपावेतो मी 'सुभाषचंद्र बोस मार्गा'नं जात असे, येत असे. सकाळी साडेदहाला व सायंकाळी पाचला या रस्त्यावरची गजबज जीव घेणारी वाटायची. माणसांची वर्दळ असे, रस्त्यावर माणसं थव्यानं अुभी असत. घरच्या अंगणातच आपण सायकल चालवतो आहोत, रस्त्यावर चिटपाखरूही नाही अशा आविर्भावानं सायकली पळायच्या. रिक्षावाले ! ज्यांना रिक्षावाल्यांचा अनुभव आहे, त्यांना सांगण्याची आवश्यकता नाही आणि ज्यांना त्यांचा अनुभव नाही त्यांना सांगून काहीच कळायचं नाही. त्यातच मधून मधून गायीम्हशी, शेळ्या विहरत असायच्या. 'लोकवाहक' आणि 'निजीवाहक' ट्रक्स, जीपगाड्या, मोटारी यांचाही धडधडाट रस्त्यावर असायचा. या सगळ्या गोंधळातून

जायचं म्हणजे बुद्धिबळाच्या पटावर आपलं मोहरं कैचीत सापडलं असता ते पुढेपुढे सरकावण्याचं दिव्य करण्यासारखं होतं. कारण पुढे जाणं म्हणजे मरण ओढवून घेण्यासारखं होतं.

पण हा नवीन रस्ता अुपलब्ध झाल्यापासून मरणाचा विचारच मनात निर्माण व्हायला कारण अुरलं नव्हत. डोळे मिटून जरी मी जातो म्हटलं असतं, तरी भीती नव्हती. मी सायकलवरून खाली आलो असतो कदाचित; परंतु अितर कुणाला माझ्यामुळे अिजा होण्याचा मात्र संभव नव्हता.

साहजिकच अेखादी नवीन वस्तू आपल्या हातात आली असता तिच्या नवलाअीमुळे अभिमानानं आपण जशी ती ज्याला-त्याला दाखवत सुटतो, त्याचप्रमाणे मी आपला नवीन रस्ता आपल्या परिचितांना दाखवू लागलो. त्या रस्त्यानं संधी मिळाली की त्यांना नेअू-आणू लागलो. जे माझ्यासारखेच घंतोलीवरून शहरात जाणारे, अथवा शहरातून घंतोलीवर येणारे होते ते या रस्त्यानं जा-ये करू लागले. माझं कौतुक करूं लागले. हीच मंडळी या रस्त्याचा अुल्लेख माझ्या नावान करू लागली. त्याला माझा रस्ता म्हणून म्हणू लागली.

मी हे तुम्हाला सांगतो आहे, यात अहंमन्यतेचा भाग आहे. असं तुम्ही म्हणाल. तुम्ही म्हणाल, या रस्त्यावरून, तुरळक का होअीना, पण माणसं जातयेत होतीच. होय, होती जात-येत. पण अेवढ्यानं काही तुम्ही माझा त्या रस्त्याचा शोध फोल ठरवू शकणार नाही. रिप्लेच्या 'बिलीव्ह अिट, ऑर नॉट' या चमत्कृति-संग्रहात अेक चित्र आहे, त्यात कोलंबसाचं रेखाचित्र काढून त्यानं त्याच्याखाली लिहिलं आहे 'कोलंबस हा काही अमेरिकेला जाणारा पहिला माणूस नव्हे.' गोष्ट सत्य आहे. 'नॉर्वेमधील खलाशी आअिसलँड, ग्रीनलँड घेत लॅब्रॅडोरच्या किनाऱ्यावर येत असत. दहाव्या शतकापासून याचा पुरावा मिळतो. पण असं असूनदेखील

नवं जग जुन्या जगाला ज्ञात करून देण्याचा मान कोलंबसलाच प्राप्त झाला. कारण कोलंबसानं नवीन मार्ग उपलब्ध करून दिला, नवीन किनाऱ्यावर त्यानं पाअूल ठेवलं. युरोपला तो परत आला. त्याच्याच पावलाबर पाअूल टाकून अनेक खलाशी संपत्तीचा लोभ असलेल्या राजांच्या प्रोत्साहनानं, मदतीनं या नवीन भूमीकडे आकृष्ट झाले. निळ्या जलाशयामध्यें अेक नवीन हमरस्ता निर्माण झाला.

माझ्याही बाबतीत शंकाकुशंका कुणी काढू नये. माझे परिचित त्या रस्त्याला माझं नाव देतात यात गैर, अनुचित असं काहीच नाही. कोलंबस जर तुम्हाला गौरवाला पात्र वाटतो, तर मग—मी ?

आज माझ्या या रस्त्यावर माणसांची रहदारी तुरळक आहे; पण अुद्याला तो फार मोठा होणार आहे. औद्योगिक विभाग म्हणून जो वसवला जाणार आहे, तो याच मार्गावर आहे. सगळ्या आशियात आकारानं, खर्चानं मोठी म्हणून जी वैद्यकीय शिक्षणाची आणि रुग्णशुश्रूषेची संस्था म्हणून अुल्लेखिली जाते, तिच्याकडे जाताना हाच मार्ग ओलांडावा लागतो. धंतोली आणि शहरविभाग यांना जोडणारा सगळ्यात लहान मार्ग हाच. यामुळे ह्या मार्गाचं भवितव्य थोर आहे, अुज्ज्वल आहे, हा माझा विश्वास आहे. आणि या मार्गाचा 'कोलंबस' मी आहे !

* * *

०१३०

गोष्ट जुनीच, पण नव्यानं सांगतो.

प्रांतिक सरकारची घोषणा त्याने कानोकानी ऐकली आणि लगेच त्याचं पित्त खवळलं. घोषणा अशी होती की गांधीजींच्या नावाचा जेव्हा जेव्हा उच्चार करायचा असेल, लिहिण्यात त्यांच्या नावाचा उल्लेख करायचा असेल, तेव्हा तेव्हा 'महात्मा' ही उपाधी लावण्यात आलीच पाहिजे. घोषणा ऐकल्यावर त्याने तीमधील सत्यासत्यता देखील पारखून घ्यायचा यत्न केला नाही. घोषणेचा त्याला संताप आला होता. आणि तो संताप त्याच्या मुखातून प्रकट झाला होता. " महात्मा उपाधी लावायची म्हणे ! सरकारी कामकाजात तर ती लावलीच पाहिजे. कां ? नाही लावणार.

कां लावायची आम्ही ती ? तुम्ही कोण आम्हाला सांगणार ? वाटलं तर आम्ही महात्मा म्हणू, नाही तर हवी ती उपाधी लावू, नाहीतर नुसतं मोहनदास करमचंद गांधी म्हणू, नाहीतर श्रीयुत गांधी म्हणू. तुम्हाला नियम करता येतात म्हणून आचरटपणा करणार ना रे तुम्ही ? ''

तो हे सगळं एकांतात, आपल्याशी म्हणाला होता. संताप, तिरस्कार त्याच्या अंतःकरणात उफाळून आला होता. समोर कुणीही प्रेक्षक, श्रोता नसताना त्याने हातवारे करून, आवाज चढवून वरील स्वगत उच्चारले होते. पण झालं काय, त्याच वेळेला भितीला कान फुटले. त्याची बायको भितीआड येऊन उभी राहिली. तिने ते सगळे स्वगत भाषण स्वतःजवळ ध्वनिमुद्रित करून ठेविले आणि माझ्यासारखा घरचाच एखादा आला की ती तबकडी ऐकवू लागली. अर्थात मीही ऐकली.

पण ती तबकडी ऐकताच मला नवल वाटलं. एका गोष्टीची मला चांगली जाणीव होती. त्याची महात्माजींवर गाढ श्रद्धा होती. इतकी निस्सीम आणि अंतःकरणपूर्वक होती ती की कित्येकदा आम्ही त्याची चेष्टा देखील करीत असू. महात्माजींच्या जीवनात कित्येक प्रसंग असे येऊन गेले की, त्यांच्यावरची त्यांच्या अनुयायांच्या अंतःकरणातील भक्ती शिथिल झाली, क्षीण झाली; पण या झुळुकांचा त्याच्या मनावर मात्र यत्किंचितही परिणाम झाला नाही. त्याच्या खोलीत महात्माजींचीच केवळ चित्रं होती. शेल्फवर यंग इंडिया, हरिजन यांचीच पुस्तकं आणि गांधी–साहित्य होतं. झोपेतून उठल्यानंतर आणि अंथरुणाला पाठ लावण्याच्या अगोदर गांधींच्या छायाचित्राला नमस्कार करणे, कोणत्याही कार्याला आरंभ करताना महात्माजींच्या फोटोकडे दृष्टी लावून मनन करणे वगैरे त्याच्या स्वभावातील, वागणुकीतील विशेष मला माहीत होते.

म्हणून भितीच्या कानांनी मला त्याचं स्वगत वक्तव्य ऐकवलं तेव्हा पराकाष्ठेचा विस्मय वाटला. जर या बाबतीत आपण त्याला काही विचारलं तर काय वाटेल, तो आपल्याला कशाप्रकारे उत्तर देईल याची पर्वा न करता मी त्याला सरळच प्रश्न विचारला, "का रे बाबा, आज महात्माजींवर एवढा राग कां ?"

" नाहीतर काय रे " तो उसळूनच बोलू लागला " हे सरकार कोण सांगणार आम्हाला महात्माजींना महात्माजी म्हणा अथवा नका म्हणू म्हणून ? महात्माजी ही उपाधी त्यांच्याविषयी अंतःकरणात असलेल्या भावनेचं प्रतीक आहे. ती उपाधी काही सरकारनं त्यांना एकाद्या बिरुदाप्रमाणे दिली नव्हती. भावभक्तीचा हा सोहळा. त्यात सरकारची लुडबूड कशाला ? पण यांच्या खोट्या नामधारी भावनेवर सत्याचा मुलामा कसा चढायचा ! मग 'महात्मा म्हणा' अशा प्रकारचे नियम करायचे आणि लोकांच्या मनात संताप निर्माण करायचा. आम्हाला वाटेल तर आम्ही म्हणू महात्माजी, नाहीतर--काल ते करून घ्या."

तो तावातावाने बोलत होता. त्याची तीन वर्षांची पोरगी आली, त्याबरोबर तो म्हणाला, "काल आमची ताई हट्ट धरून बसली होती, आमाला मनुताईच्च मनायला हवं, नाहीतर मी बोलणार नाही तुझ्याशी दादा ! आमच्या मनूताईच्या सारखाच आमच्या सरकारचा हट्ट."

ही झाली जुनीच गोष्ट, पण नव्यानं सांगितलेली. या गोष्टीमुळे लहानपणी मी पाहिलेल्या एका गोष्टीची मला आठवण झाली.

आमच्या गावात एक वेडा होता. तो चांगला इंटरपावेतो शिकला होता. त्याची बुद्धीही चांगली तल्लख होती. गणित विषय तर त्याच्या हातचा मळ होता. त्याच्या आयुष्यात एकाएकीच वादळं निर्माण झाली. बाप मरण पावला, आईनं आत्म-

हत्या केली. सरख्या भावांनी सगळे पैसे लुबाडून घेतले. आणि जगाच्या बाजारात तो उघडा पडला. त्याची मती फिरली. तो वेडा झाला. एके सायंकाळी तो एका दुकानात बसला होता. दुकानदाराने आलेल्या एका गिऱ्हाइकाने विचारल्यावरून वेडयाची माहिती दिली. तो म्हणाला 'भारी शहाणा पोरगा बरं. पण काय ! 'त्या वेडयाने आपल्याला 'शाहणा' म्हटलेले ऐकले. आणि त्याबरोबर त्याला काय वाटले, कुणाला ठाऊक ! तो दुकानदाराला म्हणाला, "मला वेडा म्हणा" त्याने दुकानदाराकडून स्वतःला "वेडा" म्हणवून घेतलं. पुढे काय झालं ! ही गोष्ट सर्वांच्या कानावर गेली आणि सगळे "शाहणा, शाहणा" म्हणून त्याला त्रास देऊ लागले.

माणसाचा स्वभाव असा असतो. आपल्या मनानं तो वाटेल ते करील; परंतु जर कुणी म्हणायला लागलं, "तू असं करायला हवं," "हे तुझं कर्तव्य आहे" की मनुष्याचं मन बावचळतं. "तुम्ही माझ्यावर सक्ती करता का ? बंधन घालता का ? मग आपल्याला काहीएक मान्य नाही. तुम्ही म्हणता त्याच्या अगदी विरुद्ध जाणार आपण." अशी ते आरडाओरड करीत असतं. माणसाच्या मनाला जन्मतःच बंधनांनी जखडलेलं असतं. मनाची घडण होत असतानाच त्यावर बंधनात्मक संस्कार केले जातात म्हणून बरं. नाहीतर कायदे जगात आहेत एवढ्याकरिताच त्यांच्यावर आघात करण्याची प्रवृत्ती माणसामध्ये बळावली असती. रूसोच्या Social Contract चं पहिलंच वाक्य आहे. "Man is born free" किती धडधडीत खोटी गोष्ट आहे ही. जर ती खरी असती तर समाज नियमान्वित केव्हाही झाला नसता.

कित्येकदा लहान लहान मुलं एक मोठं गमतीचं भांडण भांडत असतात. काही कारणामुळे त्यांच्यामध्ये वितुष्ट निर्माण झालेलं असतं. मग त्यांच्यापैकी एक दुसऱ्याला चिडवायला म्हणून आज्ञा करतो. दुसरा उभा आहे असं बघून तो म्हणतो "उभा

रहा, ऐकलंच पाहिजे तुला माझं." त्यावरोबर दुसरा खाली बसतो. लगेच पहिला उद्‌गारतो, "खाली बैस. हं ऐकलंच की नाही माझं ! भीती आहेना." त्यावरोबर दुसरी व्यक्ती ताडकन उभी राहते.--म्हणजे मौज काय असते ! तुम्ही म्हणाल त्याच्या अगदी विरुद्ध मी वागणार, उभा रहा म्हणून म्हणाला तर खाली बसणार. 'महात्मा म्हणायलाच हवं' ही आज्ञा असेल तर प्राण घेतला तरी म्हणणार नाही. व 'महात्मा नका म्हणू' अशी फर्मानं काढाल तर कटाक्षानं म्हणेन.

मला एक गृहस्थ तर फार मजेदार माहीत आहे. त्याचे स्वतःचे शिस्तीचे नियम फार कडक आहेत. महात्माजींची देखील शिस्त काय होती त्याच्यासमोर ! तो आपली शिस्त बरोबर पाळतो. मग स्वतःला त्रास होवो, इतरांची मनं दुखोत, भोवतालची माणसं उपहासानं हसोत, आपल्या मनाप्रमाणे वागताना तो इकडे कधीही लक्ष द्यायचा नाही. परंतु त्याच्यावर तुम्ही आपल्या शिस्तीचे नियम लादण्याचा प्रयत्न करा, की त्याचं तांडव नृत्य सुरू होतं आणि सगळचा निर्बंधांची राखरांगोळी होते. तो म्हणतो, "मी नाही ऐकणार कुणाचं. मला कोण हुकूम करणार ? आणि शिस्त शिकवणार?"

हीच वृत्ती आद्यमानवाच्या ठिकाणी आपल्याला नाही का आढळून येत? जर ॲडामला, "ज्ञानवृक्षाला स्पर्श करू नको" म्हणून आज्ञा नसती तर तो त्याकडे वळता ना ! खात्रीनं तो वळला नसता. नंदनवनात इतरही झाडं होती. पण त्यांची फळं खाण्याला बंदी नसल्यामुळे, त्यानं त्या झाडांची फळं तोडून खाल्ली, असं काही पवित्र शास्त्र आपल्याला सांगत नाही. ज्या बागेत माणसाला सदैव विहार करण्याची मोकळीक असते, तीत विहार करण्याची इच्छा माणसाला नाही व्हायची. परंतु 'इथे प्रवेश नाही' अशी सूचना दारावर टांगलेली आढळली तर मात्र माणसाला आत शिरायचा मोह निश्चित व्हायचा. मीच आपली गंमत सांगतो.

आमच्या नागपूरला किल्ला आहे. इंग्रजांच्या राजवटीत या किल्ल्यावर जाणं माझ्यासारख्या माणसाला अशक्य होतं. एवढ्याकरिता त्या किल्यात आपल्याला जाता यावं असं मनाला वाटायचं. पण आता मधून मधून हा किल्ला लोकांना बघता यावा म्हणून उघडा ठेवतात. पण हा किल्ला बघता येण्यासारखी परिस्थिती निर्माण झालेली असल्यामुळे तो बघण्याविषयी आस्था माझ्या मनात उरली नाही. इंग्रज राजवटीमध्ये काही जागा खास गोऱ्या कातडीकरिता राखून ठेवलेल्या असत. त्या ठिकाणी प्रवेश करायला जीव तडफडायचा. आज त्या जागा मुक्तपणे बघता येतात. पण बघतोच त्या अशातला मात्र भाग नाही.

याला कारणे एवढीच. माणसाच्या स्वभावातला हटवादीपणा, प्रतिकाराशी प्रतिकारानेच झुंज घेण्याची प्रवृत्ती. "महात्मा म्हणा म्हणता ?" " नाही म्हणत " ही लकब.

* * *

८१९०

टॉल्स्टॉयने एक बोधकथा लिहिली आहे.

तिचं नाव आहे "माणसाला किती जमीन हवी ?"

टॉल्स्टॉयनं उत्तर दिलं आहे, "साडेतीन हात."

साडेतीन हात ! पण ही मेल्यानंतर. जिवंतपणी तर त्याला सगळी पृथ्वी हवी. आणि एखादा बळी जर दान द्यायला तयार झाला, तर "एका पदे भूमि भरोनि टाकी
दुज्या पदे अंबर सर्व झाकी
तिजे बळीचे शिरि ठेवियेले
. . . . . ." इथवर जायची तयारी व ज्ञात अज्ञात भूमीचा पती व्हायची त्याची तयारी !

माणसाच्या या वृत्तीला कुणी म्हणतात 'महत्वाकांक्षा', आणि कुणी 'म्हणतात 'हावरेपणा'.

काहीही असो; मला काही माणसाला याकरिता दोष द्यायचा नाही. उलट दोष द्यायचा तो एवढ्याकरिता की, आपण पृथ्वीच्या पलीकडे काही बघू शकत नाही. हिटलरला मध्ययुरोप; चर्चिलला हिंदुस्थान, रुझवेल्टला पॅसिफिक व ॲटलांटिकमधील बेटे, यांच्यापलीकडे या विश्वात काही दिसतच नाही. अलेक्झांडरला वाटत होतं जग जिंकावं. जग जिंकायला राह्यलं नाही तेव्हा रडला बापडा ! नेपोलिअन युरोपच्या नावानं हाय खात होता. बेडे सगळे! विश्वामध्ये जगं इतकी आहेत की, मी आणि तुम्ही इतकंच काय पण पृथ्वीवरील प्रत्येक मनुष्य दशकं शतकं इतकंच काय, पण सहस्त्रकंदेखील सुखाने घेऊ शकतो. वाटणी करताना तूट यायचं कारणच नाही. सायंकाळी आकाशातून दिसणाऱ्या जगांची मोजणी केली तर परार्धावर परार्ध उलटतील. पण, ग्रह व तारे संपायचे मात्र नाहीत. आपली पृथ्वी केवढीशी ! आणि तरीही भांडण, मारामाऱ्या, युद्धं चाललेलीच ! व तीही कशाकरिता तर जमिनीच्या एवढ्याशा तुकड्याकरिता !! यापेक्षा दोनचार ग्रहांची वा ताऱ्यांची मालकी मिळविली म्हणजे केवढंतरी समाधान वाटेल ! पृथ्वीवरच्या लोकसंख्येला कमी नाही पडायचे. सगळ्या समुद्रामधले वाळूचे कण मोजून काढा. त्यांची जी संख्या भरेल त्याहूनही जास्त या 'जगांचीं' आहे. मग माणसांमध्ये वाटणी करा. व होऊ द्या भांडणाचं तोंड काळं !——

° ° °

मी वाटणी करा असं म्हणतो तेव्हा तुम्हाला हसू येत असेल, नाही ?

पण हसण्यासारखं काय आहे यात ? तुम्हाला एक गोष्ट माहीत नसेल, ती तुम्हाला कळली की, अंतरिक्षातील ग्रहगोलांची

वाटणी करणं कठीण नाही, असं तुम्हाला खास वाटेल.

ही गोष्ट आधुनिक शास्त्रांचं, विचारवंतांचं नवसुधारणेचं आगर जे अमेरिका त्यात घडली आहे. एक धर्मोपदेशक होता. त्याचं डोकं कल्पक आणि कल्पनाशक्ती कौतुकास्पद. त्याने एक स्वर्गाचा नकाशा तयार केला. प्रत्येक ठिकाणाचं वर्णन लिहिलं. काही ठिकाणं चांगली, काही साधारण. त्यानं प्रत्येक जागेचं तिकीट नक्की केलं. व मग तो लोकांकडे जाऊन "आपली स्वर्गातली जागा आधीच खरेदी करून ठेवा. नाहीतर मग स्वर्गात गर्दी होईल. मग तुम्हाला त्रास होईल, आणि जागाही मिळणार नाही" म्हणून सांगू लागला.

हा प्रकार आरंभल्यावर त्याने स्वर्गातील जागांची पाचशे तिकिटे विकली! यानंतरचा प्रकार मुद्दाम सांगण्याची आवश्यकता नाही. सव्वाचारशे वर्षांपूर्वी पापमुक्ततेचे पास टेझ्झेलने विकले. पास विकत घेतले तर आपली, आपल्या वडिलांची, बेचाळीस पिढ्यांची पापं नाहीशी होतात, ही तेव्हाची कल्पना. आज तिकिटांचे पैसे भरले तर स्वर्गात जागा राखून ठेवता येते, ही तेव्हाची कल्पना.

मग मी जर म्हटलं ग्रहांची वाटणी करून घ्या, तर ती व्हायला काहीच प्रत्यवाय नाही. तुम्ही खुशाल म्हणू शकता, "हा ग्रह माझा", "हा तारा माझा" ठीक आहे तुमचाच तो. किती हवेत तुम्हाला? पाच? पंचवीस?—लाख घ्याना! तुम्ही लाख घेतले म्हणून काही अंतरिक्ष रितं व्हायचं नाही.

तुम्ही प्रत्येकजण सगळे तारे—ग्रह वाटून घ्या. माझ्याकरिता चंद्र व शुक्र हे दोन ठेवा म्हणजे झालं. एवढे दोन मला मिळाले म्हणजे पुरे.

लहान मुलं हायड्रोजन भरलेल्या फुग्यांना दोरा बांधतात. व दोरीचे टोक हातात धरून मजेनं इकडे तिकडे भटकतात. पुष्क-

ळदा मीही कल्पना करतो की, शुक्र व चंद्र यांना दोरी बांधली आहे. व तिचं टोक माझ्या हातात असून, मी लहान मुला-प्रमाणं सगळ्यांना अंतरिक्षातील हे माझे दोन गोल दाखवीत उनाडतो आहे !

***

०१५०

एकदा आमच्या गावी एक आगगाडी आली होती, तिचं नाव ' बाजार स्पेशल '. ती आम्ही बघायला गेलो होतो. गाडीच्या निरनिराळ्या डब्यांमध्ये निरनिराळ्या वस्तूंची दुकानं होती, कपड्यांची होती, साबण, कंगवे, सेंट्स, बिस्किटे, बांगड्या, तिजोऱ्या असल्याही वस्तूंची होती. आम्हाला विकत काहीच घ्यायचं नव्हतं, नुसतं बघायचं होतं. पण लवकरच त्याचा कंटाळा आला. म्हणून बिस्किटांचा पुडा घेऊन, त्यांचा समाचार

घेत घेत भटकलो, गाडीतल्या दरिद्री रेस्ट्रांलाही भेट दिली. मग मात्र काहीच करायला उरलं नाही. म्हणून आतापर्यंत टाळलेल्या डब्याकडे वळलो. डब्याला नाव होतं 'लॉफिंग गॅलरी'. तीत प्रवेश एका पैशानंच होऊ शकत होता. त्यामुळे खिशांना कुरकुरायला काहीच कारण नव्हतं. दोन तिकिटं काढली. दारावरील पडदा बाजूला सारला. आणि आम्ही गॅलरीत प्रवेश केला. विनोदी, गमतीची, हास्यरसपरिपूर्ण चित्रे आत असतील अशी आमची कल्पना होती. आमची कल्पना काही फोल ठरली नाही. ठिकठिकाणी होती चित्रेच, पण ती आमचीच होती. डब्यांच्या फळचांना लागून आरसे ठेवले होते. त्यांची भिंगे सपाट पृष्ठभागाची नव्हती, काही अंतर्वक्र, काही बहिर्वक्र, काही खडबडित. पण त्यात एकही असा नव्हता की ज्यात माणसाचं नेहमीचं रूप दिसेल. एक आरसा दुसऱ्याहून खटनट होता. प्रत्येकाने जणू काय आपल्या विधात्याजवळ शपथ घेतली होती की, उर्वशी येवो, रंभा येवो, मदन येवो की अश्विनीकुमार येवो, त्यांचा गर्वपरिहार करायचा.

आरशापासून काही अंतरावर उभं राहून आम्ही आपली रूपं न्याहाळायला सुरुवात केली. आम्हाला आमच्या चेहऱ्यांची ओळख पटेना. जणू काय मधमाशा चावून सूज आल्याप्रमाणे आमची मुखमंडलं दिसू लागली. बऱ्याच प्रयत्नानंतर त्या टेंगळांच्या दऱ्याखोऱ्यातून आम्ही आमची मुखकमलं शोधून काढू शकलो. इतकं घाणेरडं तोंड पाहूनही आमची त्याविषयीची आस्था आणि आपुलकी मावळली नाही. आपल्याच तोंडाविषयी कोण कौतुक माणसाला ! 'स्वतोक पितरा रुचे' हूनही जास्त. आणि म्हणूनच आरशातील कुरूप अडगळीतून आम्ही त्यांना ओळखू शकलो. मथुरेचा देह घडवताना, गडकऱ्यांनी देशोदेशीहून अवयवांची पार्सलं बोलावली. अगदी समोर उभं असता, टकमक बघत असता, मथुरेवर ताण करील, अशी आमची आकृती आरशांनी निर्माण केली. पण हे सगळं बघत असता, आम्हाला

राग नाही आला. उलट आम्ही मनमुराद, सुखानं हसलो. एका आरशासमोर आम्ही दोघं उभे राहिलो. मी धष्टपुष्ट, गलेलठ्ठ दिसू लागलो. तो डोंगऱ्यांच्या बालामृताच्या जाहिरातीमधील, एका ताजव्यातील तीन बाळांपैकी एक दिसू लागला. खरोखरीचा प्रकार अगदी उलट होता. पण आरशातील त्याचे रूप त्याला फार आवडले. तो म्हणाला, 'तू आरशात दिसतोस तसाच रहा, मीही तसाच राहतो'. त्याला आठवण दिली, 'हे कलियुग आहे बाबा, हा ययातीचा काळ नाही'. दुसऱ्या एका आरशात आम्ही आपलं रूप पाहिलं. कुब्जा अष्टवक्राच होती, आम्ही अगणितवक्र होतो. आमचं रूप बघून तिला आपल्या रूपाचा खचित गर्व वाटला असता. एका चित्रकाराचं मी एक चित्र पाहिलं होतं. त्यात त्याने फिरत्या ध्वनिमुद्रिकेवरील अक्षरं वाचण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका व्यक्तीची मान दाखविली होती. मानेच्या पुंगळीला वेटोळी पडत जाऊन शेवटी बँडमधील ट्राम्बोन वाद्य तयार झाल्याचं दाखवलं होतं. पण आम्हाला कोणताही त्रास न देता आरशानं आमच्या मानेला वाद्याचा आकार आणून दिला. आरशांमधील आपल्याच चित्रांकडे बघता बघता आम्ही विसरून गेलो होतो की आमच्या शरीरात अस्थी आहेत. आरशानं आमची इतकी विटंबना चालविली होती, पण आम्हाला मात्र त्याचं दुःख नव्हतं. उलट स्वतःची व्यंगचित्रं बघून आम्हाला मौजच वाटत होती, आम्ही हसत होतो, सुखावत होतो.

पण कल्पना करा, अशीच आमची चित्रं एखाद्या चित्रकारानं काढली आहेत. जे सुख आम्हाला आरशासमोर उभं राहून लाभलं ते ही चित्रं बघताना लाभेल का? कधीही लाभायचं नाही स्वतःचं व्यंगचित्र निर्विकार मनानं जो बघू शकेल, तो मुक्ताच्या कोटीला जाऊन पोहोचलेला, आणि त्यामधून जो आनंद मिळवू शकेल तो परमात्मा झालेला. परंतु या प्रकारची व्यक्ती सहसा आढळून यायची नाही. मनुष्य आज समाजात

राहतो. त्याचं व्यंगचित्र तो स्वतः पाहणार, त्याप्रमाणे इतर अनेक पाहणार. इतर काही नुसते बघावयाचे नाहीत. ते तुमच्या व्यंग-चित्राला अधिकच विकृत करून त्याचं स्मरण सारखं तुम्हाला राहील, अशा रीतीनं वागणार, बोलणार. या परिस्थितीत स्वतःच्या व्यंगचित्राचं कौतुक कोण करू शकेल ! आरसा व्यंगचित्र दाखवतो, तुमचं तुम्हाला. तुमचं चित्र दुसऱ्यांना दाखवून तुम्हाला हास्या-स्पद करण्याकरिता त्याचा खेळ नसतो. तुम्हाला हसवायचं एवढाच त्याचा प्रामाणिक, सत्य मनोभाव असतो. त्यानं ज्याचं चित्र त्याला दाखवलं तर तो हसतो. खदखदून हसतो. त्याला चीड येत नाही, संताप येत नाही. त्या आरशाविषयी घृणा वाटत नाही. व्यंगचित्र काढून दाखविण्याचं आरशाचं कार्य जेव्हा मनुष्य करतो, तेव्हा आरशाचा भलेपणा, त्याचं अकिलिमष, निर्मळ, निर्लेप अंतःकरण नसतं. माणसाला हास्यास्पद करून सोडायचं, जगातून उठवायचं, त्याच्या मानसन्मानाच्या भावना धुळीला मिळवायच्या याच कार्याकडे मानवी व्यंगचित्रकाराचा रोख असतो. अर्थात अशा व्यंगचित्रकारानं काढलेलं स्वतःचं चित्र बघताना माणूस शांतचित्त, सुखी राहू शकत नाही.

पण नाही. माणसांचा एक प्रकार आहे, तो सुखी राहू शकतो.

व्हॉल्टेअरने एका सरदारसाहेबाला चपराक ठेवून दिली. अर्थात तो संतापला. पण व्हॉल्टेअरच्या नोकराने त्या सरदाराला शांत केलं. तो सरदारसाहेबांना म्हणाला, 'भाग्यवान तुम्ही. केवढ्या मोठ्या माणसाकडून चपराक बसायचं भाग्य तुम्हाला लाभलं.' पुढे तो सरदार काय म्हणाला, काही माहित नाही. पण त्याचं समाधान झालं असावं, असं मात्र मला वाटतं. कारण पुढच्या प्रकाराची नोंद कुठं आढळून आली नाही. आणि कां नाही होऊ त्या 'सरदाराचं समाधान? व्हॉल्टेअरबरोबरच हा सरदार नाही का अजरामर झाला ! आणि कोणतंही दिव्य

न करता; केवळ एक चपराक खाऊन. असंच व्यंगचित्राबाबतही. डेव्हिड लो, सेम वगैरेंसारख्या थोर चित्रकारांनी ज्यांचं व्यंगचित्र काढलं, त्यांच्या नावाचा बोलबाला नाही का झाला ? रेम्ब्राण्टने आपल्या अनेक चित्रांमधून आपल्या काळच्या लौकिकवान परंतु दुर्वृत्त लोकांच्या आकृती काढल्या. रेम्ब्राण्ट गेला, तो काळ गेला, रेम्ब्राण्टने आलेखित केलेली ती माणसंही गेली. पण ती अजरामर झाली. कित्येकांना हीच समाधानाची गोष्ट आहे. आणि या प्रवृत्तीच्या लोकांना, त्यांचं चित्र कुणी कोणत्याही वृत्तीनं काढो, त्याचे परिणाम त्यांना भोगावे लागोत, यातही समाधानच वाटायचं.

पण अशा लोकांचा वर्ग अगदी लहान आहे. सर्वसामान्यपणे व्यंगचित्र म्हणजे व्यक्तिविशेषावरील टीकाच होय. आणि टीका ही कुणाला प्रिय असते ? टीकास्पद असेल त्यालाही ती रुचायची नाही. मनुष्य आत्मपूजक तर खराच. परंतु तो परनिंदेखोरही असतो. दुसऱ्यावर ऊठ-सूट टीका करणाऱ्या व्यक्तीवर टीका झाली तर ती खवळून उठते. इतरांवर टीका करण्याचा मक्ताच परमेश्वराने आपल्याकडे दिलेला आहे, आणि जगानं आपली टीका मान्य केलीच पाहिजे ही तिची समजूत असते. दुसरा कुणी या व्यक्तीवर टीका करू लागला, तर त्याचा ते अधिकार विचारतील, पण दुसऱ्यावर टीका करताना मात्र इतरांच्या अधिकारांची त्यांना जाणीवही राह्यची नाही. हा सगळा घाणेरडचा अहंपणाचा खेळ. या व्यक्तींची व्यंगचित्रं कुणी काढली तर आकाश-पाताळ एक झाल्याशिवाय राह्यचं नाही. साहजिकच आहे, यांना व्यंगचित्रं कशी आवडतील ?

व्यंगचित्रांच्या बाबतीत अतिशय नाजुक प्रकृती पहिल्या नेपोलिअनची होती. इंग्लिश वर्तमानपत्रातून त्याच्या बागणुकीवर ढीका म्हणून व्यंगचित्रं काढली जात. पिटने निर्माण केलेल्या राष्ट्रसमूहाचा अनेक वेळा त्याने धुव्वा उडवला. रणधुमाळी चालू असताना, बंदुकीतून उडणाऱ्या गोळचांचा सभोवती खच पडत

असताना, जो यत्किंचित डगमगला नाही, भ्याला नाही, त्याला व्यंगचित्राची भीती वाटायची. अमीन्सच्या तहात तर ,नेपोलियनविषयक व्यंगचित्रे काढणाऱ्या, रोलँडसन, गिलारे वगैरे चित्रकारांना, ती प्रसिद्ध करणाऱ्या वर्तमानपत्रकारांना शासन करावे हे कलम घालण्यात आले होते. अमीन्सच्या तहानंतर लवकरच पुन्हा युद्धाला आरंभ झाला. युद्धाला जी अनेक कारणं दाखविण्यात आली, त्यात वरील कलमाचे इंग्लंडकडून पालन न होणे हेही एक होते. अर्थात नेपोलियनला राग येणं, युद्ध करावं असं वाटण्याइतका राग येणं ही साहजिकच गोष्ट आहे. नेपोलियन रणांगणावर थोर असेल, पण इतर दृष्टीने सामान्य होता, तुमच्या आमच्या सारखाच. तुमच्या आमच्यासारखंच त्याचं पोट दुखायचं, आपलंच व्यंगचित्र आपल्याला बघावं लागलं तर जसा आपल्याला राग येतो, तसाच त्यालाही यायचा. एकेकाळचा अमेरिकेचा प्रेसिडेंट हूव्हर याला आपली स्वतःची व्यंगचित्रं जमवायचा नाद आहे असं म्हणतात, असेलही. परंतु ती बघून त्याच्यावर होणारा परिणाम मात्र कुणी वर्णन केलेला मला वाचायला मिळाला नाही. कदाचित हूव्हर या चित्रावरून आपल्या लौकिकाचं माप घेत असेल. लौकिक आणि निंदा ही थोरपणाची विदागी आहे. ज्या प्रमाणात आपली निंदा होईल, त्या प्रमाणात आपला लौकिक वाढला असं मानण्याची हूव्हरची प्रवृत्ती नसेल कशावरून ? पण मला हूव्हरवर हे आरोप करायचे नाहीत. खरोखरच व्यंगचित्रं त्याला सुखवत असतील. म्हणून तो त्यांचा संग्रह करत असेल. पण हा झाला अपवाद. जगात हूव्हर थोडे, नेपोलियनांची संख्या मात्र अगणित.

परंतु माझी खात्री आहे नेपोलियनने जर एखाद्या 'लॉफिंग गॅलरी' ला भेट दिली असती, आरशाने केलेल्या आपल्याच विकृती जर त्याने पाहिल्या असत्या तर रोलँडसन, गिलारेच काय, त्यांचा देवही जरी नेपोलियनची विकृती करायला उतरला असता,

तरी त्याला ती बघून खंत वाटली नसती, उलट हसून हसून त्याच्या मुरकुंड्या वळल्या असत्या. त्याचं पोट दुखलं असतं. नेपोलियनची आजवर जितकी चित्रं काढली गेली तितकी इतर कुणाचीही नाहीत. पण तो करंटा एवढा, की हास्यानं दैदीप्यमान झालेलं मुखमंडल दाखवणारं एकही चित्र नाही, शिल्पकृती नाही. पण तो जर 'लॉफिंग गॅलरी'त एकदा येऊन गेला असता, तर नेपोलियन आयुष्यात एकदा तरी हसला होता असे कुणालाही म्हणता आले असते !

* * *

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 35653... वि: ...निर्लेप...
क्रमांक ...1503.... नो वि: 25।८।६५

८१६०

एक लहानशी मुलगी आहे. भारी लोभस, चपळ आणि हुशार. एके ठिकाणी उभी राहिली, तरी स्वस्थता कशी ती जिवाला ठाऊकच नाही. पायाला भिंगरी बांधलेली आणि मनाला फुलपाखरानं झपाटलेलं. अशा प्रकारच्या वेडाबाईला मला एकदा शिकवण्याचा प्रसंग आला. तिने आपल्या पुस्तकातून काही शब्द काढले होते आणि त्यांचा अर्थ विचारायला ती माझ्याकडे आली होती. शब्दांचा अर्थ सांगायच्या अगोदर मी तिला विचारलं,--

"का ग, शाळेत आपल्या मास्तरांना नाही अर्थ विचारलास?"

"विचारला. पण मास्तर म्हणाले, आता राहू दे. मग उद्या सांगेन."

"अस्सं ! म्हणजे तुझे शाळेतले मास्तर आज घडचाची तयारी नव्हते करून आले तर ?"

"असं काही बोलू नका आमच्या मास्तरांविषयी. त्यांना काम असेल काहीतरी म्हणून उद्या सांगेन म्हणाले."

मग मी तिची वही घेतली. शब्द पाहिले. शब्द कोकणी होते. पण खांडेकरांच्या 'कांचनमृग' या कादंबरीमध्ये असलेला कोकणी शब्दांचा लहानसा कोश मला पाठ असल्यामुळे अर्थाची अडचण गेली नाही. तिला अर्थ सांगितले, पण तिच्या मास्तरांना मी बोल लावला, ही गोष्ट तिच्या मनाला लागली होती. तिला याचे उट्टे काढायचे होते. तिने आपली चर्या गंभीर केली, मनाशी थोडा विचार केला. मग मला म्हणाली, "तर म्हणजे काय ? म्हणजे म्हणजे काय ? काही म्हणजे काय ?"

"अँहँरे, एवढंही कळत नाही ? तर म्हणजे–दोन वाक्यांना हा शब्द जोडतो. पहिल्या वाक्यात अट असते आणि दुसऱ्या वाक्यात ती पूर्ण केली अथवा न केली तर होणारा परिणाम सांगितलेला असतो. जर तू अभ्यास केला तर तू पास होशील."

"पण तऽर म्हणजे काय ?"

"तर ! त...र ! तऽऽ...रऽऽ !" मी आपल्याशीच उच्चार केला.

"बरं 'तर' चा अर्थ नाही येत तुम्हाला, आता 'म्हणजे' चा सांगा."

"म्हणजे ! म्हण...जे ! म्हऽणऽजेऽऽ !"

"बरं आता काय म्हणजे सांगा."

"शरीर."

"अहं, तुम्हाला अर्थ सांगता येत नाही काय ? यातल्या काय चा अर्थ सांगा."

"माझी परीक्षा घेतेस होय ?"

"माझ्या मास्तरांची केली ती ?"

"बरं बाबा, मी हरलो. तुझे मास्तर माझ्याहून शहाणे आहेत, विद्वान आहेत."

"कशी केली ! अशा प्रकारची भाषा आपल्या डोळ्यांनी बोलून ती निघून गेली.

ती गेली. मग मी "तर" "म्हणजे," "काय" संबंधी विचार करू लागलो. "तर" ला काही मूळ अर्थ आहे का ? म्हणजे ला ? काय ला ? मी शब्दांच्या अर्थाविषयी मनात वाद घातला. पण ज्या शब्दांमध्ये त्यांचा अर्थ आहे असे शब्द सहजा-सहजी आढळून येत ना. शब्दाची केवळ एकच जात अशी आढळली की, जिच्यामधील शब्दांना अंगभूत अर्थ होता. नादावरून जे शब्द भाषेत आले, त्यांना मूळचा अर्थ आहे. खडखडाट, झुळझूळ, टपटप, फटफटी, पडझड, असल्याच शब्दांना मूळ अर्थ. बाकीच्यापैकी कोणताही शब्द घेतला तर--

माणूस ! मा-णू-स ! मा ऽऽ णू ऽऽ स ऽऽ ! असंच व्हायचं.

एखादे वेळी मी शब्दांशी खेळतो. या शब्दाला हा अर्थ आला, कां आला ? कसा आला ? मन ! मनाला मनच कां म्हणायचं ? खगाला खगच कां म्हणायचं ? कारण ख मधून ग करतात म्हणून. पण ख ला ख आणि ग ला ग तरी कां म्हणायचं ? अशा रीतीने विचार करायला लागलो म्हणजे मी आपल्याशीच हसायला लागतो. शब्दांची गंमत वाटते. आणि सगळ्या भाषां-मधले शब्द म्हणजे एक मोठ्ठा फापटपसारा, असं वाटायला लागतं.

पण थोड्याच वेळात मन गंभीर होतं आणि शब्दांना अर्थ आहे असं ते म्हणतं. एकेका शब्दामागे केवढा मोठा पसारा आहे याची जाणीव देतं. विश्व, सृष्टी, आत्मा, माया, ब्रह्म, आकाश, जीवन, सरोज, शंकर वगैरे शब्द ध्यानात येतात. आणि त्यांच्या

ठिकाणी असलेली अर्थव्यापकता मन भारून टाकते. विश्व म्हणताच चराचर, गोचरागोचर, सगळं काही डोळ्यांसमोर उभं राहतं. सृष्टी म्हणताच नयनविषय निसर्ग मन भारून टाकतो. शंकर म्हटलं म्हणजे जीवनाधार, कल्याणकारक, विराट शक्तीची कल्पना मनात येते. शब्द लहान पण ते ज्या कल्पना देतात त्या विशाल, अमर्याद स्वरूपाच्या. वडाचं बी एवढंसं, पण वृक्ष केवढा विशाल आणि विस्तार पावणारा. शब्दाचंही असंच. शब्द एवढासा, पण अर्थाचा पसारा अवाढव्य आणि जास्त जास्त अर्थ सामावून घेणारा. तुलसीदासजींनी रामनाममहिमा गाताना म्हटलं आहे--

देखि अँहि रूप नाम आधीना
रूपज्ञान नहि नामविहीना

--पाहू गेले असता रूप नामाच्या अंकित असते. कारण नामनिर्देशाव्यतिरिक्त रूपाचा परिचय व्हायचा नाही.

समुझत सरिस नाम अरुनामी

--विचार केला असता नाम व रूप ही समसमान होत.

रूपविसेष नाम विनुजाने
करतलगत न परहँ पहिचाने
सुमिरिय नाम रूप बिन देखे
आवत हृदय सनेह बिसेखे.

इतकी शब्दांची मातब्बरी आहे. रामाला महत्व नाही, तितकं नामाला आहे. राम अबोध आहे. नामानं त्याचा बोध होतो. वस्तू अबोध आहे. निदर्शक शब्दानं तिचा बोध होतो. वाचक शब्द नाही, तर वस्तू नाही. जगाला अर्थ आला, तो शब्दांनी आला. जगाला चिरंतनत्व प्राप्त झाले, सातत्य प्राप्त झाले, काळाला अभेदत्व, प्रवाहित्व प्राप्त झाले, ते शब्दाने. शब्द जीवनाधार आहे. जीवनव्यापी आहे.

हे शब्दाचं महत्व आहे.

परंतु हे त्याच्या अंगी मूळचं होतं का ?

कधीच नाही. त्याच्या अंगी संस्कारांनी, उपयोजकतेने अर्थ आणला गेला. त्यात जीव भरला गेला. प्रथमतः वस्तूला आत्मसात करून घेणे शब्दाला जड गेले असेल. पण काही काळानंतर वस्तू शब्दात समावून जायची. पुढे पुढे तर शब्दांनी सगळ्याच वस्तू समावून घेतल्या. नवीन काहीही आढळलं की, ते शब्दात जाऊन बसलंच. शब्दांमध्ये युद्धं झाली, त्यांचे तुकडे पाडले गेले, नको त्यांची संगत कित्येकांना धरावी लागली, रूपं पालटावी लागली, अत्याचारांना बळी पडावं लागलं. एखादा शब्द आपलीच टिमकी वाजवू लागला तर काळा वर नजर ठेवून तीही गोष्ट सहन करावी लागली. अनेक अगणित संवत्सरांनंतर शब्दांना आजचं रूप, आजचा अर्थ प्राप्त झाला. आरंभी स्वरव्यंजनांना आकार देऊन शब्द निर्माण करावे लागले. व्यवहारात त्यांना अर्थ आणावा लागला; व त्यांना योग्य रीतीने हाताळून कायम करावा लागला.

मी एका महान भाषासुधारकाचं पुस्तक वाचीत होतो. इंग्रजी, उर्दू वगैरे परभाषातील शब्दांना निवडून, गचांडचा देऊन, ज्ञानदेवाच्या भाषेतून त्यांना हाकून लावण्याचा त्याने सपाटा लावला होता. आणि हाकून लावलेल्या शब्दांची जागा आपल्या मनाने निर्माण केलेल्या शब्दांना तो देत होता. चेष्टा म्हणून कुणीतरी अग्निरथविश्रामधाम, अग्निरथगमनागमनसूचकताम्रहरितपीत–पट्टिका आणि याच प्रकारचे अनेक शब्द तयार केले होते. याच प्रकारचे शब्द हा भाषासुधारकही करीत होता. इंग्रजीत 'बेसिक' इंग्लिशमध्ये साहित्य उतरविण्याची एक टूम आज निघाली आहे. त्याचप्रमाणे आमच्या भाषासुधारकाने आपल्या मनाशी प्रतिज्ञा केली होती की सगळं मराठी साहित्य पुन्हा, शुद्ध मराठीत लिहून काढायचं. मी या महात्म्याला गळा काही शब्दांचे मराठी पर्याय हवे म्हणून लिहिलं, व ते त्याने लिहून पाठविले. जेम्स जॉईसच्या

कादंबऱ्यांमधील काही शद्वांची लांबी म्हणतात फलाँगभर आहे. परंतु आमच्या ह्या भाषासंकर द्वेषी महावीराने मद्रास ते पेशावर आणि मुंबई ते न्यूयॉर्क इतक्या लांबीचे शद्व मला पाठविले होते. हा प्रकार मला सहज वाटला. माणसाने एखाद्या गोष्टीविषयी हट्ट धरला, अट्टाहास स्वीकारला की, मग काय काय प्रकार होतील, सांगता यायच नाही कुणाला. दुसरं म्हणजे असं की शद्वांच्या अर्थाविषयीचे ज्ञान कमी. अर्थात निर्माण होणाऱ्या शद्वांचं स्वरूप व्याख्येचं, संपूर्ण वर्णनात्मक, निबंधासारखं. यांना शद्व नको, व्याख्या हवी असते.

शद्वांना मूळचा अर्थ नसतो हे त्यांना माहित नसतं, म्हणून गद्यपद्यार्थबोधी व्याख्या हुडकून काढून भाषा समृद्ध करायला हे भाषावीर सज्ज होतात. नवीन शद्व हवा ना! कोणतीही स्वरव्यंजने जुळवा. शद्व तयार होतो. वापरा तो प्रथमतः, त्याला हसणारे हसतील. पण त्यांचे दात दिसतील. आणि हे शद्व भाषेत रूढ झाल्यावर–व होतीलच ते.–हसणाराच्या तोंडावर. **He laughs best, who laughs last,** हा तुकडा फेकून त्याला खजील करतील. गंमत बघा. अ ब क ड ह चक्र. काय अर्थ आहे अबकडहला ? बोलपट हा शब्द मराठीत नव्यानं आला. पतिगृही येणाऱ्या सुनेप्रमाणे त्याला बावरावं लागलं. कुणी त्याची टिंगल करी, कुणी हसत, कुणी उपेक्षा करी. पण आज तर त्याचाच आधार घेतला जातो. शास्त्रीय विषयांची मराठी परिभाषा तयार करताना नायट्रोजन आणि हायड्रोजनला अनुक्रमे नत्रजन आणि हद्रजन शद्व वापरले. यांना कड आणि अह म्हटलं असतं तर काय झालं असतं ! स्टेशनकरता एखादा घातलेल्या पायघड्यांसारखा शद्व करण्यापेक्षा अत अथवा मव म्हटलं असतं तर काय उणं पडलं असतं ? काहीच नाही.

अजून मराठी भाषा विशाल स्वरूपाची व्हावयाची आहे. तिच्या ठायी असलेली परदास्याची चिन्हं निवडून फेकायची

आहेत. शास्त्रांचा वाढता पसारा तिला आपल्या घरात मांडायचा आहे. शद्वनिर्माणाचं कार्य क्षणाक्षणाला करावं लागणार आहे. परभाषेतील शास्त्रीय शद्व जसेचे तसे वापरणं अयुक्तच. पण कर्बवायू वगैरेसारखे शद्व तयार करणेही अयोग्यच, अथवा बफरस्टेट म्हणजे प्रत्याहारक्षम संस्थान किंवा काँटिनेंटल शेल्फ म्हणजे सागरमग्न खंडप्रांत हाही प्रकार नको. कारण हे म्हणजे मनुष्य हा शद्व भाषांतरित करण्याचा प्रसंग आला तर मेंदू–हास्य–द्विपाद–प्राणी असं त्याचं रूप व्हायचं. कोणत्याही स्वरव्यंजनांच्या मांडणीनं शद्व तयार करायचा, तो विशेषार्थाने वापरायचा व त्याला अर्थ आणायचा हे केव्हाही बरं. प्रत्येक भाषेत काही समानार्थक शद्व आहेत. परंतु इंग्रजीतील To laugh आणि मराठीतील हसणे यांच्यामध्ये काय नादसाधर्म्य आहे ? किंवा पुट... ठेवणे अथवा वीप... रडणे यांच्यातही काय आहे? मग नवीन जे शद्व निर्माण व्हायचे त्यांच्यातच नादसाधर्म्य असायला हवे हा अट्टाहास कशाला ? अर्थात मी जो मार्ग सुचवितो त्यातही समंजसपणा हवा. नवीन शद्व तयार करताना शद्वदोष टाळून शद्वगुण त्यात येण्याविषयी जागरूक राहणे आवश्यक आणि अर्थवाहकतेच्या दृष्टीने हे साधणे येरागबाळाचे काम नव्हे. पण भाषासौंदर्य आणि समृद्धीच्या दृष्टीने हाच मार्ग श्रेयस्कर आणि यशदायक, अतएव स्वीकारार्ह.

* * *

०१७०

त्या दिवशी बागेत काम करताना मला खूप उत्साह वाटत होता. आंब्यांची पिवळी, वाळली पानं सगळचा बागेत पसरली होती. बागेला अवकळा आली होती. जुनाट, दुर्लक्षित असं रूप तिला प्राप्त झालं होतं. पण तिच्याकडे लक्ष द्यायला, केरकचरा काढायला, तिच्यात नवीन चैतन्य निर्माण करायला स्फूर्ती मिळेना. एक दिवस, आमच्या घरासमोरचा रस्ता झाडणाऱ्या जमादारानं मला बाहेर पडताना पाहून नमस्कार केला. मीही त्याला नमस्कार केला. त्यानं मला विचारलं, "हमारे लिये कुछ काम ?" काम असं काहीच नव्हतं. जमादाराच्या हातात त्याचा झाडू होता. त्याच्याकडे माझं लक्ष गेलं. म्हटलं, "भगवान, तुम्हारा ये जो झाडू है, मोल मिलता है ?"

"क्यंव नही ? जरूर मिलता है. "

"हमारे लिये लाओगे एक ?"

"जरूर लाऊंगा. "

"क्या दाम होगा ?"

"रुपया लगेगा, साब."

"अच्छा ! लाना."

भगवान जमादारने तो करून काल सायंकाळी आणला होता. आणि आज त्यानंच मो आपली बाग झाडत होतो. वस्तू चांगली होती. गवतातून पानं झाडूच्या फटकाऱ्यासरशी निघत. लवकर काम होत होतं. सहज होतं, त्रास नाही, थकवा नाही. बाग झाडण्याचं साधन नवीन होतं, चांगलं होतं. म्हणूनच काम करायला स्फूर्ती आली होती. खूप वेळपर्यंत बागेत काम करत राहिलो होतो. बागचा एकएक भाग स्वच्छ करत होतो, आणि तो जसा स्वच्छ होत होता, तसा नवीन भाग हाती घेण्याकरिता हुरूप येत होता. सगळं काम कदाचित मी त्या दिवशीच उरकलं असतं. पण एक मित्र आला आणि आग्रह करून मला त्यानं कामावरून उठवलं, त्याच्याबरोबर जायला भाग पाडलं. पण हे सगळं आज मी सुखानं करत नव्हतो. अजून काम करत रहावं असं वाटत होतं.

पण काम करण्याची एवढी स्फूर्ती, श्रमाविषयीची एवढी आस्था, तात्पुरती का होईना, पण माझ्या मनात निर्माण व्हायला तो झाडू कारण होता. त्या झाडूमुळेच मला बागेत काम करण्यात आनंद वाटत होता.

माझा हा नेहमीचा अनुभव आहे. असं काही नवीन घेतलं, हाती आलं, मिळालं की, त्या वस्तूंशी संबद्ध अशा गोष्टी करताना मौज वाटते. खास तयार करवून घेतलेल्या वाहणा–घरी आणल्या, त्यांना तेल दिलं की वाटतं खूप फिरून यावं. पावसाळ्याच्या

तोंडाशी नवीन छत्री घेतली की, छत्री डोक्यावर घेऊन पावसातून फिरण्यात मौज वाटते. नवीन हजारा हातात आला की झाडांना पाणी घालण्यात मौज वाटते. शरदबाबूंना लिहिण्याकरिता साहित्य उत्तमातलं उत्तम लागे. कोणताही कागदाचा चिटोरा घेतला आणि पेन्सिलीचा कोणताही कसाही तुकडा असला म्हणजे बरा, अशातला प्रकार नव्हता. त्यांचा कागद मोलाचा असे, झरण्या किमती असत. त्यांच्या स्फूर्तीची स्थानं इतर असतील, पण त्यांच्यामध्ये त्यांचा कागद आणि झरण्या यांनाही स्थान आहे हे निश्चित. फ्रेंच शिल्पकार रोंदा याचाही प्रकार अशातलाच. त्याला सुंदर संगमरवरी दगड मिळाला की शिल्पकृती निर्माण करण्याकरिता अवसान चढे. मनुष्याच्या अंतःकरणातील सृजनशीलता जागवणं, कार्यक्षम करणं आणि तिला सतत कार्यव्यापृत ठेवणं हे कार्य कलानिर्मितीच्या साधनांचं. कलाकारांच्या यशाचा बराच मोठा वाटा या साधनांकडे जातो. थोर पुरुषांच्या स्मृतिसंबंद्ध वस्तूंची संग्रहालये अनेक ठिकाणी आहेत, आणि त्या संग्रहालयांमध्ये अशा वस्तूंना महत्त्व दिलं जातं. त्यात काही वावगं आहे असं कोण म्हणेल ?

हरिभाऊ आपटे तीच ती पुस्तकं अनेकदा विकत घेत. तीच ती पुस्तकं अनेकदा वाचत. सर्वसामान्यपणे वाचनाचाच कंटाळा असतो. पुन्हा पुस्तक वाचण्याचा प्रसंग आला तर ते जिवावरचं संकट वाटतं. पण हरिभाऊ त्या पुस्तकाच्या निरनिराळ्या आवृत्ती घेत, आणि वाचत. आपण जन्मभर संपूर्ण घर जरी आपलं असलं तरी एकाच खोलीत राहतो. पण मधून मधून तीत नाविन्य आणायचे प्रयत्न चाललेलेच असतात. कधी आपण खोलीतील व्यवस्था बदलतो, कधी नवीन चित्रं आणून लावतो, कधी नवीन लाकडी शोभेचं उपयुक्त सामान आणतो, मधून मधून नवीन रंग तिला देतो. या रीतीने खोली जरी ती असली तरी तिला सदैव नवीन रूप देऊन तिचं रमणीयत्व कायम ठेवतो.

पुस्तकांच्या बाबतीत हरिभाऊंचीही वृत्ती अशीच, नवीन मलपृष्ठ, नवीन बांधणी, वेगळा टाइप, वेगळी चित्रं यांच्यामुळे पुस्तक नवीन होई, पुन्हा वाचनीय होई.

पुष्कळजणं नवीन घरं बांधतात. नवीन घरात राहणं म्हणजे जगायला नवीन हुरूप येणं, दहा पाच वर्षांनी लहान होणं. मृत्यू तेवढ्याच काळानं पुढे लोटणं. 'घर पहावं बांधून' ही भीती म्हणीनं घालून दिली असली तरी स्वतः बांधलेल्या घरात जाऊन राहताना मनाला वाटणारी उत्फुल्लता अनुभवणं हे फार मोठं भाग्य, जगायला आवश्यक असलेल्या स्फूर्तीचं निधान.

पण मला पुष्कळशी माणसं अशीही माहिती आहेत की स्वतः बांधलेलं घर भाड्यानं देतील, आणि स्वतः भाड्याच्या घरात राहतील. कारण या लोकांचं आयुष्य पै पैशावर चाललेलं असतं. येणारं भाडं आणि जाणारं भाडं यांच्यामध्ये वजाबाकी होऊ शकते. घरामुळे मिळणारं समाधान, जगायला मिळणारी स्फूर्ती, मनाला वाटणारी उत्फुल्लता——

कसच्या गोष्टी सांगता राव ?

बँकेत जमा होणारा पैसा एवढंच एक परब्रह्म. बाकी सगळं तुच्छ.

×××

०१८०

आजच मी पोष्टाच्या तिकिटांचा एक संच विकत घेतला. मला तो स्वस्त वाटला. त्या संचामध्ये सगळ्या जगातील निरनिराळ्या देशांची थोडी थोडी तिकिटं होती. तिकिटांचे आकार वेगवेगळे होते, त्रिकोनी होते, काटकोन चौकोनी होते, समद्विभुज चौकोनी होते, उभे होते, आडवे होते. काही तिकिटांवर, ज्या देशातील ती होती, त्यांच्यामधील थोर पुरुष, थोर शास्त्रज्ञ, थोर कलावंत, थोर राजकीय पुढारी वगैरेंच्या प्रतिमा होत्या. काही तिकिटांवर नामांकित कलावंतांच्या अमर कलाकृती होत्या. काही तिकिटं काही राष्ट्रांमधील उत्सवप्रसंगी काढण्यात आली होती. काहींवर राष्ट्रामधील महत्वाचे ऐतिहासिक प्रसंग चित्रित करण्यात आले होते.

काहींवर पशु–पक्ष्यांच्याच प्रतिमा होत्या. काहींवर नकाशे होते. एका तिकिटावर मुसोलिनी आणि हिटलर या मग्रुरशहांच्या प्रतिमा होत्या. दुसरं महायुद्ध सुरू होण्याच्या अगोदर या दोन हुकूमशहांचा जो स्वार्थी सलोखा निर्माण झाला होता, त्याचं ते तिकीट चिरस्थायी स्वरूप होतं. एका तिकिटावर, रशियन राज्यक्रांतीच्या वेळी लेनिन लोकांसमोर व्याख्यान देतो आहे या प्रसंगाचं चित्रण केलं होतं. एका तिकिटावर निग्रो गुलामांच्या मुक्ततेचं चित्र होतं–त्या लहानशा संचात इतिहास, भूगोल, विज्ञान, कला, संस्कृती या सगळ्यांच थोडक्यात प्रदर्शन होतं.

आज हा संच विकत घेताना माझ्या मनात विशेष अशी कोणतीच भावना नव्हती. नवीन काहीतरी होतं, ते बघताच कुतूहल चाळवलं गेलं, संचाची किंमतही अशी काही नव्हती, की तिचे पैसे दिले तर काही गरजा भागवल्या जाऊ नयेत. दुकानात संच दिसला, पैसा होता खिशात, विकत घेतला, एवढंच म्हणता येईल. पण एक काळ होता,— आज तो काळ कहाणीतील 'कोणे एके काळी' मध्येच जमा झाला आहे— ज्या वेळेला मला पोष्टाची तिकिटं जमवण्याचा छंद होता. मी आणि माझे मित्र, आम्ही सगळेच लहान होतो. आणि आमच्यापैकी काहींना माझ्यासारखाच तिकिटं जमवण्याचा छंद होता. एखादं नवीन अपरिचित तिकिट कुणाजवळ आलं, की तो जग जिंकल्याच्या आवेशात इतरांना ते दाखवायचा. त्या तिकिटाची जपणूक, मयूरसिंहासनापेक्षाही जास्त मोलाची वस्तू मानून तो करायचा. सगळ्यांना मग त्याचा हेवा वाटायचा. Haves आणि Have nots अशा प्रकारचे गट पहिल्या आणि दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या अगोदर राष्ट्रांचे पडले होते. त्यांच्यामध्ये चुरस लागायची, स्पर्धा सुरू व्हायची, कुणी शिरजोर व्हायचा, त्याच्याकडून पापं घडायची, आणि मग या सगळ्या प्रकारातून महायुद्ध निर्माण व्हायचं. असलाच काहीसा प्रकार आमच्या चिमुकल्या जगात घडून यायचा.

जगात दोन महायुद्धं झाली ती युद्धांचा नायनाट करण्याकरिता. पण युद्धाचा नायनाट न होता प्रत्येक युद्धानं पुढच्या युद्धाची बीजं पेरून ठेवली. त्याचप्रमाणे आमच्याही भांडणातून भांडणं निर्माण व्हायची, भांडण चालू राह्यचं. युरोपातील ऑस्ट्रीयन वॉरसाच्या युद्धात असलेले मित्र सप्तवार्षिक युद्धात जसे एकमेकांचे शत्रू झाले, तसंच एखाद्याजवळ एखादं नवीन तिकिट आलं की इतरांना त्याचा हेवा वाटे आणि आतावर जे मित्र म्हणून असत ते शत्रू होत. एखादे वेळी एखाद्याजवळ दोन सारखी तिकिटं येत, मग तो त्याच्याजवळ जास्त असलेल्या एका तिकिटाचा लिलाव करायला निघायचा. सगळी बुद्धिमत्ता, सगळं ज्ञान तो पणाला लावायचा, आणि त्या तिकिटाच्या मोबदल्यात जितकं जास्त पदरात पाडून घेता येईल तितकं पाडून घ्यायचा. फाटके विटके कपडे बोहारणीला देऊन, तिच्याजवळून हव्या त्या वस्तू मिळवायच्या वेळी गृहलक्ष्मी जसं बोलते, फाटक्या कपड्यांची स्तुती करते, विटक्या जरीला भाव आणते, अशातलाच प्रकार व्हायचा. मग तिकिटांची अदलाबदल व्हायची. सगळा प्रकार म्हणजे पुढे देवाणघेवाणाच्या जगात कसं वागायचं याचा उत्कृष्ट धडा होता. आज शिक्षणशास्त्रात छंदांना अतिशय महत्व प्राप्त झालं आहे. याला कारण व्यवहारात यशस्वी होण्याला आवश्यक अशी वृत्ती छंद निर्माण करतात म्हणून, वागायचं कसं याचं प्रत्यक्ष ज्ञान देतात म्हणून, हेच असावं. नाहीतर मोलाचा वेळ वाया घालवायचं एक साधन यापलिकडे छंदांना काहीच अर्थ नाही.

त्या वेळेला एक एक तिकिट मिळवायचं म्हणजे एक एक दिव्य होतं. केवढी यातायात ! केवढे खटाटोप ! पण एखादे वेळी मात्र अवचितच असा लाभ व्हायचा. किराणामालाच्या दुकानातून घरी आलेल्या मालाभोवती कागद गुंडाळलेला असायचा आणि त्याच्यावर केप कॉलनीचं त्रिकोणी निळं तिकिट असायचं. ते

दृष्टीला पडताच आनंदाला पारावार उरायचा नाही. माझ्या आनंदापुढे सर ॲलेक्झांडर फ्लेमिंगच्या आनंदाचा देखील काय पाड ! फ्लेमिंग काही पेनिसिलिन शोधायला प्रयोग करत नव्हते. दुसराच त्यांचा प्रयोग चालला होता. अपेक्षेपेक्षा वेगळाच परिणाम त्यांनी प्रयोगनलिकेत ठेवलेल्या द्रव्यावर झालेला आढळून आला. परिणाम वेगळा कसा झाला हे बघता बघता पेनिसिलीनचा उद्‌भव झाला. हातभर देखील न खणता प्राचीन सुवर्णमुद्रांचा हंडा सापडावा त्यातला प्रकार. अर्थात सगळी तिकिटं अशीच मिळत असं काही नाही. त्यांच्याकरिता विशेष प्रयत्नही असत. एखादा पोस्टमनशी सट्टी लावी, एखादा ओळखीच्या एखाद्या डॉक्टरांना सांगून ठेवी. ज्यांच्या इथं बाहेरदेशाहून पत्र येण्याचा संभव असे त्यांच्या इथल्या केरकचऱ्यावर एखादा नजर ठेवी. माझ्या काही मित्रांनी इटाली, फ्रान्स, इंग्लंड, जर्मनी मधील काही मुलांशी पत्रद्वारे मैत्री जोडली होती. तिकिटं मिळवण्याकरिता नाना प्रकार केले जात. आणि 'कवडी कवडी माया जोडी' या न्यायाने तिकिटांचा संचय केला जाई.

बहुधा हा सगळा प्रकार पैशाशिवायच व्हायचा. पैसा असेच कुणाजवळ ! त्या वेळच्या जीवनोपयोगी वस्तू म्हणजे पेन्सिली, वह्या, पुस्तकं. यांच्याकरिता पैसे मिळवायचे झाले तरी काही शद्ब कानांना ऐकून घ्यावे लागत. मग तिकिटांकरिता पैसे खर्च करणं तर अशक्य कोटीतलंच होतं. सगळे व्यवहार पैशांशिवायच व्हायचे. लहान मुलांना देवाची रूपं मानतात. याला हेच कारण असावंसं वाटतं की देवांचेही व्यवहार, मुलांप्रमाणे पैशाशिवायच होतात. देवांमध्ये केवढी मोठमोठाली युद्धं झाली ! पण या युद्धामध्ये कुठं पैशाचा संबंध आल्याचं इतिहासकार लिहीत नाहीत. देवामध्ये लग्नं लागली. पण कुठं पैशाची गोष्ट नाही. पैसा आला की देवत्व मावळलंच. नाण्याचं मूल्य समजून मूल व्यवहार करू लागलं की त्याचं बाल्य संपलं, त्याला प्रौढत्व आलं,

त्याच्यातलं देवत्व मावळलं. आम्ही लहान असताना कुणाजवळ पैसा नसे. पण सगळे व्यवहार मात्र बरोबर होत, देवासारखेच. कुबेर हा देवांचा भांडारी होता. तो देवांचा बनिया नव्हता, सावकार नव्हता. मुलं म्हणून आम्ही देव असू अथवा नसू, पण तिकिटांचा संचय पैशाशिवाय होई.


आणखी असं होतं. आमच्याजवळ पैसेही असते (आत्या-बाईला मिशा असत्या, सशाला शिंग असतं, या चालीवर) तरी तिकिटं मिळणं सहज नव्हतं. आज आमच्या नागपूरला तिकिटं विकत मिळतात. उमरावतीलाही एका पुस्तकाच्या दुकानात मी तिकिटं पाहिली. मुंबईला तर फण्या गुंड्या विकणाऱ्या ठेलेवाल्या-जवळदेखील तिकिटं विकायला असलेली मला आढळून आली. आज जागतिक दळणवळण वाढलेलं असल्यामुळे, राष्ट्राराष्ट्राचे संबंध जास्त निकटचे झाल्यामुळे तिकिटं मिळणं सोपं झालं आहे.

पण तिकिटं जमवायचा मला छंद होता, तो काळ वेगळा होता. आज माझ्याजवळ पैसा येतो, खूप नाही येत, खर्च करण्यापुरता येतो. बाल्यात कितीतरी आशा मनात होत्या. तेव्हा तर त्या पूर्ण होऊ शकल्या नाहीत. बालपणीच त्या मनातल्या मनात मरण पावल्या. त्या मृत आशांची पिशाच्चं कधी कधी त्यांच्या जिवंतपणीच्या इच्छा माझ्याकडून पूर्ण करवून घेतात.

मनातल्या अशाच एका मृत आशेच्या पिशाच्चानं आज मला हा पोस्टाच्या तिकिटांचा संच विकत घ्यायला लावला होता. कितीतरी तिकिटं माझ्याजवळ आली होती. काही नवीन वस्तू माझ्या-जवळ आल्याचं समाधान मला लाभलं होतं. पण संचय करण्यातलं सारं काव्य ओसरून गेलं होतं. या संचयात जीवाचा आटापिटा नव्हता, अंतःकरणाची धडपड नव्हती, भांडणं नव्हती, एकमेकांना 'बनवण्यातली' मौज नव्हती. आणि या सगळ्या भावभावनांच्या खेळामधून तिकिटं मिळाल्याचा जो अपरिमित आनंद तेव्हा

मिळायचा, तो आज नव्हता. आज त्यातलं काव्य ओसरून गेलं होत, साधा व्यवहार उरला होता.

* * *



०१९०

प्रामाणिकपणाने सांगायचे म्हणजे आपल्याला काही गाता येत नाही.

तुम्ही म्हणाल, "गाणं समजतं का हो ?" तर तेही नाही.

चित्रपटात 'मोरे सजनी आजा' हे खुर्शीदचे पद ऐकायचे व त्याने मन भारून गेल्यामुळे चित्रपटगृहातून बाहेर पडताना कंठातून सूर सही-सही काढण्याचा प्रयत्न करायचा, गायला लागायचे, 'मोरे सजनी आजा." पण हे पद कथानकाच्या आरंभाला असते. त्यावर सायगल गायलेला असतो व खुर्शीदनेही 'अब राजा भये', 'बरसो रे', वगैरे पदे म्हटलेली असतात. वेगवेगळे गाणे मनात राहत नाही, सगळ्यांचे कडबोळे होते. व जेव्हा मी 'मोरे

सजनी आजा' म्हणायला लागतो तेव्हा त्या गाण्याचे काय घिरड होते ते तुम्ही माझ्यासारखे असाल तरच कळायचे तुम्हाला. गाणे साधत नाही. कुठे चुकते ते कळते. 'वटा घन घोर घोर' मधील दुसऱ्या 'घोर' मध्ये तो नाऽजुक, हृदयाचा ठाव घेणारा कंप आहे ना, त्या ठिकाणी माझे स्वर बदकाच्या पायासारखे थबकट येतात. खूब प्रयत्न करतो मी आपल्याकडन. कंप खुर्शिदसारखा आपल्याही 'घोर' मधून यावा म्हणून. पण नाही, नाहीच साधायचे ते आपल्याला. मग आपल्या स्वतःविषयीच आपल्याला असमाधान वाटू लागते.

मला गाणे आवडते. खूब ऐकावेसे वाटते. छोटेमोठे गवई कानावरून जावेत असे वाटते. तिकिट काढून तर पुष्कळच गवई मी ऐकले. पण कित्येकदा पावसात बाहेर उभे राहून, कित्येकदा दाराशी बसून, कित्येकदा आगंतुकपणा पत्करून, कित्येकदा मान-सन्मान गुंडाळून ठेवून मी बैठकी ऐकल्या. नुकतीच मी एक बैठक ऐकली. खाजगी होती. वर्गणी दिली होती. त्यामुळे ऐकण्याचा अधिकार होता. मजेत गाणे ऐकले. राग मला आवडणारे व थोडेबहुत समजणारे होते. एखादा नच ध्यानात आला तर मी जवळच्याच कुणालातरी विचारून घेतो. म्हणजे गाणे आटोक्यातले आहे की नाही ते कळते, गाणे समजण्याला मदत होते. विचारल्यानंतर राग मला कळला म्हणजे माझ्याजवळ त्या रागाचे कोणते गाणे आहे ते बघायचे. माझ्याजवळच्या गाण्यातील सूर गवयाच्या, गात असलेल्या पदाशी जुळतात का ते पाहायचे; जुळले की मजा वाटायची व गाणे समजून घ्यायचा माझा प्रयत्न सोपा व्हायचा. अशाच रीतीने मी गाणे ऐकत होतो. गायकाचा गोड, लवचिक, भरदार आवाज, पदातील अर्थ, त्यातून डोळ्यासमोर उभी होणारी चित्रे, व हे सगळे निर्माण करणारे सूर—

ऐकत असताना वाटे, गाणे सारखे चालू राहावे, थांबूच नये.

पण ते थांबे, दुसरे सुरू होई.

बैठक संपल्यावर मी दिवाणखान्यातून बाहेर पडलो. नुकतीच झालेली भैरवी मनात घोळत होती, "लगत कलेजवामें चोट." अंगण ओलांडले, कुंपणाच्या दारातून बाहेर पडलो. गगनमध्यावरून चंद्र पश्चिमेला वळला होता. दृष्टीला येणाऱ्या सगळ्या घरांवर रस्त्यांवर, वृक्षांवर नवीनच शोभा आली होती. चालता-चालता माझ्याचबरोबर बाहेर पडलेला जनसंमर्द मागे राहिला व मी एकटाच राहिलो. जे भैरवीचे सूर माझ्या मनात होते ते दृष्टि-विषय सृष्टी गाऊ लागली. मीही गाऊ लागलो. पण राग तर राहूच द्या, ते शब्दही गाता येईनात.

मनाशी विषाद वाटला. अरे, आत्ता थोडयाच वेळापूर्वी स्वर-संपत्तीची केवढी खैरात झाली ! रत्ने, मोती, माणके उधळली गेली, नुसते जवाहिर कंठातून कर्णाच्या दातृत्वाने दिले गेले. मंद-भाग्य-हतभाग्य आपण, की त्यातले एक एवढेसे देखील आपण उचलू शकलो नाही. एक गाणे झाले, त्यातले थोडेसे सूर मनात राहिले. तोच दुसरे सुरू झाले. पहिल्यातले सगळे सूर हरपले. दुसरे संपले. त्यातले सूर मनात रेंगाळले. तोच तिसरे सुरू झाले. दुसऱ्यातले सूर हरवले. शेवटपर्यंत असेच.

ज्या वेळेला बालगन्धर्वांचे वैभवाचे दिवस होते, त्या वेळेला काही लोक केवळ त्याचे गाणे ऐकायला नाटकाला जात. तिकिट काढीत सगळ्या खेळाचे, पण खेळ काही पाहत नसत. त्यांना हवे असलेले गाणे सुरू व्हायची वेळ आली की मग ते आपल्या जागेवर जाऊन बसत. गाणे ऐकत. गाणे संपले की नाटकगृहातून बाहेर पडत.

मीही आता ठरवले आहे. बैठकीत एखादे गाणे ऐकले, ते गुणगुणायला आपल्याजवळ असावे असे वाटले तर, ते संपताच बाहेर पडायचे. म्हणजे त्यावर दुसरे गाणे आदळून ते आपल्या-जवळून जायला नको.

जर मी एखादा राजा-महाराजा असतो तर सगळे गवई मोठ्या आदराने, इतमामाने आपल्याजवळ ठेवले असते. व गाणे ऐकायची–अंहं, गुणगुणायची लहर येताच खांसाहेबांना किंवा बोवांना मोठ्या नम्रपणाने विनंती केली असती, "तेवढे ते पद म्हणा ना." आणि पद ऐकता-ऐकता जर एखादी तानच गुण-गुणावीशी वाटली असती तर त्यांना म्हटले असते, "आज एवढीच मेहरबानी."

आणि मग मजेत ती तान मी आपल्याशी गुणगुणत बसलो असतो.

* * *

मराठा ग्रंथ संग्रहालय, नागपूर. स्थलप्रत.
अनुक्रम ३६७५३ दि: ११।७।८८
क्रमांक १५०३ नों दि: ३५।८।६४

०२०

"पण त्यांनी जर आपल्या स्मरणशक्तीचा उपयोग काल्पनिक रीत्या गत गोष्टींची आठवण उकरून काढण्यात केला नसता तर त्यांना खास अधिक सुखासमाधानाने काळ कंठता आला असता, नाही ?"

रात्री "तरुण वेटरची दुःखे" वाचीत होतो.

दुसऱ्याच पत्रात मला वरील ओळी आढळून आल्या. त्या ओळींमधील वेटरच्या अनुभवांची मला मौज वाटली. गटेने हा वेटर निर्माण केला होता. मी जर वेटरची भूमिका निर्माण केली असती तर अगदी विरोधी विधान माझ्या वेटरने केले असते. कारण गटेचा काय अनुभव असेल तो असो, पण माझा मात्र अगदी

भिन्न आहे. गत गोष्टीची आठवण उकरून काढण्यात आनंद, सुखसमाधान असते.

आजच दुपारी एक प्रसंग घडून आला आणि त्या प्रसंगाने स्मृतिकालातील सुखसहलीची मला कल्पना आली, इतकंच नव्हे तर आयुष्याच्या विचित्रपणाविषयी यथार्थ मान झाले.

दुपारी एक मला मैत्री लाभली.

आणि तीही अचानक रीतीने, चमत्कारिकपणे.

सव्वापाचच्या सुमाराला मी घरी यायला निघालो. तलावापासून तो महालापर्यंतचा रस्ता घराकडे परत जाणाऱ्या कामगारांनी अगदी गजबजून गेला होता. सायकलला जायला रीघ नव्हती. थोडीशी नजर इकडेतिकडे झाली तर एखाद्या माणसाचे विस्फारलेले डोळे पाहण्याचा आणि अपशब्दांची खैरात व्हायचा प्रसंग. जमावातून निगरगट्टपणे सायकल नेण्याचे कसब माझ्या अंगी नव्हते. मी सायकलवरून उतरलो व ती हातात धरून चालू लागलो. येतायेता तलावावरील देवळाजवळ गर्दी दिसली. अपघाताचा संशय आला. परंतु जवळ जाऊन बघताच वेगळाच प्रकार दिसून आला. काही बैरागी ओटयावर बसून एकतारी खंजिरीवर भजनाला आरंभ करण्याच्या बेतात होते. थोडा वेळ येथे थांबलो तर गर्दी ओसरेल, कदाचित चांगले गाणेही ऐकायला मिळेल या कल्पनेने मी त्या जनसंमर्दात मिसळलो. लोकांची गर्दी वाढत होती. येत्याजात्या माणसांकडेही मी मधूनमधून बघत होतो. एक व्यक्ती आली. आम्ही एकमेकांकडे बघून हसलो. दोघांच्याही हसण्याचा आशय "तुम्ही हो कसे इथं ?" हा होता. ओळखपाळख नव्हती. आजवर एका शब्दानेही आम्ही बोललो नव्हतो. केवळ एकमेकांना रोज पाहत असू. सव्वादहाच्या सुमाराला मी शाळेकडे जात असे व ती व्यक्ती आपल्या ऑफिसला जात असे. दोघांच्याही दिशा विरुद्ध व रस्ता लांब असल्यामुळे आमची भेट रोज व्हायचीच, असा प्रकार होता. भोवतालच्या जनसंमर्दात आमच्यासारखे आम्ही

दोघेच होतो. पांढरपेशा वर्ग मुद्दाम अशा ठिकाणी थांबतो कशाला ? त्यामुळे त्याच्या थांबण्याचे मला नवल वाटले आणि माझ्या थांबण्याचे त्याला वाटले म्हणून एकमेकांकडे बघून आम्ही हसलो. आमची मूक ओळख आज परिस्फुट झाली, तिला भाषा आली, तिच्यात गोडवा भरून आला, नंतर एकत्र चहा घेऊन मैत्रीला निरगाठ देऊन टाकली. किती विचित्र योगायोग होता. आम्ही एकमेकांना केव्हापासून बघत होतो ! परंतु ओळख होऊन मैत्री होईल असा प्रसंग मात्र जुळून आला नव्हता. एखाद्या कवीला काव्यविषय लाभावा, लिहावं, लिहावं असं खूब वाटावं, पण लिहायला आवश्यक विशिष्ट परिस्थिती एकाएकी, लवकर न लाभता बऱ्याच कालानंतर निर्मितीला योग्य असे क्षण लाभावेत त्यातलाच हा प्रकार होता. हिवाळ्यात असंख्य दवबिंदू हिरवळीवर शिंपलेले असतात. परंतु आपल्या नजरेला मात्र थोडेसेच चकाकताना आढळून येतात. सूर्यकिरण व आपली दृष्टी यांचा विशिष्ट कोन जलबिंदूच्या ठिकाणी झाला तरच आपल्याला तो दिसू शकतो. मैत्रीचंही असंच नाही का ? असंख्य क्षण येतात, असंख्य निघून जातात. मैत्री जुळवून आणणारा मात्र एखादाच. आम्ही रोज एकमेकांना बघत होतो. एकमेकाविषयी कुतूहलही निर्माण झालं होतं. पण मैत्री ! कितीतरी काळानंतर ती आज घडून येत होती.

ह्या प्रसंगामुळे माझ्या कल्पनाशक्तीने स्मृतिकालातून विहार करायला आरंभ केला. सुखाचे काही क्षण लाभले. गटेच्या वेर्टरशी मी सहमत नाही म्हणतो ते एवढ्याचकरिता. गतकाल हे सुखाचं वेगळंच दालन आहे. एवढंच नव्हे. ओळखीच्या बाबतीत एक मुलखाविरहितच मला अनुभव आला.

इतर ओळखीचा, मैत्रीचा इतिहास माझ्या मताने आठवून पाहिला आणि मला कळून आले की, अचानकता आणि विचित्रपणा हाच मैत्रीच्या आरंभाचा नियम आहे. आयुष्यातले सगळे

मित्र माझ्या डोळ्यासमोर आले. मैत्रीचा पहिला दिवस व आरंभ पाहण्याचा मी प्रयत्न केला. ज्यांच्याशी मैत्री करावी असं वाटत होतं, मैत्री करायचीच असं ठरवलं होतं असा एकही मित्र मला आढळेना. कित्येक मित्र रस्त्यावर जाताजाता मिळाले. कित्येक वर्गातल्या बेंचावर मिळाले. कित्येक उट्टे फेडण्याकरिता गेलो असता शत्रूचे मित्र झाले. सगळ्या ओळखीचा आरंभ मी आठवत असताना साहजिकच काळ आनंदात आणि सुखात गेला. आणि एक गोष्ट ध्यानात आली. जोवर ओळख झाली नव्हती तोवर ती होईल ही कल्पना देखील नव्हती आणि अचानकपणा तरी आपण कशाला म्हणतो ! एका मैत्रीचा ओळखीचा इतिहास तर फारच गोड आणि विचित्र आहे.

सायंकाळची वेळ होती. खिशात पैसे खुळखुळत होते. मनाला करमणूक हवी होती. मी ठरवलं, एका चांगल्याशा रेस्ट्रांमध्ये जायचं आणि आइस्क्रीमवर ताव मारायचा. मी एका पारशाच्या रेस्ट्रांमध्ये प्रवेश केला. लहान लहान सुंदरसे पाम्स कोपऱ्या-कोपऱ्यातून खुर्च्यांलगत ठेवण्यात आले होते. हिरवट निळा विद्युत-प्रकाश दालनात पसरला होता. सोजिरांचे एक टोळके मध्यभागी बसले होते. त्यांच्या आचरटपणाला बेफाम ऊत आला होता. सभ्यासभ्य त्यांच्या खिजगणतीतून निघून गेले होते. त्यांच्या बाजूला एक पारशी कुटुंब बसले होते. त्याच्यापलीकडे एका अँग्लो-इंडियन मंडळीने मेज गुंतवले होते. रेस्ट्रांमध्ये एक माझ्यासमोरील खुर्ची आणि एक सोजिरांच्या मेजाजवळील खुर्ची अशा दोनच रिकाम्या पडल्या होत्या.

मी खुर्चीवर बसल्यानंतर मागोमागच एका वंग युवतीने प्रवेश केला. तिने सगळीकडे दृष्टी टाकली. व माझ्या समोरच्या खुर्चीवर येऊन बसली. मी आइस्क्रीमची आधीच मागणी केली होती. परिचारकाने जवळ येऊन विचारताच तिने ते सांगितले. माझ्याकरिता आइस्क्रीम आधी आलं. पण खायला आरंभ करणे

मला प्रशस्त वाटेना. वर्तमानपत्र वाचण्याचा बहाणा केला. तिच्याकरिता आल्यावर मीही समाचार घ्यायला आरंभ केला. दाराच्या बाजूला तिचें तोंड होते. तिच्या ओठाभोवती एकाएकी हास्याची दुमड पडली. मी चटकन दाराकडे पाहिलें. एक पारशी सद्गृहस्थ आत येत होता. त्याचा आकार, पोट, डोके, चष्मा, चिरूट, सगळंच काही मोठमोठं होतं. त्याला उंची काय ती मोठी नव्हती. मला एकाएकी पिपाची आठवण झाली. आणि सहजच माझ्या मुखातून ते शब्द निघून गेले. तिच्या हसण्यावरून ते साम्य तिला आवडले असे दिसले. आणि ती अनोळखीपणा विसरून जाऊन म्हणाली, काय मजेदार दिसलंय प्रकरण! परकीपणा नाहीसा झाला व आम्ही बोलायला लागलो. बोलता बोलता हॉलच्या मध्यभागी असलेल्या पुतळ्यावर तिने बोलायला आरंभ केला. दिव्यांची मांडणी कशी केली असता त्याच्या सौंदर्यात भर पडेल हे सांगून तिने कलेतील छायाप्रकाशावर एक लहानसे व्याख्यानच दिले. मी तिला विचारले,

" आपण कलावंत आहात ? "

" होय, आहे मी. "

" कुठं अभ्यास केला ?"

" पॅरिस, रोम, फ्लॉरेन्स."

" लंडन ?"

" मला लंडनविषयी विशेष असं काहीच वाटत नाही. तीन युरोपियन संप्रदायांनी जगाला नेहमीच काही तरी नवीन, भव्य, उदात्त देण्याचा प्रयत्न यशस्वी रीतीने केला आहे. मला भारी आवडतात. आणि त्यांच्याविषयी आदर आणि जिव्हाळा वाटतो."

" तुमच्या स्वतःच्या कलेचं काय स्वरूप आहे ?"

" अभिजात युरोपियन कला आणि अभिजात हिंदी कला यांच्यातील साधर्म्य वैधर्म्य बघून मला माझ्या कलाकल्पनेचा विकास करायचा आहे."

"मला वाटतं वंग चित्रकारांनी हाच उपक्रम केला आहे."

" केला आहे त्यांनी, पण स्वयंप्रज्ञा फारच थोडी प्रकट केली. प्रतीकात्मता, पूर्वसंस्कार, आणि पूर्वसंकेत एवढ्यावरच त्यांनी भर दिला. जे काही त्यांनी निर्माण केलं त्यात अभिनव, मौलिक आणि चिरंतन असं काहीच नाही. कोणताही साधारण प्रतीचा चित्रकार, काव्यात्मता, थोडासा अभ्यास, समर्थ तूलिका असेल तर तेवढे कार्य करू शकेल. मिखेंल आंजेलो, दा व्हिंची ह्यांच्या प्रतिकृतीतील नुसत्या लहान लहान रेखा, त्या देखील अभ्यसनीय आहेत आणि आधुनिकांनी चित्रकलेच्या बाबतीत केलेले वेगवेगळे प्रयोग पाहण्यासारखे आहेत. त्यांच्या शरीरातला कणन्कण कलात्मक होता. ते कलावंताचं जीवन जगले आणि एवढी थोर कला निर्माण करू शकले."

"मला तुमची चित्रं मासिका-वगैरेमधून पाह्यला मिळाली नाहीत."

" माझी कला प्रायोगिक आहे. प्रायोगिक कलेचं मोल करायला व तिला लोकांसमोर आणायला आमचे प्रकाशक तयार नाहीत. पॅरिशियन प्रकाशक मला पैसा देतो आणि माझं कौतुकही करतो. मी भारतीय आहे एवढ्याचकरिता त्यांना व त्यांच्या वाचकांना माझ्याविषयी कुतूहल वाटतं. इथं तर माझी भाकरीही मला मिळणे शक्य नाही." एवढे बोलून तिने एकाएकी विचारांचा ओघ बदलला." "असले विचार उपयोगाचे नाहीत माणसाला. असं काही वाटायला लागलं की गटेच्या दोन ओळी माझ्या ओठांवर नाचत येतात.

But let not moody thoughts their shadows throw.

O'er the calm beauty of this hour serene !

मला की नाही मित्र वगैरे काहीच नाहीत. मी सारखी हिंडत असते. कुणी बोलायला मिळालं रे मिळालं की हा आचरटपणा होतो माझ्याकडून. अगदी ठरलं आहे."

"आचरटपणा होय ? छानच बोललात की. आचरटपणा काय त्यात ? स्वभावधर्मच माणसाचा."

आणि या प्रसंगानंतर आम्ही जे मित्र झालो ते एका तपानंतर कायम आहोत. ह्या मैत्रीचा आरंभ, अचानकता नेहमीच मला हृद्य वाटते. कारण एका थोर कलावंत मैत्रिणीचा मला लाभ झाला होता.

सुंदर, थोर मैत्रीप्रमाणे प्रत्येक थोर आणि उदात्त कार्याच्या मुळाशी हीच अचानकता असते. रोदाँ या शिल्पकाराचा 'जॉन दि बॅप्टिस्ट' हा विश्वविख्यात पुतळाच बघाना. रॉडिनने मॉडेलला नानाप्रकारे उभे करण्याचा प्रयत्न केला. पण मनाजोगी आकृती त्याला दिसेना. त्रासून गेला बिचारा. शेवटी निराशेने आपल्या मॉडेलला त्याने वस्त्रे परिधान करण्याची आज्ञा केली. व्यक्ती जाऊ लागली. एकाएकी रोदाँ ओरडला "थांब" आणि लगेच त्या आकृतीचे रेखाचित्र तयार केले. व जॉन दि बॅप्टिस्टचा पुतळा तयार केला. हाच प्रकार रासायनिक वायू, यंत्रे, रोग, औषधे यांच्या कितीतरी शोधांच्या बाबतीत झाला आहे ! कोलंबसाचा मोठेपणा तर केवळ अपघातावरच विसंबून आहे. पॅसिफिक आणि अॅटलांटिक या दोन महासागरांना अमेरिकाखंडाने विभागून टाकले नसते तर कोलंबसाची मोजदाद मानवेतिहासाने मुळीही घेतली नसती. वेलिंग्टनचा विजयही अशातलाच आणि बॅलॅकाव्हा येथील लढाईला चिरस्मरणीयत्व लाभले ते देखील वरील कारणांमुळेच. अशी परिस्थिती असल्यामुळे म्हणावंसं वाटतं, जीवनातील महान तत्व अपघाताचं, आकस्मिकतेचं ! आणि हेही बरोबरच आहे. मनुष्याचं जीवनच मुळी अपघातावर अवलंबून. मृत्यूवरच मुळी आपली आयुमर्यादा विसंबून असलेली. जीवनपथावर तो पावला-

पावलागणिक उभा असलेला. किती रीती आणि किती मार्ग ! अकल्पनीय अगदी. इसाडोरा डंकन आपल्या मोटारीतून जात होती. तिच्या गळपट्टचाचे एक टोक वाऱ्यावर फडफडत होते. ते मोटारच्या चाकांच्या आऱ्यामध्ये अडकले, गळा आवळला गेला आणि ती गतप्राण झाली. मृत्यूचं हे नवीनच रीतीने आगमन होतं. मरण वाटेल तेव्हा येऊ शकते माणसाला. आणि म्हणूनच जीवन अपघात-स्वरूप असतं. तेव्हा मैत्रीचा आरंभ, ओळख होण्याचे मार्ग चमत्कारिक असले तर त्यात नवलाईची गोष्ट ती कोणती !

आणि गतकालात स्मृतिसहल करून हे जीवनसत्य जाणण्यात आनंद नाही की काय ?

पण गटेचा वेर्टर काय म्हणतो ?

×××

०२१०

आणि त्या दोघीही अगदी भांडायला लागल्या. मला नवल वाटलं. वर्गात मुलींना मी एका निबंधाचा आराखडा तयार करून देत होतो. मुली शांतपणे, लक्ष देऊन ऐकत होत्या. आणि अशावेळी "आमचा अकोलाच छान आहे, तुमचं नागपूर कसं घाणेरडं, वाईट आहे !" हे जोराने उच्चारलेले शब्द कानावर आले. आणि लागलीच "अहाहा, राहू द्या. बाईसाहेब ! आहे तुमचा अकोला आमच्या नागपूरएवढा ? उगाच कशाला नाकानं कांदे सोलता ?" हा प्रत्याघातही ऐकायला मिळाला. मी माझे बोलणे थांबविले आणि विचारलं,

"कुसुम, कसलं आहे ग भांडण ?"

"मास्तर, ह्या सगळ्याजणी मला "अकोला, अकोला" म्हणून चिडवीत असतात."

"तू अकोल्याहून आलीस होय ?"

"होय मास्तर."

"कां चिडवता ग तुम्ही तिला ? तारे, कां ?"

"मास्तर, ही की नाही आपल्या अकोल्याची भारी ऐट मारते. सदानकदा ती अकोल्याच्या गोष्टी सांगत असते. आम्हाला नाही आवडत अकोला. आमचं नागपूरच आम्हाला छान वाटतं."

कुसुमला पुन्हा वाचा आली, "मास्तर, ह्या मुद्दाम अकोल्याला हिणवतात. मग मला राग येतो. राग आला की मला ह्या आणखी आणखी त्रास देतात, आणि हसतात. मला फार आवडतो अकोला."

"कां आवडतो तर सांगता येईल का तुला ?"

"होय तर ! मी तिथं पाच वर्षं राहिले. माझ्या मैत्रिणी तिथल्याच आहेत. तिथली लक्ष्मी बाग आणि इतर गोष्टींविषयी मला जिव्हाळा वाटतो."

खरोखर, माणसाचे कितीतरी व्यवहार निव्वळ भावनेवर चालतात ! कुसुम व तारा ह्या दोघींच्या भांडणामध्ये जी भावना आढळून येते तीच भावना प्रत्येक मनुष्याच्या अंतःकरणात आपल्याला आढळून येईल. कुसुम अकोल्याला राहिली, त्या ठिकाणी तिला जिव्हाळ्याच्या मैत्रिणी मिळाल्या. अकोल्याला येईपर्यंत तिचे जीवन तिच्यापुरतेच होते. परंतु नंतर त्याच गावी इतर जिवांशी तिचा जिव्हाळ्याचा संबंध येऊन जीवन–विकास झाला. आपल्या आपल्यामधेच रमणाऱ्या जिवाला उडण्या–बागडण्याला, विहार करायला नवीन क्षेत्र मिळाले. अकोल्यातील लहान लहानशा स्थळांविषयी तिच्या अंतःकरणात नाजुक व प्रेमाच्या भावना

निर्माण झाल्या. अर्थात अकोल्याविषयी तिला विशेष व निराळे वाटत असेल तर तिला तारेप्रमाणे चिडवायचं की काय ! तशीच तारा ! तिला आपल्या नागपूरविषयी भारी अभिमान ! कुसुमने अकोल्याची बढाई मारायला सुरुवात केली की ती तिच्यावर तुटून पडणार आणि निरुत्तर करण्याकरिता म्हणणार, "आहे तुमचा अकोला आमच्या नागपूरएवढा ?" असेच आणखी किती तरी प्रश्न विचारून "आमचंच नागपूर चांगलं" म्हणून प्रतिपादन करणार व कुसुम देखील, "तुमचं नागपूर घाणेरडं, वाईट," असे तोंड दुखस्तोवर म्हणणार.

माणसाला एखाद्या ठिकाणाविषयी जिव्हाळा वाटतो. काय कारण असतं त्याला ? गावाचा मोठेपणा की त्याचं वैशिष्ट्य ? नागपूरवर प्रेम करणाऱ्या तारेला एवढ्याकरिताच का कुसुमशी अगदी अट्टाहासानं भांडावंसं वाटतं ? छे, छे, ह्या गोष्टीमुळे एखाद्याचं एखाद्या स्थळाविषयी चांगलं मत होईल. पण प्रेम नाही वाटायचं, जिव्हाळा नाही अंतःकरणात निर्माण व्हायचा. ह्या भावना निर्माण व्हायला अंतःकरणाचा ठाव घेणाऱ्या गोष्टी गावाशी संलग्न असाव्या लागतात. प्रत्यक्ष दर्शनाने अथवा स्मृतीच्या योगाने हृदय उचंबळून यावे अशा हळुवार, नाजूक व सदा टवटवीत अशा पूर्वकालीन स्मृतींनी त्या गावातील निरनिराळी स्थळे भारलेली असावी लागतात. एखाद्या गावाचा केवळ नावलौकिक काही हे कार्य करू शकत नाही. मला नागपूर प्रिय वाटते. त्याच्याविषयी मला लोभ वाटतो. कां ? तर भूगोलात केवळ 'नागपूर—नाग नदीवर, राजधानीचे शहर, दोन गिरण्या व संत्री, ही प्रसिद्धी असल्यामुळे नव्हे; तर माझ्या प्रीतीतील सखेसवंगडी नागपुरात असतात म्हणून. त्यांच्याशी मी भांडलो तंडलो. कधी कधी तर असंही वाटलं की, कुणाचा सहवास देखील नको. परंतु थोडावेळ एकटेएकटेपणानं घालविताच वाटायला लागतं, किती वेडे आपण ! असं रागवायचं काय ! आणि पुन्हा त्यांच्याकडे चटकन

घाव घ्यावीशी वाटते. प्रीतीचा ओलावा अंतःकरणात असला की अगदी पहिल्याच संधीला मित्रमित्र एक होतात. अशा प्रकारचे माझे मित्र नागपूरला आहेत. आणि त्यामुळे मी कुठेही असलो तरी माझे मन नागपूरला यायला सदा आतुरलेले असते. त्याचप्रमाणे नागपुरात काही अशी स्थळं आहेत की,– मी बाहेरगावी असलो व त्यांची आठवण झाली की मन कसं उचंबळून येतं ! व त्या स्थळांकडे ओढू लागतं. वाटतं आपण हे ठिकाण चटकन सोडावं, स्टारकीपॉईंटच्या पायथ्याशी असलेल्या नहराच्या काठावरील एखाद्या शिलाखंडावर मित्रांसमवेत बसावं व हसतखिदळत काल-क्रमणा करावी. गावातील दगडमातीविषयी नाही आपल्याला प्रेम वाटत. पूर्वस्मृती उचंबळून येऊन गत सौख्याचे क्षण पुन्हा लाभ-तील असे वातावरण असेल तरच आपल्या जिवाला एखाद्या स्थळाविषयी निरतिशय जिव्हाळा वाटतो. अशा ठिकाणी पृथ्वीचा देखील स्वर्ग होतो. परंतु जर हे वातावरण नसेल तर मात्र काश्मीरचे गुलाबी नंदनवन व कैलासावरील पवित्र सौंदर्यही हृद-यात आपुलकीची भावना निर्माण करू शकणार नाही.

जन्मभूमीविषयी प्रत्येकाला काही विशेष वाटत असते. कां ? कारण शैशवीन स्मृती त्या गावात ठायीठायी विखुरलेल्या असतात. लहान लहान दगड, वृक्ष, बागा · · · · त्याला त्याच्या चिमुकल्या जीवनाची आठवण द्यायला समर्थ असतात. त्यांनी त्याचे जीवन आपल्या अंतःकरणात नाजुक भावनेने ठेवलेले असते ! कधी कधी तो त्यांच्याकडे गेला तर किती उत्साहाने, आनंदाने, प्रेमाने, जिव्हाळ्याने आणि आपलेपणाने ते बोलत असतात ! जन्मभूमी म्हणजे आपल्या उमलत्या आयुष्यातील सुखदुःखाची एक गोडशी रोजनिशीच असते.

जन्मभूमीपासून काही काळ दूर रहावं व नंतर आपल्या मित्रमैत्रिणींसमवेत तिच्या दर्शनाला जावं. हृदयात आनंदाला अगदी उधाण येतं. मुख गुणानुवाद करण्यात निमग्न होऊन

जातं. आपण किती बोलतो, काय बोलतो, कुणाला बोलतो इकडे आपलं लक्षच राहत नाही. केवळ आनंदाला हृदय अपुरं होतं. व म्हणूनच शब्दाच्या रूपाने तो बाहेर पडतो.

गाडीतून उतरल्यापासून बडबडीला सुरवात होते.

"त्या दिसल्या कारे निळचा निळचा टेकडचा ? आणि ते एखाद्या ताऱ्याप्रमाणे दिसणारं देऊळ ? तिथं की नाही आम्ही फिरायला जात असू. चढण कठीण असल्यामुळे आई बाबा खूब रागवायचे मला. एक दिवस मी चढताना पडलो. बाबांच्या एका स्नेह्यानं ते पाहिलं. त्यांनी सहज म्हणून बाबांना सांगितलं. पण मला असा खरपूस मार मिळाला की नाही ! त्यांना वाटल मी पुन्हा त्या मार्गाला जाणार नाही, पण मी कसला वस्ताद ! एक दिवस . . . . "

आणि अशा रीतीने "अरेबियन नाईट्स्" मधील गोष्टी सांगण्याची पद्धत अवलंबिली जाते. भोवतालचे सगेसोबती देखील त्यांच्यातील उत्फुल्ल वातावरण ओळखून सगळचा गोष्टी ऐकून घेतात. इतकेच नव्हे, तर मोठचा कुतूहलाने.

त्याला गावातील प्रत्येक गोष्ट प्रेमातील वाटते. शाळा, लहानसा बाजार, पलीकडे असलेले एक तळे, जवळच असलेले पडके देऊळ व शमीचे झाड !

"एक दिवस काय झालं ! आमच्या शाळेत की नाही साहेब येणार होता. तो मात्र ड्रीलच्या वेळेला. मला ड्रीलची खूब भीती वाटायची. मास्तरची नजर चुकवली व हळूच पोबारा केला. दुसरे दिवशी सकाळची शाळा होती. मास्तर मारील ही भीती. मी सरळ शाळेला बुटी दिली. व शाळा सुटायची वेळ होईपर्यंत या शमीच्या झाडाजवळच रेंगाळत राहिलो, नंतर घरी गेलो तो अशा रीतीने की, जणू काय, स्वारी शाळेतूनच घरी येते आहे !

परंतु झालं काय होतं की, मास्तरसाहेबांनी आधीच चौकशी करायला मुलांना घरी पाठविलं होतं. . . . "

नंतर "हे झाड पाहिलंत का ? एक ×× नावाचा मुलगा होता. त्याचा ठावठिकाणा आज मला काहीच माहीत नाही. त्याची आठवण झाली की त्याची लहानशी मूर्ती माझ्या डोळ्यासमोर उभी राहते. एवढीच काय ती आमच्या एकेकाळच्या मैत्रीची स्मृती आज मजजवळ उरली आहे. आम्ही दोघांनीही ह्या झाडाला मैत्रीचे मोठाले खिळे मारले होते. ज्याला मैत्री तोडायची असेल त्याला ते दोन्ही खिळे काढावे लागतील, हा आमच्यातला करार होता. आज त्या ठिकाणी कशाचा मागमूसही नाही. जेव्हा आमच्यापैकी एखादा कट्टी करायची भाषा बोले तेव्हा दुसरा त्याला खिळ्यांची आठवण देई. अर्थात विलग व्हायची भाषा पांगळी होई. तसेच ती विहीर. आम्ही दोघांनी तीत घोंडे टाकले होते. व ते काढल्याशिवाय आमच्यातील मैत्री तुटायची नाही, असा संकेत होता. आयुष्यातला माझा तो पहिला मित्र आज कुठं आहे कुणाला ठाऊक ! परंतु तो दुरावल्यासारखा नाही वाटत. ते खिळे ! व ते घोंडे !"

एखाद्या मार्गदर्शकासारखा तो आपल्या मित्रांबरोबर असतो. प्रत्येक लहानसहान गोष्टीशी संबद्ध असलेल्या शैशवस्मृती मोठ्या तन्मयतेने सांगत राहतो. ज्यात जन्म झाला ते घर, शाळा, बालमित्र, व बालमैत्रिणी, त्यांची घरे, ज्यांच्यावर डाबडुबली खेळलो ते वृक्ष, गावातले लहान लहान ओढे, बिल्वरी आरशासारखी तळी, घराजवळची देवळे, . . . सगळ्या सगळ्याविषयी तो सांगत असतो. अशा गोष्टी ऐकत असताना कंटाळा नाही यायचा. कुणाच्याही हृदयाच्या गोष्टी वाचण्या-ऐकण्यात आनंद असतो. त्या ज्याच्या त्याच्याच तोंडून ऐकणे म्हणजे तर काय ! सुखाची परमावधीच !

खरोखरच ज्याच्या अंतःकरणात, स्मृतीशी निगडित झालेला ह्या विराट विश्वाचा चिमुकला देखील कोपरा नसेल त्याला काय म्हणायचं ? दुर्दैवीच नाही तर काय ! आणि कुसुम व तारा यांच्याइतक्या तल्लख भावना नसतील, त्यांना तरी काय म्हणायचे ! तेच. जीवनातील कितीतरी आनंदाला असे जीव पारखे झालेले असतात !

* * *

०२२०

अकबर एकदा बिरबलला म्हणाला, "बीरबल, जगात सगळ्यात मोठी जात कुणाची ?"

बिरबलाच्या हजरजबाबी, हिकमती, हुशार डोक्यानं विचार केला, व मग ' हां, आलं ध्यानात' अशा अर्थानं मान डोलवून तो उद्‌गारला, "जहाँपन्हा, हकिमांची."

"हकिमांची ? अरे म्हणजे तू म्हणतोस तरी काय ?"

" विश्वास नाही बसत आपला ? "

" नाही."

" असं करा. उद्या सकाळी आपण फिरायला बाहेर पडा. कपाळावर आठ्या असू द्या. दृष्टी जमिनीवर, कंबर वाकलेली.

पावलं सावकाश पडू द्या. मध्येच थांबा व कपाळावर हात फिरवा, उसासे टाका. असं करीत गावभर फिरून या मी मग बोलेन आपल्याशी. मी दिलेल्या उत्तरात जर असत्य आढळलं तर मी लोखंडाच्याहीसुळावर सुळी जायला तयार होईन."

" ठीक आहे. तू म्हणतोस त्याप्रमाणे मी वागायला तयार आहे. पण तू माझ्याबरोबर असायला हवं."

" नाही, जहाँपन्हा, मी व्रात्य म्हणून इतरांना माझ्यासमोर बोलण्याला धीर होत नाही. माझ्या फटकळपणामुळं त्यांची तोंडं एकदम बंद होतात."

माणसं एकमेकांना ओळखू शकतील इतकी पूर्वदिशा उजळल्यावर बादशहा राजवाडचातून बाहेर पडला. पाचदहा पावलं तो चालून गेला असेल. एक सरदारसाहेब त्याला सामोरे आले व त्यांनी त्याला मोठ्या अदबीने त्रिवार कुर्निसात केला. बादशहानं मोठ्या कष्टानं मान वर करून त्याच्याकडे पाहिलं, एक उसासा टाकला.

" काय, झालंय काय आलमपन्हा ? आपली प्रकृती ठीक नाही ?" जणू काय स्वतःलाच रोग झाला आहे अशा कळवळयानं सरदारसाहेब उद्गारले.

" आता पहाटे बाहेर पडताना एकाएकी अंग आंबून आलं. थकल्यासारखं वाटू लागलं."

" होतं असं कधी कधी. मलाही होतं. मग मी अडुळशाचा काढा घेतो. मग मात्र काही झालं होतं आपल्याला याची आठवणही उरत नाही. काढा घ्या तुम्ही. मी आपल्या बागेतून खास लावलेल्या अडुळशाची पानं काढून देतो. "

अकबर या सरदाराला सोडून पुढे गेला.

अकबराच्या हिंदी राण्यांचा देवधर्म करणारा भटजी शुचिभूत होऊन, भस्म चर्चून व काश्मिरी शाल पांघरून महालाकडे चालला होता. त्याने बादशहाकडे पाहिलं. त्याला साष्टांग प्रणिपात केला व "प्रभू हे काय ?" म्हणून पृच्छा केली. बादशहाने दाढेवर हात ठेवला.

ब्राम्हण म्हणाला, "तंबाखूची वस्त्रगाळ पूड दाढेवर धरा. काय बिशाद आहे दाढेची की ती दुखेल !"

बादशहा चालू लागला. एका लष्करी हुद्देदाराने बादशहाला पाहिले. तो बादशहाकडे येऊ लागला. बादशहाची नजर त्याच्यावर गेली. बादशहाला वाटले हा काय हकिमी करणार ? बादशहा पोट परवसत उभा राहिला. दोघांच्याही अधिकाराप्रमाणे एकमेकांनी एकमेकांचे अभिवादन केल्यावर अधिकारी म्हणाला, "प्रकृती ठीक नाही खावंद ?"

"पोट ठीक नाही."

"पोट ठीक नाही ? सगळ्या रोगांचं आगर पोट. मला काहीही झालं की मी पहिल्यांदा अर्धा, पाव बाटली एरंडेल पिऊन टाकतो. नाहीतर त्रिफळा खातो. पोट म्हणजे काही लहानसहान गोष्ट नका समजू परवरदिगार. आत्ताच आपण घरी परता आणि एरंडेल घ्या. हयगय करणं बरं नाही."

सलाम करून तो निघून गेला.

याप्रमाणे बादशहा सूर्य डोकीवर येईपर्यंत फिरत राहिला. जे जे बादशहाला भेटले व त्याच्याशी बोलू शकत होते त्यापैकी प्रत्येकाने बादशहाची व्यथा ऐकावी, औषध सांगावे, व त्याची परिणामकारकता पटविण्याकरिता आपल्याला त्या औषधांचा गुण आला म्हणून सांगावे.

दुपारी बादशहा व बिरबल यांची गाठ पडली व आपल्याला बिरबलाचे म्हणणे पटले याची त्याने कबुली दिली.

जगात एकही मनुष्य असा नाही (भूतकाली, वर्तमानकाली वा भविष्यकाली) जो आयुष्यात केव्हाना केव्हातरी आजारी पडला नाही. आजार आला की औषधही त्याबरोबर आलंच. "औषधाशिवाय खोकला गेला" ही म्हणच नुसती आज ठरली आहे. औषधाशिवाय जाणारा खोकला कधीच नाहीसा झाला. आणखी आज डॉक्टर मिक्श्चर देण्याच्या भानगडीत फारसा पडत नाही. तो एका चिठ्ठीवर खरडतो, फॅ–रॅ–डोल, वॉटरबरी कंपाउंड, व्हिटॅमिन सी. तसेच रोग रोखण्याकरिता इंजेक्शन देतो. ज्याप्रमाणे बारा क्षारौषधींनी सगळे रोग गर्भगळित होतात त्याप्रमाणे एकच इंजेक्शन दोनतीन रोगांशी एकाच वेळी झुंज घेते, त्यांना थोपवून धरते. रोग्याला गुण आला, तो बचावला तर तो डॉक्टरांनी त्याला दिलेल्या औषधांची नावे शिकून घेतो व जितक्या बेदरकारपणे डॉक्टर इंजेक्शन किंवा औषध सांगतो तितक्याच बेदरकारपणे सामान्यपणे सारखी रुग्णप्रकृती आढळताच आपण घेतलेल्या औषधांची नावे पटापट सांगतो. एक म्हणतो, फॅरॅडोल, दुसरा म्हणतो, ग्लुकोचं इंजेक्शन, कुणी भस्म सांगेल, कुणी चूर्ण, एखादा प्राणायाम योगासन सांगेल, एखादा खूब पाणी प्यायला सांगेल, एखादा म्हणेल, पाणी अगदी पिऊ नका. एक म्हणेल, 'भेदरी खा'. पण जात सगळ्यांची एकच. यातच मनोगाहन, मनोविकृती, काममूलत्व, अहंगंड, न्यूनगंड हेही आले. कित्येक एकाहून जास्त रोगांवरची व एकाहून जास्त औषधे सांगू शकतात. काही माझ्यासारखे बिचारे एकाच औषधाचे डॉक्टर असतात, पण डॉक्टर असतात.

मी देखील एका औषधाचा डॉक्टर आहे.

एकदा माझं पोट दुखायला लागलं व ते कित्येक दिवसपर्यंत सारखं दुखत राहिलं. दिवसातून दोनदा ते दुखायचं व तेही ठराविक वेळी. औषधाशिवाय, व तशीच व्यथा अंगावर घेऊन जवळजवळ मी एक महिना काढला. एका सायंकाळी मी आपल्या एका

...ठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांक
अनुक्रम 36643 ... दि: ...नि.क्रं.ल...
क्रांक ...1502... नों दि: 25.11.67

मित्राबरोबर भटकायला बाहेर पडलो. व चालताच पोट दुखायला लागलं. माझं हसणं, हसवणं एकदम थांबलं. तो मला विचारू लागला, "काय झाल रे ?" सांगावंसं वाटेना. पण इतक्या विचित्रपणे त्याच्या नजरेला प्रकार आला होता, की टाळाटाळ करता येईना. मग मी त्याला प्रकार सांगितला. तो म्हणाला, "क्रुशन साल्ट घेऊन बघ." त्यानं जबरदस्ती केली व विनवलं. मग आम्ही एका औषधाच्या दुकानात गेलो, क्रुशन साल्ट मागितलं.

मित्र दुकानदाराला विचारू लागला, "याने पोट दुखणं थांबतं का ?"

"केव्हा पोट दुखतं ?"

मी उत्तर दिलं "जेवण झाल्यावर चार-पाच तासांनी !"

"मग क्रुशन साल्ट नका घेऊ. मी देतो ती स्टमक पावडर घ्या."

ते घेतलं. व नंतर मी त्याचा उपयोग केला. त्याचा परिणाम म्हणून म्हणा, वा अन्य कारणानं म्हणा माझी पोटदुखी थांबली.


आज जर कुणी माझ्यासमोर म्हणाला, "पोट दुखतंय" तर मी म्हणतो "मी सांगतो ती स्टमक पॉवडर घे."

एका औषधाचा डॉक्टर झालोय मी.

आणि यात कुणाला जगाविरहित वाटायला नको. एकाच कवितेचा कवी म्हणून रूजे द लिझलला प्रतिष्ठा लाभली. एकाच कादंबरीमुळे ए. एस्. एम्. हचिन्सन (इतर अनेक लिहिलेल्या असताही) मान्यता पावला. नुसत्या 'चिंतनिके' मुळेच ॲमिल साहित्यात स्थान मिळवू शकलो. मग एकाच औषधाचा डॉक्टर म्हणून माझा डॉक्टरांच्या मालिकेत समावेश होऊ नये ?

आणि या रीतीने प्रत्येक मनुष्य जर कमीत कमी एका औषधाचा डॉक्टर आहे तर, जगात सगळ्यात मोठी जात डॉक्टरांची असं म्हणणाऱ्या, महान सत्य सांगणाऱ्या ब्रिरबलाचं मला व अकबराला कौतुक कां न वाटावं !

ठाणे ग्रंथ संग्रहालय
ठा.मा. ...


REFBK-0013774